Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०८/२०११** **दिनांक २४.०९.२०११**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शनिवार दिनांक २४.०९.२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-३१३९-२०११, दिनांक १९ सप्टेबर,२०११ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक २४.०९.२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| ०१. मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष | ०२. मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष |
| ०३. मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील | ०४. मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग |
| ०५. मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे | ०६. मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा |
| ०७. मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर | ०८. मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्ड्ये |
| ०९. मा.डॉ.प्यारेलाल तिवारी | १०. मा.सौ.अलका बाळू शेजवळ |

मा.डॉ.यशवंतराव व. माने
उपकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे, यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत सर्वश्री मा.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव, मा.समि खतिब, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री रमाकान्त गणेश कर्णिक यांनी दूरध्वनीवरुन कळविले, त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक २८.०८.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.६७४** दिनांक २८.०८.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, ते वाचून कायम करताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या-

**(०१) निर्णय क्र.५९६ (०२)मध्ये-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर यांनी भू-संपादन कक्षातील सर्वच कंत्राटी कामगार काढून त्यांचे जागेवर मंजुर संख्येप्रमाणे नवीन कंत्राटी कामगार घेण्याचे अटीवर या कक्षास ०१/०८/२०११ पासून दि.३०.०४.२०१२ पर्यंत ९ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी. सदरची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात यावी.

तसेच भू-संपादन कक्ष सुरु झालेपासून या कक्षाकडील कंत्राटी कामगारांचे वेतनावर व कक्षासाठी झालेला इतर एकूण खर्च व झालेली कामे याबाबतचा सविस्तर अहवाल व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे सादर करणेबाबत मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांना कळविण्यात यावे, असें ठरलें.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामपूर येथील भू-संपादन कक्षाचे कामगाज सध्या आहे ते कंत्राटी कामगार आहे तसे ठेऊन या कक्षास दि.०१/०८/२०११ ते दि.३०/०४/२०१२ अखेरपर्यंत ०९ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी. तसेच सदर कक्षासाठी फर्निचर व प्रिंटरसह एक संगणक देण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/ बांधकाम विभागप्रमुख)

---

**(०२) निर्णय क्र.६५२ मध्ये-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.बैठक-२०१०/ (प्र.क्र.१६/१०)/ का.सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई दि.०७/०४/२०१० रोजीचे पत्रासोबत दि.२७/०१/२०१० रोजीचे बैठकीतील इतिवृत्तामधील विषय क्र.१३ वरील निर्णयातील/ आदेशातील सुचनेस अनुसरुन वार्षिक आराखडा तयार करुन त्यास शासनाची मान्यता घेऊन शिर्डी नगरपंचायत यांना विशेष स्वच्छता कर/ आरोग्य कर अनुदान रक्कम आदा यावी. मागणी प्रमाणे प्रती ३ महिन्याने रक्कम आदा करावी. माहे एप्रिल-२०११ ते जुन -२०११ अखेर विशेष स्वच्छता कर/आरोग्य कर (नाके) अनुदान रक्कम रुपये १२,५०,०००/- आदा करावी व त्यानंतरचे मागणीवरुन ऑगष्ट २०११ ते मार्च २०१२ बाबतची रक्कम प्रती तीन महिन्याने आदा करणेत यावी, असे ठरलें.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.बैठक-२०१०/ (प्र.क्र.१६/१०)/का.सोळा विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई दि.०७/०४/२०१० रोजीचे पत्रासोबत दि.२७/०१/२०१० रोजीचे बैठकीतील इतिवृत्तामधील विषय क्र.१३ वरील निर्णयातील / आदेशातील सुचनेस अनुसरुन वार्षिक आराखडा तयार करुन त्यास शासनाची मान्यता घेऊन शिर्डी नगरपंचायत यांना विशेष स्वच्छता कर/आरोग्य कर अनुदान रक्कम आदा **करण्यात** यावी. मागणी प्रमाणे प्रती ३ महिन्याने रक्कम आदा करावी. माहे एप्रिल-२०११ ते जुन -२०११ अखेर विशेष स्वच्छता कर/आरोग्य कर (नाके) अनुदान रक्कम रुपये १२,५०,०००/- आदा करावी व त्यानंतरचे मागणीवरुन **जुलै** २०११ ते मार्च २०१२ बाबतची रक्कम प्रती तीन महिन्याने आदा करणेत यावी, असे ठरलें. (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**(०३) निर्णय क्र.६७३ (०२)मध्ये-**

शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांचे संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून, दर्शनासाठी येणारे भक्तांचे जिवीताची व मालमत्तेची नुकसान होऊ नये याकरिता मंदीर परिसरामध्ये पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यालयास जागा व हत्यारे ठेवणेकामी सुरक्षित खोली तसेच बंदोबस्तकामी जीप व मोटार सायकलची मागणी केलेली आहे. यावर सविस्तर चर्चा होऊन, पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यालय तसेच दारुगोळा व हत्यारे ठेवणेसाठी खुले नाट्यगृहाची जागा तसेच दोन मोटारसायकली संस्थानतर्फे देण्यात याव्यात.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांचे संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून, दर्शनासाठी येणारे भक्तांचे जिवीताची व मालमत्तेची नुकसान होऊ नये याकरिता मंदीर परिसरामध्ये पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यालयास जागा व हत्यारे ठेवणेकामी सुरक्षित खोली तसेच बंदोबस्तकामी जीप व मोटार सायकलची मागणी केलेली आहे. यावर सविस्तर चर्चा होऊन, पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यालय तसेच दारुगोळा व हत्यारे ठेवणेसाठी खुले नाट्यगृहाची जागा तसेच दोन मोटारसायकली व **एक सुमो जीप** संस्थानतर्फे देण्यात यावी.

(कार्यवाही-संरक्षण प्रमुख/विधी अधिकारी/अधिक्षक,आस्थापना/बांधकाम प्रमुख/ वाहन विभागप्रमुख)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक ०२.०९.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.६७५** दिनांक ०२.०९.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे २०११ - २०१२ या वर्षाचे वार्षिक औषधे खरेदी कामी प्राप्त झालेल्या एकूण १४४ सिलबंद निविदा दि.२१/०५/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत, परंतु त्यामध्ये मे. इमर्जन्ट मेडी-टेक (इं) प्रा. लि., मुंबई यांनी सिलबंद पाकीटामध्ये मशिनरीचा करारनामा दिलेला होता व M/s. Emami Limited (Zandu Product Division), Mumbai यांनी दोन वेगवेगळया पाकीटात निविदा दिली होती, परंतु त्यांची एकच निविदा होती, त्यामुळे सदरचे खरेदीकामी एकुण १४२ निविदा झालेल्या आहेत, सदरहू १४२ निविदांमध्ये M/s. Sidheshwar Medical & General Stores, Ahmednagar यांनी निविदेसोबत अनामत रक्कम दिलेली नसल्यामुळे तुलनात्मक तक्ता तयार करताना त्यांचा विचार करण्यात आलेला नाही. त्यामुळे उर्वरीत १४१ निविदाधारकांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यांना दि. २४/०७/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलवण्यात आले होते.

त्यानुसार दि. २४/०७/२०११ रोजीचे सभेपुढे एकूण १४१ निविदाधारकांपैकी १०८ निविदाधारक उपस्थित होते. सदरहू निविदा धारकांना सभेपुढे एकत्रीत बोलावून आपण आपली निविदा सादर केलेली असून सदर निविदेमध्ये आपण जे काही मुळ दर दिलेले आहेत, त्यामध्ये श्री साईबाबा व श्री साईनाथ हे दोन्ही धर्मदाय रुग्णालय असल्याने आपण दिलेल्या मुळ दरावर अजून किती सुट देऊ शकतात? ती एका बंद पाकिटात देण्यात यावी असे सांगण्यात आले. त्यानुसार एकूण १०८ निविदा धारकांनी बंद पाकिटात आपली सुट दिलेली होती. तसेच ०२ निविदाधारकांनी फॅक्सव्दारे सुट दिलेली होती. अशी सर्व सुटीची बंद पाकिटे दि.२६/०७/२०११ रोजी वैद्यकिय संचालक व मा. विश्वस्त डॉ. ए. भा. गोंदकर यांचे समक्ष उघडण्यात आले होते.

दि.२४/०७/२०११ रोजीचे सभेत ठरल्यानूसार प्रत्येक औषधे / साहित्यासाठी तांत्रीक बाबी, किंमत, नामांकित कंपनी, इ. चा विचार करुन ज्या ठिकाणी एक, दोन किंवा तीन किंवा त्यापेक्षा जास्त निविदा धारकांचे दर प्राप्त झालेले असतील अशा ठिकाणी कमीत कमी तीन किंवा चार निविदा धारकांची निवड

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



करुन दरात अजुन सुट मिळणेकामी वैद्यकिय संचालक यांनी निवडलेल्या निविदाधारकांना पुन्हा चर्चा / वाटाघाटीसाठी बोलावण्यात यावे, असे ठरले आहे.

त्यानूसार प्राप्त झालेल्या सूटीचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असून तो तक्त्यात Rate Per in Rs. (After Negotiation Dt.२४/०७/२०११) या कॉलम मध्ये दर्शविण्यात आलेला आहे. तसेच औषधांची निवड करतांना संबंधीत वापरणारे कन्सलटंट यांना तक्ता दाखवून त्यांना गतवर्षी ज्या साहित्याचा वापर करतांना तांत्रिक अडचणी आल्या किंवा त्याचा दर्जा चांगल्या प्रतीचा वाटला नव्हता, याबाबत संबंधीत कन्सलटंट यांना वैद्यकिय संचालक यांचे समक्ष बोलवून त्यांचा अभिप्राय / सुचना/ नामांकित कंपन्या इत्यादी बाबत चर्चा करुन केवळ निम्नतम दरांचा विचार न करता एक किंवा अधिक कंपन्यांची निवड करण्यात आली आहे. तसेच संबंधीत कन्सलटंट यांचेशी चर्चा केल्यानंतर आवश्यक त्याठिकाणी मागणीमध्ये वाढ सुचविण्यात आलेली आहे, याकामी खालील कन्सलटंट यांना समक्ष बोलविण्यात आले होते.

१. डॉ. विजय नरोडे (ॲनेस्थेटीक)
२. डॉ. अशोक न्यायधीश (पॅथोलॉजिस्ट)
३. डॉ. इरा भारद्वाज (पॅथोलॉजिस्ट)
४. डॉ. रचना साबळे (बालरोग तज्ञ)
५. डॉ. हरीष बजाज (कार्डीओलॉजिस्ट)
६. डॉ. गौरव वर्मा (कार्डीओलॉजिस्ट)
७. डॉ. विद्युत कुमार सिन्हा (कार्डीयाक सर्जन)
८. डॉ. आशिष अग्रवाल (कार्डीयाक सर्जन)
९. डॉ. आर. के. कुलकर्णी (ई.एन.टी. सर्जन)
१०. डॉ. सुनील सोनटक्के (ऑप्थलमोलॉजिस्ट)
११. डॉ. मैथिली पितांबरे (बी.टी.ओ)
१२. डॉ. रामदास आव्हाड (आर्युवेदीक विभाग)

वार्षिक औषधे खरेदीमध्ये मागणी केलेल्या औषधांपैकी एकुण १२६ औषधांसाठी कुणाचेही दर प्राप्त झालेले नाहीत, त्यांची अंदाजे रक्कम रु.६६,२०,५२९ /- इतकी आहे. ती आवश्यकतेनुसार वेळोवेळी कोटेशन / दरपत्रक मागवून खरेदी करता येईल. तसेच आयुर्वेदीक औषधांमध्ये डॉ. आव्हाड यांनी त्यांना ज्या कंपनीची औषधे पाहीजे आहेत, परंतु त्याच कंपनीचे दर तुलनात्मक तक्त्यात प्राप्त झालेले नाहीत, ती मागील मंजुर दराने (सन २०१०-११) खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे, त्यासाठी मागील मंजुर दराने रक्कम रु.१,१५,३३९/- इतका खर्च येईल, तर आर्युवेदीक औषधांमधील ०६ औषधांकरीता तुलनात्मक तक्त्यात दर प्राप्त झालेले आहेत, परंतु त्यांनी मागणी केलेल्या कंपनीव्यतिरीक्त दर प्राप्त झालेले आहेत, अशी औषधे थेट उत्पादक कंपन्या / अधिकृत विक्रेते यांचेकडून खरेदी करता येतील. त्यासाठी अंदाजे रक्कम रु. २४,४४०/- इतका खर्च येईल.

दि. २४/०७/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत ठरल्याप्रमाणे चर्चा / वाटाघाटी करणेकामी खालीलप्रमाणे विगतवारी करण्यात आलेली आहे.

अ) ज्या निविदाधारकांची एकुण एकत्रित रक्कम रु. १ लाखपर्यंत रक्कम आहे, त्यांना बोलविण्यात आलेले नसून त्यांची एकुण संख्या १४ आहे.

ब) ज्या निविदाधारकांची एकुण एकत्रित रक्कम रु. १ ते ५ लाखाचे दरम्यान आहे, त्यांची एकुण संख्या १७ आहे.

क) ज्या निविदाधारकांची एकुण एकत्रित रक्कम रु. ५ लाखाचे पुढे आहे, त्यांची एकुण संख्या ९७ आहे.

उपरोक्तपैकी "ब" व "क" मधील निविदाधारकांची एकुण एकत्रित रक्कम रु. १ लाखापेक्षा जास्त आहे, असे एकुण ११४ निविदाधारक आहेत. त्यांना चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविणेकामी दोन गट करण्यात आलेले असून पहिल्या गटात एकुण ५९ निविदाधारक आहेत, तर दुसऱ्या गटात एकुण ५५ निविदाधारक आहेत.

उपरोक्त दोन्ही गटातील निविदाधारकांना अजून सूट मिळणेकामी आजचे सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते, एकूण ११४ निविदा सादर कर्त्यांपैकी ८७ निविदा सादरकर्ते समितीचे सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित होते. प्रत्येक निविदा सादरकर्त्यांस स्वतंत्रपणे सभेपुढे बोलविण्यात येऊन त्यांनी यापुर्वी दि. २४/०७/२०११ चे सभेमध्ये आपण देऊ केलेल्या सुटी व्यतिरीक्त अजुन काही सुट देऊ इच्छिता किंवा कसे? याबाबत समक्ष सांगण्यात आले होते, त्यानुसार काही निविदाधारकांनी सुट दिलेली आहे तर काही निविदा धारकांनी पुर्वीचीच (दि.२४/०७/२०११ ची) सुट कायम ठेवलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे :-

| S.N. | Name of Tenderer | Discount Dt. 02/09/2011 |
|---|---|---|
| 1 | Aashirwad Agencies, Nashik | Absent |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| 2 | Ace Medical Technology, Aurangabad | 5% |
| 3 | Ajinkya Medical Agencies, A"nagar | Absent |
| 4 | Alkem Laboratories Ltd, Mumbai | 0.5% |
| 5 | Anita Medical Systems Pvt. Ltd., Mumbai | Nil |
| 6 | Atlantic Pharmaceuticals, Mumbai | Absent |
| 7 | Austin Healthcare, Pune | 2% |
| 8 | B. Braun Medical (India) Pvt. Ltd. Mumbai | Itemwise |
| 9 | Becton Dickinson India Pvt. Ltd., Mumbai | Itemwise |
| 10 | Biochem Pharmaceutical Industries Ltd., Mumbai | 0.5% |
| 11 | Biomedicon Systems (I) Pvt. Ltd., Mumbai | 1% |
| 12 | Bioscience Medical Devices India Pvt. Ltd., Thane | 1% |
| 13 | Bioshields, Goa | 3% |
| 14 | Bora Agencies, Ahmednagar | 2% |
| 15 | Cadila Pharmaceuticals Ltd., A"bad | Nil |
| 16 | Centaur Pharmaceuticals Pvt. Ltd., Mumbai | Nil |
| 17 | Chetna Enterprises, Ahmednagar | Itemwise |
| 18 | Cosmos Enterprises, Mumbai | Nil |
| 19 | Critical Care Systems, Pune | 2% |
| 20 | Drugs India, Nashik | 1% |
| 21 | Eastern Medikit Ltd., Delhi | 1% |
| 22 | Franco Indian Pharmaceuticals Pvt. Ltd., Mumbai | Nil |
| 23 | Fujifilm India Private Limited, Mumbai | 5% (With buyback of Kodak Laser Imager against Drypix 7000 - 3 Tray Online) OR 2% (Without buyback) |
| 24 | G & G Medicaid, Ahmednagar | Nil |
| 25 | Gagan Pharma, Mumbai | Itemwise |
| 26 | Gandhi Enterprises, Ahmedngar | Nil |
| 27 | Global Medical Devices, Pune | Absent |
| 28 | Gurukrupa Agencies, Kopargaon | 1% |
| 29 | Hansraj Nayyar Medical India, Mumbai | Itemwise |
| 30 | Heart Beat Intervention Pvt. Ltd., Surat | Itemwise |
| 31 | Hestar Diagnostics Pvt.Ltd., Mumbai | Nil |
| 32 | Hi-Tech Surgical Systems, Mumbai | Itemwise |
| 33 | Hrushikesh Pharma Care,Sangamner | Nil |
| 34 | Human Touch Technologies, Pune | Absent |
| 35 | ICPA Health Products Ltd., Mumbai | Nil |
| 36 | Imaging Products India Pvt. Ltd., Mumbai | Itemwise |
| 37 | Inter Medics, Mumbai | Nil |
| 38 | J.S.P. Surgicals, Nashik | Itemwise |
| 39 | JCPL Pharma Pvt. Ltd., Jalgaon | Nil |
| 40 | Johnson & Johnson Limited, Mumbai (ASP Division) | Nil |
| 41 | Johnson & Johnson Limited,Mumbai (Ethicon Division) | 1% |
| 42 | Kabra Medicals, Jalgaon | Itemwise |
| 43 | Kaivalyam Surgicals, Shrirampur | Absent |
| 44 | Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai | 2% |
| 45 | Kalpak Marketing Pvt. Ltd., Pune | 1% |
| 46 | Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune | Itemwise |
| 47 | Kapil Medicals, Jalgaon | Absent |
| 48 | Karnataka Antibiotics & Pharmaceuticals Ltd., Bangalore | Nil |
| 49 | Karwa Agencies, Sangamner | 2% |
| 50 | Kaustubh Enterprises, Mumbai | Absent |
| 51 | Keps Pharma, Mumbai | 0.5% |
| 52 | Lotus Surgicals Pvt. Ltd., Mumbai | 3% |
| 53 | Mahesh Surgical & Pharmaceuticals, Pune | Itemwise |
| 54 | Maureen Surgical Company, Aurangabad | Itemwise |
| 55 | Mil Laboratories Pvt.Ltd., Mumbai | Itemwise |
| 56 | Milan Enterprises, Ahmednagar | Absent |
| 57 | MRK Healthcare, Mumbai | Itemwise |
| 58 | Munot Medical Agencies, Manmad. | Itemwise |
| 59 | N.P. Agencies, Mumbai | Nil |
| 60 | Nagarjun Marketing Services, Nashik | Absent |
| 61 | Namoh Agencies, Ahmednagar | Absent |
| 62 | Om Agencies, Aurangabad | Absent |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| 63 | Om Enterprises, Aurangabad | Nil |
| 64 | Omni Lens Pvt.Ltd., Ahmedabad | Nil |
| 65 | Panacea Biomedicals, Pune | Absent |
| 66 | Pankaj Pharma, Pune | Absent |
| 67 | Parshwanath Distributors, Mumbai | Itemwise |
| 68 | Pharmaco, Pune | Itemwise |
| 69 | R.R. Diagnostics, Dhule | Nil |
| 70 | Rahul Brothers, Mumbai | Absent |
| 71 | Rahul Healthcare Corporation, Pune | Absent |
| 72 | Raman & Weil Pvt. Ltd., Mumbai | Itemwise |
| 73 | Renuka Surgical Systems, Aurangabad | Absent |
| 74 | RPG Life Sciences Limited, Mumbai | Nil |
| 75 | S.S. Scientific Co, Dhule | Nil |
| 76 | Sahajananad Medical Technologies Pvt. Ltd., Surat | Nil |
| 77 | Sai Medical Systems, Bhopal | Itemwise |
| 78 | Sanjay Agencies, Ahmednagar. | Itemwise |
| 79 | Sanjivani Medical Stores, Ahmednagar | Absent |
| 80 | SAS Enterprises, Aurangabad | Absent |
| 81 | Scimed Technologies Pvt.Ltd., Mumbai | Itemwise |
| 82 | Seva Medical Equipments Pvt. Ltd., Pune | Itemwise |
| 83 | Shivam Trading Company, Mumbai | Nil |
| 84 | Shree Enterprises, Pune | Absent |
| 85 | Shree Jhalani Agencies, A.nagar | Nil |
| 86 | Shree Raamesh Pharma, Pune | 0.5% |
| 87 | Shree Renuka Agency, Nagpur | Nil |
| 88 | Shree Surya Surgi Pharma Pvt. Ltd., Nashik | Nil |
| 89 | Shreeji Agency, Shrirampur | Itemwise |
| 90 | Shreya Enterprises, Ahmednagar | 1% |
| 91 | Shri Balaji Medical & Parmaceutical Distributor, Nashik | Absent |
| 92 | Shri Sai Care Pharmaceuticals & Surgicals, Kopargaon | Absent |
| 93 | Shriram Distributors, Pune | 1% |
| 94 | Siddhi Medical Distributors, Aurangabad | Absent |
| 95 | Snehal Enterprises, Nagpur | Nil |
| 96 | Spandan Biotech, Aurangabad. | Absent |
| 97 | Speciality Surgimed, Pune | 1% |
| 98 | Surya Surgi Pharma, Nashik | Itemwise |
| 99 | Sushruta Medical Systems, Pune | Itemwise |
| 100 | Tirupati Enterprises, Pune | Absent |
| 101 | Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai | 2% |
| 102 | Trilok Agency, Shrirampur | Itemwise |
| 103 | Trimurti Agencies, Nashik | Itemwise |
| 104 | Trimurti Enterprises, Sillod | Absent |
| 105 | Tyco Healthcare India Pvt. Ltd., Mumbai | Itemwise |
| 106 | Unichem Laboratories Ltd., Mumbai | 0.5% |
| 107 | Universal Chemicals, Nashik | 0.5% |
| 108 | Universal Distributors, Pune | Itemwise |
| 109 | Vascular Concepts Ltd., Mumbai | Itemwise |
| 110 | Veritaz Healthcare Limited, Hyderabad | Nil |
| 111 | Vikrant Surgicals, Pune | Itemwise |
| 112 | Vishal Agencies, Ahmednagar. | Itemwise |
| 113 | Yoga Enterprises, Pune | Itemwise |
| 114 | Zenith Surgical Co., Mumbai | Absent |

**यावर चर्चा होऊन खालीलप्रमाणे समितीने केलेल्या शिफारशी मान्य करण्यात आल्या-**

**दि. २४/०७/२०११ व दि. ०२/०९/२०११ रोजीची दिलेली सुट विचारात घेऊन फेर तुलनात्मक तक्ता तयार करण्यात यावा.**

**०१) चर्चा / वाटाघाटी करुन दरात सुट मिळणेकामी निवड कलेल्या औषधांपैकी सर्वच ठिकाणी निम्नत्तम दरांचा विचार न करता संबंधित वापर करणारे कन्सलटंट यांचा अभिप्राय / सुचना, नामांकित कंपन्या इत्यादीचा विचार करुन वैद्यकिय संचालक यांनी औषधांची निवड करण्यात यावी.**

**०२) ज्या १२६ औषधांसाठी कुणाचेही दर प्राप्त झालेले नाहीत, ती औषधे आवश्यकतेनुसार वेळोवेळी कोटेशन / दरपत्रक मागवून खरेदी करण्यात यावी. तसेच आयुर्वेदीक औषधांकरीता प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**०३) श्री साईबाबा रुग्णालयाचे सि.टी. स्कॅन व एमआरआय सी आर सिस्टीमसाठी लागणाऱ्या DVB Films करीता कोडॅक कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. निर्मल एजन्सी, अहमदनगर यांचेकडे सन २००९ साली पुढील तीन वर्षाकरीता करार करण्यात आलेला होता. सदर करार ३१/०५/२०१२ रोजी संपुष्टात येत आहे. त्यानुसार त्यांचेकडून आतापर्यंत लागणाऱ्या फिल्म्स घेण्यात येत आहेत. परंतु या वर्षीचे निविदेमध्ये मे.निर्मल एजन्सी,अहमदनगर यांचेपेक्षा कमी दराने त्याच कंपनीचे दर प्राप्त झालेले आहेत. तसेच कोडॅक कंपनीने मे.निर्मल एजन्सी,अहमदनगर यांची एजन्सी काढून घेतलेली आहे. तेंव्हा करार नाम्यातील अट क्र.१३ नुसार त्यांचा करार रद्द करण्यात येऊन त्या निम्नत्तम दर प्राप्त झालेल्या निविदाधारकाकडून खरेदी करण्यात याव्यात.**

**०४) कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठी लागणारे सुचर्सपैकी Polypropylene 5-0 20mm, Ethisteel Wire No. 2 व 4 45mm व 48mm हे J&J कंपनीचे येत नसल्यामुळे ते गतवर्षीप्रमाणे Centelene Surgical Suture, Thane या कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. भारत सर्जिकल, राहुरी यांचेकडून त्यांचे सुधारीत दर अनुक्रमे Polypropylene 5-0 (20mm) - २१० बॉक्स प्रती बॉक्स रु.११६५.००, Ethisteel Wire No. 2 (45mm) - २० बॉक्स प्रती बॉक्स रु. ८६६२.५० व Ethisteel Wire No. 4 (48mm) - ३० बॉक्स प्रती बॉक्स रु.८६६२.५० प्रमाणे खरेदी करण्यात यावे.**

**०५) मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरीक्त मागणी करण्याची आवश्यकता भासल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात रु.२५,०००/- पर्यंत मा.व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी.**

**०६) रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवता येईल.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०२ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता माहे ऑगष्ट-२०११**

**(ब) माहे ऑगष्ट -२०११ मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(क) माहे ऑगष्ट -२०११ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**(A)** माहे ऑगष्ट-२०११ मधील रु.२८,३४,३९,८१७/- आणि खर्च रु.१८,८९,४७,२३९/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील माहे ऑगष्ट, २०११ रुपये ३,१९,४९६/-चा तक्ता, संस्थानची गुंतवणूक दिनांक १९ सप्टेंबर,२०११ अखेर रुपये ५४०,३३,२५,५७७/- चा तक्ता, माहे ऑगष्ट,२०११ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या रुपये १३,०२,३१,००३/- चा तक्ता माहे ऑगष्ट-२०११ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा रु.२,१२,५६८/-च्या अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६७६ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**०२. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये ऑगष्ट-२०११ या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

**(B)** श्री साईबाबा रुग्णालयात माहे ऑगष्ट-२०११ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रुपये ३४,३२,९९२/- याप्रमाणे देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६७६ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०३. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अपोलो फार्मसी यांना चालविण्यास दिलेल्या मेडीकल स्टोअरचे माहे जुलै -२०११ चे उत्पन्नाची नोंद घेणे बाबत.**

**निर्णय क्र. ६७६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०४. श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑगष्ट-२०११ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**(C)** श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे ऑगष्ट,२०११ या महिन्यात रु.३१,९७,९५०/- मात्र देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ६७६ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



---

**०५. श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑगष्ट-२०११ मध्ये गरीब रुग्णांना बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

**(D)** साईनाथ रुग्णालयात माहे ऑगष्ट-२०११ मध्ये अंतररुग्ण व बाह्यरुग्ण रुपये ५३,०४३/- थॅलसेमिया व हिमोफेलिया रु.४६,१५० वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ६७६ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०६. माहे ऑगष्ट,२०११ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**(E)** माहे ऑगष्ट,२०११ संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ४६,२८३ मनुष्य दिनांच्या कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ६७६ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**०७. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ६७६** **(F)** संस्थान मध्ये चालु असलेल्या बांधकामाचा माहिती दर्शविणारा तक्ता सर्व सदस्यांना पुरविण्यात आला होता, त्यांची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**०८. पाणी तपासणी अहवाल.**

**(G)** माहे ऑगष्ट,२०११ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ६७६ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०४ सन २०११-१२ करीता कार्यालयीन जनरल व संगणकीय स्टेशनरी साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत**

**प्रस्ताव-** सन २०११-१२ करिता सर्व विभागांसाठी आवश्यक कार्यालयीन जनरल व संगणकीय स्टेशनरी साहित्य खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागणीस मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०७.२०११ मध्ये तत्वतः मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सन २०११-१२ कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी साहित्य खरेदीकरणेकामी दि.२०.०८.२०११ चे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.२२.०८.२०११ ते दि.३०.०८.२०११ अखेर मुंबई कार्यालय व शिर्डी कार्यालय येथे निविदा विक्री करण्यात आलेली असून दि.०१.०९.२०११ अशी निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आलेली आहे.

त्यानुसार मुदतीअंती प्राप्त झालेल्या निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| ०१. | मे.श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर |
| ०२. | मे.साई ॲटोमेशन, अहमदनगर |
| ०३. | मे.सुरेंद्र ट्रेडर्स, नाशिक |
| ०४. | मे.श्री ग्राफी, पुणे |
| ०५. | मे.कॉम्प्युलिंक्स कॉम्प्युटर कनझुमेबल्स, मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना सभेपुढे एकत्रित बोलविण्यात येऊन त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे याबाबत लेखी स्वरुपात बंद पाकीटात सूट देणेबाबत सांगणेत आले.

त्यानुसार उपस्थित निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या सुटीचे बंद पाकिटे उघडण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव | देऊ केलेली सुट |
|---|---|---|
| ०१. | मे.श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर | अनुपस्थित |
| ०२. | मे.साई ॲटोमेशन, अहमदनगर | अनुपस्थित |
| ०३. | मे.सुरेंद्र ट्रेडर्स, नाशिक | सुट नाही |
| ०४. | मे.श्री ग्राफी, पुणे | १ % |
| ०५. | मे.कॉम्प्युलिंक्स कॉम्प्युटर कनझुमेबल्स, मुंबई | अनुपस्थित |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.६७७ यावर सविस्तर चर्चा होऊन,निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या सुटीचे दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यातील निम्नतम दर स्विकारणेत यावेत,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

---

**विषय नं.०५ शांतीनिवास इमारतीचे उत्तरेकडील पिंपळवाडी रोडवर अतिरिक्त मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलिंग तयार करुन बसविणे कामी प्राप्त झालेली टेंडर्स उघडून टेंडरधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २४-०७-२०११ चे सभेतील निर्णय क्र.५८५ अन्वये शांतिनिवास इमारतीचे उत्तरेकडील पिंपळवाडी रोडवर अतिरिक्त मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार शांतिनिवास इमारतीचे उत्तरेकडील पिंपळवाडी रोडवर अतिरिक्त मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेकामी टेंडर विक्रीसाठी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती व टेंडरची विक्री दिनांक २२-०८-२०११ ते दि. ३०-०८-२०११ अशी होती. टेंडर सबमिशन तारीख दिनांक ३१-०८-२०११ अशी होती. त्यानुसार मुदतीत खालीलप्रमाणे तीन टेंडर्स प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | टेंडरधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |
| ०२) | मे.रवि ट्रेडींग कंपनी, पुणे. |
| ०३) | मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव | निविदेतील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१. | मे.आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | ३०,५७,१२०/- | २९,८०,६९२/- |
| ०२. | मे.रवि ट्रेडींग कंपनी, पुणे. | ३२,६४,३००/- | ३२,६४,३००/- |
| ०३. | मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक | २७,००,०००/- | २६,४६,०००/- |

**निर्णय क्र.६७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६ श्री साईबाबा संस्थानचे देणगी काऊंटर नं.०१ व ०२ मध्ये ए.सी. व एअर कर्टन खरेदी करणेकामी तसेच श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे नेटवर्क करीता व संरक्षण विभाग बॅगेज स्कॅनर मशिनकरीता दोन कॅबीनसाठी ए.सी. खरेदी करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५-१२-२०१० चे सभेतील (१) आयत्या वेळचा विषय नं. १४ निर्णय ९८८ अन्वये श्री साईबाबा संस्थानचे देणगी काऊंटर नं.०१ व ०२ करीता ए.सी. व एअर कर्टन खरेदी करणेकामी रु. ३,०९,०००/- इतक्या खर्चास तसेच त्यासाठी कोटेशन मागविणेस, (२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२-०६-२०११ चे सभेतील निर्णय क्र.४१२ अन्वये श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे नेटवर्क रुमकरीता ए.सी. खरेदी करणेकामी रु.४०,०००/- इतक्या खर्चास तसेच त्यासाठी कोटेशन मागविणेस व (३) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२-०६-२०११ चे सभेतील निर्णय क्र.४१३ अन्वये संरक्षण विभाग बॅगेज स्कॅनर मशिनकरीता दोन कॅबीनसाठी ए.सी.खरेदी करणेकामी रु.८०,०००/- इतक्या खर्चास तसेच याकामी कोटेशन्स मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस / विद्युत /२०९० /२०११ दि.२५-०७-२०११ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | पार्टीचे नांव | आ.क. व दिनांक |
|---|---|---|
| ०१) | मे.लकी रेफ्रीजरेशन, नाशिक | ८९४० / ०८-०८-२०१० |
| ०२) | मे.स्पीड फ्रॉस्ट सर्व्हिसेस, मुंबई | ९०५१ / ०९-०८-२०११ |
| ०३) | मे.कुल ब्रीज, पुणे. | ९११२ / १०-०८-२०१० |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन, कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव व गांव | | कोटेशन्समधील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|---|
| ०१. | मे.लकी रेफ्रीजरेशन, नाशिक | ए.सी. | ३३,०००/- (व्होल्टास) | ३१,०००/- |
| | | कर्टन | १८,०००/- (टेक्नोक्राफ्ट ) | ११,१९४/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२. | मे.स्पीड फ्रॉस्ट सर्व्हिसेस, मुंबई | ए.सी. | ४१,३४०/- (व्होल्टास) | ३६,३७९/- |
| | | कर्टन | १९,९५०/- (टेक्नोक्राफ्ट ) | १७,५५६/- |
| ०३. | मे.कुल ब्रीज, पुणे | ए.सी. | ३३,८७९/- (व्होल्टास) | ३०,७००/- |
| | | कर्टन | १०,५७५/- (लोकल मेक) | ०९,९५०/- |

**निर्णय क्र.६७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, ए.सी. करिता मे.कुल ब्रीज, पुणे व एअर कर्टन करिता मे.लकी रेफ्रीजरेशन, नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामधील मशिनरी/इक्वीपमेंट दुरुस्ती व देखभाल करणेसाठी कन्झ्युमेबल स्पेअरपार्ट खरेदीकामी प्राप्त निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२१/०५/२०११ रोजीचे सभेत श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील मशिनरी/ उपकरणे दुरूस्ती व देखभाल करणेसाठी कन्झ्युमेबल स्पेअरपार्ट खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु. ३३,४९,८१४/- चे खर्चास व सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे संकेत स्थळावर निविदा देण्यात येऊन दि.२६/०७/२०११ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. तसेच एकूण २७ उत्पादक कंपन्या / पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र. १७७१ दि.०७/०७/२०११ अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन एकूण ११ निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Name of Tenderer |
|---|---|
| 1 | M/s. SAS Enterprises, Aurangabad |
| 2 | M/s. Excel Corporation, Nashik. |
| 3 | M/s. Cyronics Instruments Pvt. Ltd, Pune. |
| 4 | M/s. Aditi Enterprises, Nashik. |
| 5 | M/s. Gandhi Enterprises, Ahmednagar |
| 6 | M/s. Saitrons Medical Equipment, Loni. |
| 7 | M/s. Vitek Medisystems, Mumbai. |
| 8 | M/s. Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai. |
| 9 | M/s. Biomedicon Services (I) Pvt. Ltd., Mumbai |
| 10 | M/s. M.Shah & Co., Pune. |
| 11 | M/s. Synthes India (P) Ltd., Pune |

सदरच्या सिलबंद निविदा दि.२८/०८/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यापैकी M/s. Synthes India (P) Ltd., Pune यांनी दिलेली निविदा हि कन्झ्युमेबल स्पेअरपार्ट खरेदीकामीची नसल्यामुळे उर्वरीत १० निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार केलेला असून त्यामध्ये Part "A" मधील एकुण ४८ साहित्यापैकी २४ साहित्यासाठी एकाच निविदाधारकाचे दर प्राप्त झाले तर २४ साहित्यासाठी दोन किंवा त्यापेक्षा जास्त निविदाधारकाचे दर प्राप्त झालेले आहे.

तसेच Part B व C मध्ये ज्या कंपनीच्या मशिनरी आहेत, त्याच कंपनीचे Accessories लागतात (Monopoly Items), त्यामध्ये एकुण ४४ आयटमपैकी ३० आयटमसाठी एकाच निविदा धारकाचे दर प्राप्त झालेले आहेत, तर ११ साहित्यासाठी दोन किंवा त्यापेक्षा जास्त निविदाधारकाचे दर प्राप्त झालेले आहे, तर ३ आयटमसाठी कोणाचेही दर प्राप्त झालेले नाही.

Part B व C मध्ये ३ आयटमसाठी कोणाचेही दर प्राप्त झालेले नाही, ती आवश्यकतेनुसार बाजारातून वेळोवेळी किंवा त्या संबंधित थेट कंपनीकडून खरेदी करता येईल.

वरीलप्रमाणे १० निविदा धारकांना आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

उपरोक्त १० निविदा धारकांपैकी ०७ निविदाधारक आजचे सभेपुढे उपस्थित होते, त्यांचेशी झालेल्या चर्चा / वाटाघाटीनंतर त्यांनी खालीलप्रमाणे सुट देऊ केलेली आहे-

| Sr. no. | Name of Supplier | Discount |
|---|---|---|
| 1 | Aditi Enterprises, Nashik. | Nil |
| 2 | Biomedicon Services (I) Pvt. Ltd., Mumbai | 7% |
| 3 | Cyronics Instruments Pvt. Ltd., Pune. | 7% |
| 4 | Excel Corporation, Nashik. | Absent but Itemwise discount given by Fax |
| 5 | Gandhi Enterprises, Ahmednagar | Itemwise |
| 6 | M. Shah & Co., Pune. | Present- 15% discount given by Fax |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| 7 | Saitrons Medical Equipment, Loni. | Itemwise |
| 8 | Vitek Medisystems, Mumbai | 10% |
| 9 | SAS Enterprises, Aurangabad | Absent |
| 10 | Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai. | Absent (3% discount given by fax) |

जे निविदाधारक चर्चा / वाटाघाटीसाठी आजचे सभेपुढे उपस्थित राहू शकले नाही, त्यांना दुरध्वनीवरुन विचारणा करुन त्यांची सुट मागवून त्याचा देखील विचार करण्यात यावा, असे ठरले.

**निर्णय क्र.६८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरची सुट विचारात घेऊन प्रत्यक्षात वापर करणारे बायोमेडीकल इंजिनीयर यांना दाखवून काही स्पेअर्स पार्ट हे निम्नत्तम दरानुसार तर काही ठिकाणी फक्त ज्या कंपनीच्या मशिन आहे त्याच कंपनीचे (Monopoly) तर काही स्पेअर्स पार्टचे पुर्वीचे अनुभव इत्यादीचा विचार करुन शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. त्यांचे शिफारशीनुसार खालीलप्रमाणे ०९ निविदाधारकांना रक्कम रु. ३४,७३,७५६.४९ इतक्या रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात यावे. तसेच तुलनात्मक तक्त्यातील Part A मधील अ.नं. १२ व १३, तर Part B मधील L&T Monitor Accessories - अ.नं.९ व Centrifuge Spare (REMI) - अ.नं. १ ते ५ या आयटमचे दर मॅन्युफॅक्चरींग कंपनीपेक्षा जास्त वाटतात त्यामुळे सदर आयटम थेट मॅन्युफॅक्चरींग कंपनीकडून दरपत्रक मागवून खरेदी करण्यात यावे, असे ठरले.**

| Sr. no. | Name of Supplier | P.O.Amt. in Rs. |
|---|---|---|
| 1 | Aditi Enterprises, Nashik. | 81016.00 |
| 2 | Biomedicon Services (I) Pvt. Ltd., Mumbai | 59850.00 |
| 3 | Cyronics Instruments Pvt. Ltd., Pune. | 1030347.00 |
| 4 | Excel Corporation, Nashik. | 270200.00 |
| 5 | Gandhi Enterprises, Ahmednagar | 33000.00 |
| 6 | M. Shah & Co., Pune. | 101553.70 |
| 7 | Saitrons Medical Equipment, Loni. | 1484022.00 |
| 8 | SAS Enterprises, Aurangabad | 301052.58 |
| 9 | Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai. | 112715.21 |
| | **Total Amt. in Rs.** | **34,73,756.49** |

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. ०८** **सिन्नर येथील पालखी थांब्यासाठी मुख्य शेडचे नुतनीकरण व परिसर विकास कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५ अन्वये सिन्नर येथील पालखी थांब्याचे जागेचा सर्व बाबींचा समावेश करुन पुनश्च सुधारीत बांधकाम आराखडा तयार करुन नव्याने निविदा मागविण्यात याव्यात तसेच ज्या निविदाधारकांनी पूर्वी याकामासाठी निविदा भरलेली आहे, त्यांचेकडून पुन्हा निविदांची किमंत घेऊ नये असे ठरले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०७/२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२५४ अन्वये नेमणूक केलेल्या आर्किटेक्ट पॅनलवरील आर्किटेक्ट भुतडा असो., श्रीरामपूर यांचेकडून सदर कामासाठी प्लॅन व एस्टीमेट तयार करुन घेण्यात आले आहे. आर्किटेक्ट भुतडा असोशिएटस्, श्रीरामपूर यांचे इंजि. चेतन भुतडा यांनी साईटची समक्ष पहाणी करुन सुधारीत आराखड्यामध्ये आर्किटेक्ट यांनी मुख्य शेडची दुरुस्ती व वाढीव कामांकरीता खालील बाबींचा समोवश केलेला आहे.

१. मुख्य शेडचे पश्चिम बाजुकडील भिंतीचे आठ फुट लेव्हलला विट बांधकाम करणे व उर्वरीत भागात कलर कोटेड पत्र्याचे क्लॅडींग करणे.

२. मुख्य शेडमध्ये पश्चिम बाजुकडील गाळ्यात स्त्रियांकरीता स्वतंत्र व्यवस्था करणेकामी दोन रुमचे बांधकाम करणेकामी तरतूद केली आहे.

३. मुख्य शेडमध्ये पावसाचे पाणी आत येवू नये याकामी शेडचे एकूण उंचीचे (१५ फुट) वरुन सात फुटापर्यंत कलर कोटेड पत्र्याचे क्लॅडींग करणे व ५ फुट रुंदीचे पत्र्याचे प्रोजेक्शन करणे.

४. परिसर सुशोभिकरण करणेकामी लॅन्डस्केपींग करणे, ब्लॉक बसविणे, झाडे लावणे इ.

५. पालखी थांब्याचे मुख्य गेटवर कमान तयार करणे.

याकामी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन याकामी वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन कोऱ्या निविदा फॉर्मची विक्री दि.०२/०९/२०११ ते दि.१६/०९/२०११ अखेर तसेच सिलबंद निविदा सादर करणेची मूदत दि.२१/०९/२०११ अखेर ठेवणेत आलेली आहे.

विहीत मूदतीत खालील ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले आहे.

१. श्रृती कन्स्ट्रक्शन, सिन्नर
२. श्री. चंद्रशेखर बी. काजळे, कोपरगांव

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



३. मे.एन.एस.बनकर पाटील ॲण्ड कं. श्रीरामपूर
४. श्री राजेंद्र बी शेळके, नाशिक
५. श्री.पी.बी.जाधव, संगमनेर

तरी विहीत मूदतीत प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडून त्यावर निर्णय होणेस तसेच उपरोक्त बांधकामासाठी आर्किटेक्ट भुतडा असोसिएटस्, श्रीरामपूर यांची २% अधिक सर्व्हीस टॅक्स इतक्या फी वर आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडणेत येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव | निविदेतील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१. | श्रुती कन्स्ट्रक्शन, सिन्नर | १४.२५% अधिक | ११ % अधिक |
| ०२. | श्री. चंद्रशेखर बी. काजळे, कोपरगांव | ९.९% अधिक | २% अधिक |
| ०३. | श्री.पी.बी.जाधव, संगमनेर | २०% अधिक | १०% अधिक |
| ०४ | मे.एन.एस.बनकर पाटील ॲण्ड कं. श्रीरामपूर | ९.९९% अधिक | ५% अधिक |
| ०५ | श्री राजेंद्र बी शेळके, नाशिक | ३.३३% अधिक | ३% अधिक |

**निर्णय क्र.६८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. चंद्रशेखर बी. काजळे, कोपरगांव यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, तसेच उपरोक्त बांधकामासाठी आर्किटेक्ट भुतडा असोसिएटस्, श्रीरामपूर यांची २% अधिक सर्व्हीस टॅक्स इतक्या फी वर आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेत यावी, तसेच झाडे लावणेसाठी आवश्यक साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. ०९** **पांढुर्ली येथील पालखी थांब्यासाठी मुख्य शेडचे नुतनीकरण व परिसर विकास कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेतील नि.क्र.०५ अन्वये पांढुर्ली येथील पालखी थांब्याचे जागेचा सर्व बाबींचा समावेश करुन पुनश्च सुधारीत बांधकाम आराखडा तयार करुन नव्याने निविदा मागविण्यात याव्यात तसेच ज्या निविदाधारकांनी पूर्वी याकामासाठी निविदा भरलेली आहे, त्यांचेकडून पुन्हा निविदांची किमंत घेऊ नये असे, ठरले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०७/२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२५४ अन्वये नेमणूक केलेल्या आर्किटेक्ट पॅनलवरील आर्किटेक्ट भुतडा असोसिएटस्, श्रीरामपूर यांचेकडून सदर कामासाठी प्लॅन व एस्टीमेट तयार करुन घेण्यात आले आहेत. आर्किटेक्ट भुतडा असोशिएटस्, श्रीरामपूर यांचे इंजि. चेतन भुतडा यांनी साईटची समक्ष पहाणी करुन सुधारीत आराखड्यामध्ये आर्किटेक्ट यांनी मुख्य शेडची दुरुस्ती व वाढीव कामांकरीता खालील बाबींचा समोवश केलेला आहे.

१. मुख्य शेडचे पश्चिम बाजुकडील भिंतीचे आठ फुट लेव्हलला विट बांधकाम करणे व उर्वरीत भागात कलर कोटेड पत्र्याचे क्लॅडींग करणे.
२. मुख्य शेडमध्ये पश्चिम बाजुकडील गाळ्यात स्त्रियांकरीता स्वतंत्र व्यवस्था करणेकामी दोन रुमचे बांधकाम करणेकामी तरतूद केली आहे.
३. मुख्य शेडमध्ये पावसाचे पाणी आत येवू नये याकामी शेडचे एकूण उंचीचे (१५ फुट) वरुन सात फुटापर्यंत कलर कोटेड पत्र्याचे क्लॅडींग करणे व ५ फुट रुंदीचे पत्र्याचे प्रोजेक्शन करणे.
४. परिसर सुशोभिकरण करणेकामी लॅन्डस्केपींग करणे, ब्लॉक बसविणे, झाडे लावणे इ.
५. पालखी थांब्याचे मुख्य गेटवर कमान तयार करणे.

याकामी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन याकामी वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन कोऱ्या निविदा फॉर्मची विक्री दि.०२/०९/२०११ ते दि.१६/०९/२०११ अखेर तसेच सिलबंद निविदा सादर करणेची मूदत दि.२१/०९/२०११ अखेर ठेवणेत आलेली आहे.

विहीत मूदतीत खालील ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले आहेत.

१. श्रुती कन्स्ट्रक्शन, सिन्नर
२. श्री. चंद्रशेखर बी. काजळे, कोपरगांव
३. मे.एन.एस.बनकर पाटील ॲण्ड कं. श्रीरामपूर
४. श्री राजेंद्र बी शेळके, नाशिक

तरी विहीत मूदतीत प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडून त्यावर निर्णय होणेस तसेच उपरोक्त बांधकामासाठी आर्किटेक्ट भुतडा असोसिएटस्, श्रीरामपूर यांची २% अधिक सर्व्हीस टॅक्स इतक्या फी वर आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडणेत येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव | निविदेतील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१. | श्रुती कन्स्ट्रक्शन, सिन्नर | १५% अधिक | ११ % अधिक |
| ०२ | मे.एन.एस.बनकर पाटील ॲण्ड कं. श्रीरामपूर | ९.९९% अधिक | ३% अधिक |
| ०३ | श्री राजेंद्र बी शेळके, नाशिक | ४.९९% अधिक | ४% अधिक |

**निर्णय क्र.६८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.एन.एस.बनकर पाटील ॲण्ड कं. श्रीरामपूर यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, तसेच उपरोक्त बांधकामासाठी आर्किटेक्ट भुतडा असोसिएटस्, श्रीरामपूर यांची २% अधिक सर्व्हीस टॅक्स इतक्या फी वर आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेत यावी, तसेच झाडे लावणेसाठी आवश्यक साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं. १०** **संस्थानचे वाहन विभागाचे वाहनतळ व वाहनतळाकडे जाणारे अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेकामी प्राप्त निविदा उघडून निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा भक्त निवासस्थानचे (५०० खोल्या) पूर्वेकडील गौरी शेड जवळील जागेत (सर्व्हे नं.१०९) वाहन विभाग स्थलांतरीत करणेत आलेले आहे. वाहन तळाचे जागेत तुर्त मुरुम व रॅबीट मटेरीअलची भर टाकून व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच मुख्य रस्त्यापासून वाहन विभागाकडे जाणारा रस्ता हा मुरुम टाकून तयार करणेत आलेला आहे.

वाहन विभागाचे पार्किंग शेड, वाहनतळ व वाहनतळाकडे जाणारे रस्त्यावर पावसाळ्यात पाणी साचून चिखल होऊ नये याकरीता प्रथम खडीकरण करुन त्यावर डांबरीकरण करता येईल. याकामी रक्कम रु.२०,०३,२८२.०० मात्रचे अंदाजीत अपेक्षीत खर्चास दि.१२/०६/२०११ रोजीचे माननीय व्यवस्थापन समितीचे सभेत नि.क्र.३९६ अन्वये मान्यता देणेत आली आहे.

याकामी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन याकामी वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन कोऱ्या निविदा फॉर्मची विक्री दि.०२/०९/२०११ ते दि.१६/०९/२०११ अखेर तसेच सिलबंद निविदा सादर करणेची मूदत दि.२१/०९/२०११ अखेर ठेवणेत आली होती.

विहीत मूदतीत खालील ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| ०१. | मे. जगताप कन्स्ट्रक्शन ॲण्ड कं. कोल्हार (खु) ता. राहुरी |
| ०२ | पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगांव |
| ०३ | पी.बी.जाधव, संगमनेर |
| ०४ | डायमंड कन्स्ट्रक्शन कं. लोणी ता. राहाता |
| ०५ | राज रोड बिल्डर्स, अकोला जि. अ.नगर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव | निविदेतील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१. | मे. जगताप कन्स्ट्रक्शन ॲण्ड कं. कोल्हार (खु) ता. राहुरी | ०.०१% कमी | निविदादरात |
| ०२. | पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगांव | ९.०% अधिक | अनुपस्थित |
| ०३. | पी.बी.जाधव, संगमनेर | १५% अधिक | ७.५% अधिक |
| ०४ | डायमंड कन्स्ट्रक्शन कं. लोणी ता. राहाता | २०% अधिक | १५% अधिक |
| ०५ | राज रोड बिल्डर्स, अकोला जि. अ.नगर | १८.८९% अधिक | १८% अधिक |

**निर्णय क्र.६८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. जगताप कन्स्ट्रक्शन ॲण्ड कं. कोल्हार (खु) ता. राहुरी यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं. ११** **जुने प्रसादालय परिसराशेजारी पिंपळवाडी रोडलगत पाथवेचे बांधकाम करणेकामी प्राप्त निविदा उघडून निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** समाधी मंदिर परिसराचे उत्तर बाजुला असलेल्या जुना पिंपळवाडी रस्त्यावरुन दर्शन रांगे करीता प्रवेश देण्यात येतो. तसेच उर्वरीत रस्त्यावरुन मोठ्या वाहनांची वर्दळ असते व साईभक्तांना चालणेसाठी रस्त्याच्या उत्तर बाजुकडील ५' रुंदीचा फुटपाथचा वापर करावा लागतो. मा. अध्यक्ष सो। यांनी दि.३१/०५/२०११ रोजी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



कार्यकारी अधिकारी व वरिष्ठ मुख्य अभियंता यांचे समवेत सदरहू परिसराची पहाणी केली. साईभक्तांना सदरचे रस्त्यावरुन चालणेस अडचण होते. याकरीता संस्थानचे जुने प्रसादालय परिसरातून जुन्या पिंपळवाडी रस्त्याच्या फुटपाथच्या बाजुने १० फुट रुंदीचा पाथ-वे करणेस सूचना केल्या आहेत. सध्या संस्थान मालिकीचे जागेत (जुने प्रसादालय परिसराचे आतिल बाजुने) म्हणजे नगर-मनमाड रोड ते तिर्थप्रसाद लॉज पर्यंत सदर पाथ-वे तयार करता येईल. यासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.१२/०६/२०११ रोजीचे सभेतील नि.क्र.४१० अन्वये साईभक्तांच्या सुविधेसाठी जुन्या पिंपळवाडी रस्त्याच्या (अभिनेते मनोज कुमार गोस्वामी पथ) उत्तर बाजुने संस्थान हद्दीतून १० फूट रुंदीचा व १०२ मी. लांबीचा पाथ-वे करणेसाठी व याकामी येणारे रक्कम रु.१२,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली आहे.

सदरहू कामी दि.०२/०९/२०११ रोजीचे दैंनिक लोकमत व गांवकरी या वृत्तपत्रांमध्ये निविदा सूचना प्रसिद्ध करणेत आली होती. दि.१६/०९/२०११ रोजीचे अंतिम मूदतीत खालील चार ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले आहेत.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव |
|---|---|
| ०१. | पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, कोपरगांव |
| ०२ | चंद्रशेखर बी काजळे, कोपरगांव |
| ०३ | रोहन एम. निकम, नाशिक |
| ०४ | त्रिमिती इंटेरीअर्स, नाशिक |

उपरोक्त चार ठेकेदारांपैकी दि.२१/०९/२०११ पर्यंतच्या मूदतीत रोहन एम. निकम, नाशिक व त्रिमिती इंटेरीअर्स, नाशिक या दोनच ठेकेदारांनी आपल्या निविदा सादर केल्या होत्या.

**निर्णय क्र.६८४ यावर सविस्तर चर्चा होऊन, जुने प्रसादालय परिसराशेजारी पिंपळवाडी रोडलगत पाथवेचे बांधकाम करणेकामी दोनच निविदा प्राप्त झालेने सदरहू कामी फेरनिविदा मागविणेत याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. १२ श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सव (दसरा) सन २०११ करीता मंडप व इतर अनुषंगीक सुविधा करणेकामी प्राप्त झालेले कोटशन्स उघडून निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान मार्फत सालाबाद प्रमाणे याही वर्षी शनिवार दि. ०५ ऑक्टोबर, २०११ ते दि. ०८ ऑक्टोबर, २०११ अखेर ०४ दिवस "श्रीं " चा पुण्यतिथी (दसरा) उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, धर्मशाळा, जुने प्रसादालय व साईनगर परिसरांमध्ये सर्व ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपाची अतिरिक्त निवास व्यवस्था व्हावी म्हणुन उत्सवाच्या कालावधीत खालील परिशिष्ट प्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे.

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण / एकक |
|---|---|---|
| **अ) समाधि मंदिर, साईनगर, भक्तनिवासस्थान (५०० रुम) व इ. परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे:-** | | |
| ०१. | **एम. एस. पाईप, कैच्या वापरुन वरिल बाजूने ताडपत्री व आतिल बाजूने सुशोभित कापड असलेले मंडप.**<br>(समाधी मंदिर उत्तर बाजूस, चावडी गेट ते नगरव्दार गेटपर्यन्त, सभाकुंडामध्ये, साईनगर परिसर, साई कॉम्प्लॅक्स समोरील जागेवर (१६ आर मध्ये) ) | ५३९९२.०० चौरस फुट |
| ०२. | **पाईप / बांबू व गोल्टे वापरुन वरिल बाजूने ताडपत्री व आतिल बाजूने सुशोभित कापड असलेले मंडप.**<br>(मंदिर, साई उद्यान, मंगल कार्यालय, जुने प्रसादालय, भक्तनिवासस्थान इ. परिसरामध्ये) | ७७५१०.०० चौरस फुट |
| **ब) स्टेज व्यवस्था.** | | |
| ०१ | साईनगर मैदानावर | ६०० चौरस फुट |
| ०२ | सभाकुंड येथे | ३८४ चौरस फुट |
| **क ) दर्शन रांगेसाठी व श्री साईप्रसादालय येथे तिकीट रेलिंगसाठी बॅरेकेटींग करणे.** | | |
| ०१ | दर्शन रांगेकरीता व श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलिंग व्यवस्थेकामी व इतर आवश्यक ठिकाणी ४' उंचीचे लोखंडी पाईप / बांबू वापरुन भक्कम बांधी करुन बॅरेकेटींग करणे. | १४०० रनिग फुट |
| **ड ) बाथरुम व्यवस्थेसाठी पार्टीशन उभारणे.** | | |
| ०१ | साईनगर व नविन प्रसादालय बाहेरील बाजूस १२ फुट उंचीचे जी. आय. पत्रे वापरुन आतिल बाजूने सुशोभित कापड बांधून बाथरुम व्यवस्थे कामी ६' उंचीचे पार्टीशनची उभारणी करणे. | ३००.०० रनिंग फुट |
| **इ ) दर्शन रांगेच्या बाजूने ६ फुट उंचीची कनात बांधणे.** | | |
| ०१ | दर्शन रांगच्या बाजूने शामियाना मंडपासाठी वापरण्यात येणाऱ्या कापडाची ६ फुट उंचीची कनात बांधणे. | ८०० रनिग फुट |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सध्या दुकानसाठी उपलब्ध असलेले २१० स्क्वेअर मिटर जागेत औषधे साठवणे, प्रिस्क्रिप्शन प्रमाणे रुग्णांना औषधे देणे यासाठी असलेला कर्मचारी वर्ग, संगणक, मॅनेजर यांची बैठक व्यवस्था इत्यादी मुळे जागा खूपच कमी पडते पर्यायाने रुग्णांना बऱ्याच वेळ औषधे घेणेसाठी प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे कधी रुग्ण कंटाळून बाहेर जाऊन देखील औषधे घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्राईजेस, चेन्नई यांचे दुकानचे कामकाजाबाबत दि. ०८/०६/२०११ रोजी रुग्णालयात वैद्यकिय संचालक यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत सदर दुकानचे मॅनेजर श्री. संदीप ताठे यांना विचारणा करण्यात आली असता त्यांचे म्हणणेनुसार सध्या दुकानसाठी असलेली जागा खुपच अपुरी पडते त्यामुळे रुग्णांना औषधे घेणेसाठी खूपच प्रतिक्षा करावी लागते असे त्यांनी सांगितले. तेंव्हा आम्हाला अजून जागा दिल्यास अजून दोन खिडक्या औषधे देणेसाठी चालू करता येईल. याकामी अतिरिक्त जागा मिळणे बाबत मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्राईजेस, चेन्नई यांनी दि.१३/०६/२०११ चे पत्रान्वये संस्थानकडे विनंती केलेली होती. याबाबत दि. २९/०६/२०११ चे टिपणीवर बांधकाम विभाग प्रमुख यांचा अभिप्राय घेऊन प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती पुढे सादर करणेकामी बांधकाम विभाग प्रमुख यांनी दि.२९/०६/२०११ चे प्रस्तावास अनुसरुन त्यांचे दि. २७/०८/२०११ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल हे नगर-मनमाड या राज्यमार्गासन्मुख आहे. त्यामुळे सदर भुखंडात करावयाचे बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे पथकिनारवर्ती नियमानुसार रस्त्याचे मध्यापासून किमान ३७ मि. अंतर सोडणे आवश्यक आहे. त्यानुसार सध्याचे मेडीकल स्टोअर इमारतीलगत नगर-मनमाड रस्त्याचे दिशेला बांधकाम करणे अनुज्ञेय नाही. तथापी भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून तात्पुरत्या स्वरुपाचे क्युबिकल शेड उभारवयाचे असल्यास त्यासाठी धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. तसेच सदर क्युबिकल शेड नगर-मनमाड रस्त्याचे हद्दीपासून किमान १५ मि. अंतरावर म्हणजेच जास्तीत जास्त ३.६० मि. लांबीचे असावे.

तरी वरीलप्रमाणे मेडीकल स्टोअरसाठी वाढीव क्युबिकल शेड उभारणेबाबत अपोलो फार्मसी यांचे समवेत झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार याकामी अपेक्षित असलेला खर्च अपोलो अथवा संस्थान यांचेपैकी कोण करणार, वाढीव जागा उपलब्ध केलेनंतर भाडेवाढ करण्यात येईल काय?

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



इत्यादी अनुषंगिक बाबींसह निर्णयासाठी सविस्तर प्रस्ताव आपले विभागामार्फत मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करण्यात यावा, असा अभिप्राय दिलेला आहे.छ

मे. अपोलो हॉस्पिटल्स एंटरप्रायजेस लिमिटेड, यांनी दि. २९/०८/२०११ चे पत्रान्वये त्यांनी सदर वाढीव दुकानासाठी कमीत कमी ६ मिटर (२४० Sq.Ft.) जागेची मागणी केलेली आहे, त्यामुळे चार काऊंटर वाढतील व काम व्यवस्थित करुन रुग्णांना औषधे घेणेसाठी जास्त वेळ प्रतिक्षा करावी लागणार नाही.

त्यांनी त्यांचे उपरोक्त पत्रात सदरची कॅबीन हे Cooling-G-Porta मटेरीयल वापरुन तात्पुरत्या स्वरुपात तयार करावयाचा प्रस्ताव दिलेला आहे. जेणेकरुन संस्थानला भविष्यात कॅबीन काढावयाची वेळ आली तर ते एका दिवसात काढून टाकू शकतात. सदर Cooling-G-Porta मटेरीयलची कॅबीन बनविलेस त्यासाठी अंदाजे रु.३,२५,०००/- ते रु.३,५०,०००/- पर्यंत खर्च कळविलेला असून सदर खर्च मे. अपोलो हॉस्पिटल्स एंटरप्रायजेस लिमिटेड यांनी करुन तो संस्थानला दिल्या जाणाऱ्या दरमहा देणगी रक्कमेतून टप्प्याटप्प्याने वजा करुन घेता येईल किंवा संस्थानने तातडीने सदरील कॅबीन बांधून दयावी.

रुग्णालयात रुग्णांची वाढती संख्या व रुग्णास औषधे घेण्यासाठी करावी लागणारी प्रतिक्षा व प्रतिक्षेवरुन होणाऱ्या वादावादी टाळणेसाठी तात्पुरत्या स्वरुपाची कॅबीन देणे अत्यंत आवश्यक असून काऊंटर वाढल्यामुळे रुग्णांची संख्या वाढून विक्रीत देखील वाढ होईल व रुग्णांची गैरसोय देखील कमी होईल.

**निर्णय क्र.६९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये अपोलो फार्मसी यांना चालविण्यास दिलेल्या मेडीकल स्टोअरचे वार्षिक किती उत्पन्न मिळाले याचा एकत्रित तक्ता व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे माहितीसाठी सादर करावा. तसेच रुग्णांना अजून काही कमी दरात औषधे देता येतील किंवा कसे? यासाठी अपोलो हॉस्पिटल फार्मसी यांचे मॅनेजर यांना वरील सर्व माहितीसह व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चेसाठी समक्ष बोलाविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२५** **श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात वर्कशॉप करिता तातडीने केलेल्या औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात Device Closure बसविणेकामी दि.०७/०८/२०११ रोजी हैद्राबाद येथील कार्डीयोलॉजिस्ट डॉ. नागेश्वर राव यांचे मार्गदर्शनाखाली वर्कशॉप आयोजित करण्यात आले होते. सदर वर्कशॉप करीता कॅथलॅब विभागाने दि.२८/०७/२०११ चे पत्रान्वये लागणाऱ्या साहित्याची मागणी केलेली होती. सदर वर्कशॉप पूर्वी Device बसविणेकामी छातीला दोन छेद घेण्यात येत होते त्यामुळे रुग्णास Recover होण्यास जास्त कालावधी लागतो त्यामुळे रुग्णास हॉस्पिटल मधून डिस्चार्ज देखील उशीरा दिला जात होता. परंतु वर्कशॉपमध्ये Device बसविणेकामी बगलेखाली एकच छेद घेऊन Device बसवित असल्यामुळे पेशंट Recovery ला जास्त वेळ लागत नाही. त्यामुळे पेशंटला लवकरात लवकर डिस्चार्ज देता येतो असा फायदा होऊन यापुढील Device बसविण्याच्या शस्त्रक्रिया सुध्दा याच पध्दतीने करण्यात येत आहे.

सदर वर्कशॉपमध्ये Device बसविणेकामी लागणारे Device, औषधे, साहित्य आपणाकडे उपलब्ध असलेले वापरले असून काही Device, औषधे / साहित्य आपणाकडे उपलब्ध नव्हती ती तातडीने खरेदी करण्यात आलेले आहे. त्यासाठी रु. ४०,४००/- मात्र खर्च आलेला आहे.

उपरोक्त खरेदीच्या बीलांचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr. No. | Name of Party | Bill / Challan No. | Date | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Sino Care Surgicals Pvt. Ltd., Mumbai | 925 | 27/06/2011 | 7500.00 |
| 2 | Biomedicon Systems(I) Pvt. Ltd., Mumbai | 857 | 01/08/2011 | 25400.00 |
| 3 | Sino Care Surgicals Pvt. Ltd., Mumbai | 9457 | 04/08/2011 | 7500.00 |
| | | Total Amt. in Rs. | | **40400.00** |

- ***Partywise Bill Summery -***

| Sr. No. | Name of Party | Total Amt. in Rs. |
|---|---|---|
| 1 | Biomedicon Systems(I) Pvt. Ltd., Mumbai | 25400.00 |
| 2 | Sino Care Surgicals Pvt. Ltd., Mumbai | 15000.00 |
| | **Total Amt. in Rs.** | **40400.00** |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी उपरोक्त प्रमाणे Device, औषधे / साहित्याचे बीलाची पुर्णांकित रक्कम रु.४०,४००/- (रु.चाळीस हजार चारशे मात्र) पुरवठाधारकांना अदा करण्यात आलेली आहे.

तरी सदर Device, औषधे / साहित्य खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.६९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात वर्कशॉप करिता तातडीने केलेल्या Device, औषधे / साहित्य खरेदीची व याकामी आलेल्या रुपये ४०,४००/- खर्चाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२६** **श्री साईबाबा रुग्णालयातील दोन्ही सि.व्ही.टी.एस. विभागात वर्कशॉप करीता तातडीने केलेल्या औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील दोन्ही सि.व्ही.टी.एस. ओ.टी. विभागात Device व Valve Reparing च्या शस्त्रक्रिया करणे कामी दि.०९/०७/२०११ व दि.१०/०७/२०११ रोजी इंदौर येथील कार्डीयाक सर्जन डॉ. चिराग दोशी यांचे मार्गदर्शनाखाली वर्कशॉप आयोजित करण्यात आले होते. सदर वर्कशॉप करीता सि.व्ही.टी.एस. विभागाने दि.०५/०७/२०११ चे पत्रान्वये लागणाऱ्या साहित्याची मागणी केलेली होती. सदर वर्कशॉप पूर्वी Device ची शस्त्रक्रिया करणेसाठी छातीला मोठा छेद घेण्यात येत होते त्यामुळे रुग्णास Recover होण्यास जास्त कालावधी लागतो त्यामुळे रुग्णास हॉस्पिटल मधून डिस्चार्ज देखील उशीरा दिला जात होता. परंतु वर्कशॉपमध्ये Device बगलेखाली छोटा छेद घेऊन Device शस्त्रक्रिया करत असल्यामुळे पेशंट Recovery ला जास्त वेळ लागत नाही. त्यामुळे पेशंटला लवकरात लवकर डिस्चार्ज देता येतो असा फायदा होऊन यापुढील Device बसविण्याच्या शस्त्रक्रिया सुध्दा याच पध्दतीने करण्यात येत आहे.

सदर वर्कशॉपमध्ये Device व Valve Reparing च्या शस्त्रक्रियेसाठी काही औषधे / सर्जिकल साहित्य आपणाकडे उपलब्ध नव्हते ते तातडीने खरेदी करण्यात आलेले आहे. त्यासाठी रु.७२,५२७/- मात्र खर्च आलेला आहे.

उपरोक्त खरेदीच्या बीलांचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr. No. | Name of Party | Bill / Challan No. | Date | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Kanchan Drugs Pvt. Ltd., Pune | 2900 | 12/07/2011 | 12857.00 |
| 2 | Kanchan Drugs Pvt. Ltd., Pune | 2899 | 12/07/2011 | 32547.00 |
| 3 | Sarv Healthcare Pvt. Ltd., Mumbai. | 405 | 15/7/2011 | 11130.00 |
| 4 | Shushruta Medical System, Pune | 189 | 25/07/2011 | 6930.00 |
| 5 | Shushruta Medical System, Pune | 190 | 25/07/2011 | 5670.00 |
| 6 | Shushruta Medical System, Pune | 188 | 25/07/2011 | 3375.00 |
| | | **Total Amt. in Rs.** | | **72509.00** |

- ***Partywise Bill Summery -***

| Sr. No. | Name of Party | Total Amt. in Rs. |
|---|---|---|
| 1 | Kanchan Drugs Pvt. Ltd., Pune | 45404.00 |
| 2 | Sarv Healthcare Pvt. Ltd., Mumbai. | 11130.00 |
| 3 | Shushruta Medical System, Pune | 15975.00 |
| | **Total Amt. in Rs.** | **72509.00** |

तरी उपरोक्त प्रमाणे सि.व्ही.टी.एस. ओ.टी. विभागात वर्कशॉप करीता औषधे / सर्जिकल साहित्य खरेदी केलेल्या बीलाची पुर्णांकित रक्कम रु.७२,५०९/- (रु. बहात्तर हजार पाचशे नऊ मात्र) पुरवठाधारकांना अदा करण्यात आलेली आहे.

तरी सदर औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.६९९** **श्री साईबाबा रुग्णालयातील दोन्ही सि.व्ही.टी.एस. विभागात वर्कशॉप करीता तातडीने केलेल्या औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीस व याकामी आलेल्या रक्कम रुपये ७२,५०९/- खर्चाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२७** **कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी (कनिष्ठ भुलतज्ञ, कनिष्ठ क्ष किरण शास्त्रज्ञ, कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ, कनिष्ठ शरिर विकृती तज्ञ इ.) यांचे एकत्रित वेतनाबाबत.**

**प्रस्ताव-** कनिष्ठ भुलतज्ञ, कनिष्ठ क्ष किरण शास्त्रज्ञ, कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ, या पदाकरीता वेळोवेळी जाहिरात देऊन मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड करण्यात येऊन सुरुवातीस एक वर्ष कालावधीकरीता रु. २७,०००/- एकत्रित वेतनावर नेमणूका देण्यात येते. परंतु यापैकी काही उमेदवार कामावर हजर होत नाही व

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



जे उमेदवार कामावर हजर होतात ते ०१ वर्ष पुर्ण होणेआधीच इतर ठिकाणी जास्त वेतन मिळाल्यास संस्थान सेवेचा राजीनामा देऊन जातात.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. १७/०५/२००९ रोजीचे सभेतील निर्णयानुसार संस्थानचे आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. यानुसार रुग्णालयांतील कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी, आर.एम.ओ., रक्त संक्रमण अधिकारी या पदासाठी सुधारित वेतनबॅन्ड रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे ५४००+ महागाई व इतर अनुज्ञेय भत्ते मिळून एकूण रु. २८,२१०/- इतके वेतन देय होते.

त्यानुसार दि. ०९/०८/२००९ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णय क्र. ७२६ नुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयांकडे तात्पुरती नेमणूकीस असलेले व येथून पुढे नविन नियुक्त होणारे आर.एम. ओ./ सी.एम.ओ. यांना रु. २७,०००/- फिक्स पे द्यावा व तातडीने जाहिरात देऊन एमबीबीएस आर एम ओ/ सी.एम.ओ. भरती करावेत. तसेच यापूर्वी ज्यू. कन्सलटंट यांना २५,०००/- व सिनिअर कन्सलटंट यांना रु. ३०,०००/- एकत्रित वेतन देण्यात येते. त्याऐवजी अनुक्रमे रु. ३०,०००/- व रु. ३५,०००/- देण्यात यावेत, असे ठरले. त्यानुसार तात्पुरते नेमणूकीस असलेले व नविन नियुक्त होणारे आर.एम.ओ./ सी.एम.ओ. यांना रु. १७,०००/- ऐवजी रु. २७,०००/- व सिनिअर कन्सलटंट यांना रु. ३०,०००/- ऐवजी रु. ३५०००/- फिक्स पे देण्यात येत आहे. तसेच पूर्वी कार्यरत असलेले कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी यांना रु. २८,२१० + १,७९०/- वैयक्तिक वेतन मिळून एकूण रु. ३०,०००/- वेतन देण्यात आले. त्यानंतर नवीन नेमणूक करण्यात आलेल्या कनिष्ठ वैद्यकिय अधिकाऱ्यांना प्रतिमहा रु. २७,०००/- एकत्रित वेतन देण्यात येत आहे.

त्यानंतर शासन अधिसुचना क्र. वेपूर १२०९/प्र.क्र. १५३/सुधारणा / ५ सेवा-९, मंत्रालय मुंबई दि. ०४/११/२००९ अन्वये व मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८/०४/२०१० रोजीचे सभेतील निर्णयानुसार कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी, आर.एम.ओ., रक्त संक्रमण अधिकारी या पदाचे वेतनबॅन्ड रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे ५४०० मध्ये सुधारणा करुन वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१००+ ग्रेड पे ५४०० असा करण्यात आला. तसेच महाराष्ट्र शासन सार्वजनीक आरोग्य विभाग शासन निर्णय म.वै.अ.- १००९/२३३/प्र.क्र.४५५/०९ सेवा ३ मंत्रालय मुं. ३२ दि. ०१/०४/२०१० व मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०८/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६५८ अन्वये दोन्ही रुग्णालयातील वैद्यकिय अधिकारी यांना दि. ०१/०४/२०१० पासून सहाव्या वेतन आयोगातील व्यवसाय रोध भत्ता मंजूर करण्यात आला.

कनिष्ठ भुलतज्ञ, कनिष्ठ क्ष किरण शास्त्रज्ञ, कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ, कनिष्ठ शरीरविकृती शास्त्रज्ञ या पदावर एम बी बी एस + संबंधीत विषयातील डीप्लोमा ही शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांना नेमणुक देण्यात येते व आर.एम.ओ./सी.एम.ओ. या पदावर एम बी बी एस ही शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांना नेमणुक देण्यात येते. कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी यांचे कामाचे स्वरुपात व एम बी बी एस शैक्षणिक पात्रता धारक आर.एम.ओ./सी.एम.ओ यांचे कामाचे स्वरुपात फरक असल्याने, कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांना रु. ३२,०००/- प्रतिमाह एकत्रित वेतन द्यावे जेणेकरुन कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी अल्प कालावधीत संस्थान सेवा सोडुन जाणार नाहीत असे प्र वैद्यकीय संचालक यांनी सुचविले आहे.

कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी (कनिष्ठ भुलतज्ञ, कनिष्ठ क्ष किरण शास्त्रज्ञ, कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ, कनिष्ठ शरीरविकृती तज्ञ इ.) यांचे मंजुर आकृतीबंधानुसार सध्यस्थितीत वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु. ५४०० नुसार होणारे देय वेतन खालीलप्रमाणे आहे.

वेतनबॅंन्ड रु. १५६००-३९१००, ग्रेड वेतन रु. ५४००/-

| | |
|---|---|
| सुरुवातीचे मुळ वेतन | - रु. १५६००/- |
| ग्रेड वेतन | - रु. ५४००/- |
| महागाई भत्ता | - रु. १०७१०/- (मुळ वेतन + ग्रेड वेतनचे ५१ %) |
| व्यवसाय रोध भत्ता | - रु. ५२५०/- (मुळ वेतन + ग्रेड वेतनचे २५ %) |
| **एकुण** | **- रु. ३६९६०/-** |
| सध्याचे एकत्रित वेतन | - रु. २७०००/- |
| प्रस्तावित एकत्रित वेतन | - रु. ३२०००/- |

प्रस्तावीत व सध्याचे एकत्रित वेतनातील फरक - रु. ५०००/-

सध्या तात्पुरती नेमणूक असलेले ०४ कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी यांना प्रतिमाह रु. २७०००/- ऐवजी रु. ३२०००/- एकत्रित वेतन दिल्यास वर्षीक रु. २,४०,०००/- इतका आर्थीक भार पडेल.

तरी सध्या तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असलेले व येथून पुढे नवीन नेमणुक होणाऱ्या कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांना देण्यात येणारे एकत्रित मासिक वेतन रु. २७,०००/- ऐवजी रु. ३२,०००/- प्रतिमाह एकत्रित वेतन देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असलेले व येथूनपुढे नविन नेमणूक होणाऱ्या कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी (कनिष्ठ भुलतज्ञ, कनिष्ठ क्ष किरण शास्त्रज्ञ, कनिष्ठ**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**अतिदक्षता तज्ञ, कनिष्ठ शरिर विकृती तज्ञ इ.) यांना देण्यात येणारे एकत्रित मासिक वेतन रु. २७,०००/- ऐवजी रु. ३२,०००/- प्रतिमाह एकत्रित वेतन देण्यात यावे असें ठरलें.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/अधिक्षक आस्थापना)

---

**विषय नं.२८** **साईनगर कर्मचारी वसाहत परिसरातील साईचिंतन बी टाईप साईनगर,समर्पण व साईध्यान इमारतीच्या भोवताली पेव्हींग ब्लॉक बसविणे बाबत**

**प्रस्ताव-** संस्थानचे साईनगर कर्मचारी वसाहत परिसरातील इमारतींच्या भोवताली जमिनीला घुशींनी बिळे केली आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी जमिन भूसभुसीत होऊन घुशीनी माती उकरुन बाहेर काढली आहे. नुकतेच सदरहू ठिकाणची ड्रेनेज लाईन दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आह. इकडील विभागामार्फत साईनगर परिसरात A- टाईप स्टाफ क्वार्टर परिसराभोवती पेव्हीग ब्लॉक बसविणेत आलेले आहेत. त्याचप्रमाणे उर्वरीत साईचिंतन B टाईप, साईनगर, सर्मपन व साईध्यान इमारतींचे भोवती गवत वाढलेले असल्याने सदरहू ठिकाणी आरोग्य विभागाचे कर्मचारी यांना साफसफाई करणेस अडचण होते. पावसाळ्याच्या दिवसात चिखल होतो व पावसाचे पाणी साचून डासांचा प्रादुर्भाव वाढतो. त्यामुळे पावसाचे पाण्याचा निचरा योग्य प्रकारे व्हावा, तसेच गवत वाढू नये, साफ- सफाई करणे सोयीचे व्हावे याकरीता उर्वरीत साईनगर येथील इमारतींचे बाजूस पेव्हींग ब्लॉक बसवून घेता येतील.

**कामाचा तपशिल :-** साईचिंतन B टाईप, साईनगर, सर्मपन व साईध्यान इमारतींचे पुढील व मागील परिसरात खोदाई करुन मुरुम फिलींग, सोलींग करुन त्यावर पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी अपेक्षीत खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**कामासाठी अपेक्षित खर्च (DSR-२०१०-२०११ नुसार )**

| Sr. No. | Description | Qty. | unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Excavation in Soil | 864.90 | Cum | 73.00 | 63137.70 |
| 2 | Carting away Excavated Soil | 864.90 | Cum | 71.96 | 62238.20 |
| 3 | Rubble soling 9 | 663.09 | Cum | 444.41 | 294683.82 |
| 4 | Plinth filling | 432.45 | Cum | 225.03 | 97314.22 |
| 5 | Paving Block | 2883.00 | Sqm | 520.00 | 1499160.00 |
| | | **Total Rs R/o :** | | | **2016534.00** |

सदरचे काम ठेकेदारांकडून विहित पध्दतीने निविदा मागवून करुन घेता येईल. तरी वर नमूद केलेप्रमाणे साईनगर परिसरातील उर्वरीत इमारतींचे भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेसाठी येणारे रक्कम रू २०,१६,५३४/- मात्रचे खर्चास व सदर कामांसाठी वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर परिसरातील उर्वरीत इमारतींचे भोवती पेव्हींग ब्लॉक ऐवजी फरशी बसविल्यास अथवा कॉंक्रिटींग केल्यास यापैकी ज्या पर्यायासाठी कमी खर्च येत असेल, त्याकरिता निविदा मागवाव्यात, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२९** **समाधी मंदिर परिसरातील पुरातन इमारतीचे सदृढीकरणाबाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री साई समाधी मंदिर परिसरात, समाधी मंदिर, व्दारकामाई, गुरुस्थान, चावडी व दिक्षीत वाडा अशा जुन्या व पुरातन इमारती आहेत. सन १९९९ मध्ये तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळाचे निर्णयानुसार, समाधी मंदिर परिसरातील पुरातन इमारतींचे सुशोभिकरण व सुदृढीकरण प्रकल्पांतर्गत, पुरातन वास्तुशास्त्राचे अभ्यासक व तज्ञ श्री. सदाशिवराव गोरक्षकर, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली, जुन्या व पुरातन इमारतींचे आयुष्य वाढविणेकामी एक विशिष्ट प्रकारची रासयनिक प्रक्रिया करुन या इमारतींचे आतील व बाहेरील बाजूने पॉलिमर कोटींग करणेत येऊन इमारतींचे सुदृढीकरण करणेत आले होते.

समाधी मंदिर परिसरातील मुख्य समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, दिक्षित वाडा या इमारती पुरातन तर आहेत पण त्यांना विशिष्ट धार्मिक व ऐतिहासिक संदर्भ असल्याने, संस्थान व्यवस्थापनामार्फत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग या शीर्षाखालील कलम २१(१) (क) नुसार, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन पाहणे हे उचित ठरते.

गेल्या १० वर्षापासून वाढत्या भक्तांच्या गर्दीमुळे सदर इमारतींच्या ठिकाणी भक्तांचा वावर / हालचाल वाढलेली असल्याने तसेच इमारतींचा असलेला दैनंदिन मोठया वापरामुळे वर नमुद केलेल्या मंदिर परिसरातील इमारतींचे आतील व बाहेरील दोन्हींचे पॉलिमर कोटींग जीर्ण (खराब) झालेले असल्याने, मंदिर परिसरातील खाली नमुद केलेल्या इमारतींची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक आहे-

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



०१. श्रींचे समाधी मंदिरातील तळमजल्यावरील आतील बाजूचे भिंतीचे व बाहेरील बाजूचे तसेच छतावरील कळसाखालील चौथऱ्याचे सुदृढीकरण करणे.
०२. श्रींची व्दारकामाई व श्रींची चावडी या इमारतींचे आतील व बाहेरील बाजुने सुदृढीकरण करणे
०३. शामसुंदर हॉलचे बाहेरील बाजूचे सुदृढीकरण करणे.
०४. दिक्षित वाडा या इमारतीचे आतील व बाहेरील बाजूचे सुदृढीकरण करणे.

**(ब)** उपरोक्त परिच्छेदात नमुद केलेल्या इमारतींचे सुदृढीकरणाकरीता खालीलप्रमाणे पॉलिमर कोटींग करता येईल :

०१. पॉलिमर कोटींग करावयाचे ठिकाणचे सर्व पृष्ठभाग प्रथमतः ब्रशने, हवेच्या दाबाने पाणी मारुन स्वच्छ करणे.
०२. इमारतींचे भिंतीचे पृष्ठभागावर असलेले छोटी-छोटी छिद्रे, चिरा पॉलिमर मॉर्टरने भरणे.
०३. सिमेंट व पॉलिमर या उचित क्षमतेचे मिश्रण तयार करुन, भिंतींना दोन स्तराचे पॉलिमर कोटींग करणे.

अशा प्रकारचे पॉलिमर कोटींग साठी अंदाजे रुपये १० लाख मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर कामासाठी या क्षेत्रातील अनुभवी ठेकेदारांकडून विहीत पध्दतीने निविदा मागवून काम पूर्ण करुन घेता येईल. आवश्यकता भासल्यास, याकामी या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन घेता येईल. तरी याकामी विहीत पध्दतीने निविदा मागवून काम करुन घेणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे इमारतींचे सुदृढीकरणाकरीता पॉलिमर कोटींग करणेकामी सल्लागार नेमून त्यांचे सल्ल्याने विहीत पध्दतीने निविदा मागवून काम करुन घेणेस व याकामी येणाऱ्या योग्य त्या अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**दिनांक २४.०९.२०११ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाची कामापूरती नक्कल-**

**विषय नं.३०** **श्रीमती फातमाबी बक्षू शेख व कै.श्रीमती ठकूबाई एकनाथ शेलार यांचेतर्फे अशोक शेलार यांनी त्यांची मौजे शिर्डी येथील स.न.३/२ व ३/३ मध्ये भूसंपादीत होणाऱ्या जागेच्या बदल्यात दोन दूकानगाळे मिळणेबाबत अर्ज.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्रीमती फातमाबी बक्षू शेख व कै. श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार यांचेतर्फे अशोक शेलार यांनी मा. शंकररावजी कोल्हे, उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडेस आजच्या सभेत ठरल्याप्रमाणे या विषयांस अनुसरुन खालीलप्रमाणे मजकुर असलेला अर्ज दिला आहे:

.. .. आम्ही ठकुबाई शेलार व फातमाबी शेख रा. शिर्डी सर्वे ३/२ व ३/३ येथे सिटी सर्व्हे नं. ९०९ रहिवासी असुन तेथे आमचे व्यवसाय चालतो व ती जागा साईबाबा संस्थान यांस द्यावयास तयार आहे. त्याबदल्यात आम्हां दोघांना त्याच ठिकाणी १० बाय १० या आकाराचे दोन गाळे पुढील बाजूस द्यावे. हिच आमची साईचरणी प्रार्थना. आपल्या सहकार्याच्या अपेक्षेने.

सदर विनंती अर्जास अनुसरुन, मा. उपाध्यक्षसाो. यांनी दिनांक ३१ जुलै, २०११ रोजीचे पत्राने, तसेच मा.अध्यक्षसाो. यांनी सदरहू विषय सभेपुढे ठेवावा, अशी सुचना दिलेली आहे.

**(ब)** **विषयाची पूर्वपीठीका व सद्यःस्थिती :**

**०१.** सर्व्हे नंबर ३/२ व ३/३ चा ७/१२ उतारा पाहिला असतां, खालीलप्रमाणे वस्तुःस्थिती आहे :

| अ.नं. | सर्व्हे नंबर | सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्र | खातेदाराचे नांव |
|---|---|---|---|---|
| ०१ | ३/२ | ९०९ पैकी | १५० चौमी | श्रीमती फातमाबी बक्षू शेख |
| ०२ | ३/३ | ९०९ पैकी | ०५० चौमी | श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार (आता मयत) |

सदरची जागा नवीन पिंपळवाडी रस्त्यालगत, संस्थानचे स्वच्छतागृहाचे लगत पुर्वेस आहे. सदर जागेच्या दक्षिणेस संस्थानची मोकळी जागा सर्व्हे नंबर ३ असून, या जागेतील स्वच्छतागृहाकडे जाणेसाठी असलेल्या रस्त्याचा वापर अर्जदार श्रीमती शेख व श्रीमती शेलार करतात. त्यांचे जागेकडे जाणेसाठी स्वतंत्र सार्वजनिक रस्ता नाही. अर्जदार हे उपरोक्त जागी राहून व्यवसाय करतात हे खरे आहे परंतु कोणता व्यवसाय करतात याचा उल्लेख अर्जात नाही.

**०२.** मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, उपरोक्त खातेदाराच्या जमिनी भूसंपादनाने घेणेबाबत इकडील पत्र क्रमांक एसएसएस / वशी / बांधकाम / भूसंपादन / ५६७५ / २००६, दिनांक ०१ मे, २००६ रोजी भूसंपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस पाठविणेत आलेला होता. त्यांनी मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना भूसंपादन अधिकारी म्हणून प्राधिकृत केलेले आहे. भूसंपादन अधिकारी यांनी भूसंपादन कायद्यातील तरतुदीनुसार भूसंपादन प्रस्तावाची कार्यवाही अंतिम केलेली असून, त्यांनी क्रमांक एलएक्यु/एसआर/ ४३/२००६-कावि/भूसं-२/४०/२००९ दिनांक २७ जानेवारी, २००९ रोजी उपरोक्त जमिनीचा भूंसपादनाचा अंतिम निवाडा जाहिर केला आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**०३.** भूसंपादनातील खातेदारांनी जमीन भूसंपादनाने घेता येत नाही असा व इतर मुद्दे मांडून मा. दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, कोपरगांव यांचे न्यायालयात रे.मु. नं. ५१/२००८ दाखल केला होता. ताबा घेण्याची प्रक्रिया चालू असतांना मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोपरगांव यांनी दिनांक ११ फेब्रुवारी, २००९ रोजी जैसे थे स्थिती ठेवणेबाबत आदेश दिला. त्यामुळे मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना भूसंपादित होणाऱ्या जमिनीचा ताबा घेता आला नाही व संस्थानला ताबा देता आला नाही.

**०४.** या भूसंपादन प्रस्तावापोटी आजअखेर नुकसानभरपाई व आस्थापना खर्चापोटी रक्कम रुपये ७, ६१,९१४/- मात्र इतका खर्च होणार आहे. सदर नमूद केलेला खर्च हा निवाडयानुसार गृहीत धरलेला असून, मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचेकडेस या भूसंपादनापोटी एकूण रक्कम रुपये १२,९३,४९३/- मात्र दिनांक ०६ ऑक्टोबर, २००६ रोजी जमा करण्यात आलेले आहेत. अर्जदाराने न्यायालयात दावा केला असल्याने, सदर रक्कमेवर व्याजही मिळकत नाही व भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण न झाल्याने रक्कम ही परत मिळत नाही.

**०५.** भूसंपादन अधिकारी यांनी दिनांक ०७ जानेवारी, २००९ रोजी जाहिर केलेल्या निवाडयात, पान क्रमांक ०६ वर असे नमुद केले आहे की, .. .. सदरच्या जमिनी निवासासाठी बिनशेती झालेल्या आहेत. परंतु जमीनमालकांनी या जागेचा वापर अनाधिकृत व्यावसायिक कारणासाठी सुरु केलेला आहे, त्यामुळे सदर जमिनीचा वापर व्यवसायासाठी करीत आहोत, हे अर्जदाराचे म्हणणे विचारात घेणे योग्य होणार नाही.

**०६.** भूसंपादन अधिकारी यांनी दिनांक २७ जानेवारी, २००९ रोजी जाहिर केलेल्या भूसंपादनाचे निवाडयानुसार, अर्जदार यांना खालीलप्रमाणे नुकसान भरपाई / मोबदला रक्कम प्राप्त होणार आहे :

| अ.नं. | सर्व्हे नंबर | सिटी सर्व्हे नं. | संपादीत होणारे क्षेत्र | खातेदाराचे नांव | मिळणारी नुकसान भरपाई / मोबदला रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ३/२ | ९०९ पैकी | १५० चौमी | श्रीमती फातमाबी बक्षू शेख | **०५,३८,२०२/-** |
| ०२ | ३/३ | ९०९ पैकी | ०५० चौमी | श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार | **०१,८९,८७०/-** |

**०७.** उपरोक्त दाव्याचे कामकाज सुरु असतांना अर्जदार यांनी दिलेल्या तडजोडीच्या अर्जावर, संस्थान वकील ॲड. एस. डी. कुलकर्णी यांचा अभिप्राय घेऊन, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ मार्च, २०१० रोजीचे सभेत विचारार्थ सादर करणेत आला होता, त्यावर निर्णय क्रमांक २८९ असा घेणेत आला की,

.. .. प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे ॲड. एस. डी. कुलकर्णी यांनी दिनांक १५ नोव्हेंबर, २००९ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार, सदरहू प्रकरणी वादी श्रीमती फातिमा बक्षू शेख व श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार यांनी दाखल केलेला रेग्युलर मुकदमा नंबर ५१/२००८ हा दावा समेटासाठी (तडजोडीसाठी ) लोकन्यायालयात सादर करणे उचित होणार नाही. त्यामुळे संस्थान वकीलांना सदरहू दाव्यात प्रतिवादी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेतर्फे युक्तीवाद पूर्ण करुन दाव्याची कार्यवाही पूर्ण करणेस मान्यता देण्यात आली.

**०८.** मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोपरगांव यांनी उपरोक्त खातेदारांनी त्यांचे न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याचा निकाल दिनांक १८ फेब्रुवारी, २०११ रोजी निकाल दिलेला असून, त्यामध्ये वादीचा अर्ज रद्द करणेत येत आहे, असे नमुद केलेले आहे. सदर निकालानुसार, मा. भूसंपादन अधिकारी यांना भूसंपादन निवाडयास अनुसरुन लवकरात लवकर ताबा द्यावा म्हणून विनंती पत्र देणेत आलेले होते. तथापि, त्यानंतर अर्जदार यांनी मा. जिल्हा न्यायाधीश, कोपरगांव यांचे न्यायालयात अपिल क्रमांक १२/२०११ ने दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्यात मा. न्यायालयाने, जैसे थे स्थिती ठेवणेबाबत अंतरिम आदेश दिलेला आहे.

**(क)** आता, अर्जदार यांनी दाव्याचा निकाल विरोधात गेल्यामुळे, परिच्छेद ब मध्ये नमुद केल्याप्रमाणे, त्यांचे भूसंपादीत होणारे जागेवर, जागेच्या बदल्यात १० फुट बाय १० फुट दोन दुकान गाळे बांधून मिळावेत म्हणून विनंती केलेली आहे तसेच दुसऱ्या बाजूस मा. जिल्हा न्यायाधीश, कोपरगांव यांचे न्यायालयात अपिल ही दाखल केलेले आहे.

अर्जदार यांची उपरोक्त विनंती मान्य करण्यापुर्वी खालील बाबींवर विचार होणे उचित राहील:

**०१.** अर्जदार यांचे सर्व्हे नंबर ३/२ व ३/३ मधील एकत्रित ०२ आर जागेकडे जाणेसाठी स्वतंत्र सार्वजनिक रस्ता नाही, सध्या ते लगतच्या संस्थान मालकीच्या सर्व्हे नंबर ३ मध्ये बांधणेत आलेल्या शौचालयाकडे जाणाऱ्या व लगत असलेल्या रिकाम्या जागेचा रस्ता म्हणून वापर करतात. संस्थान या जागेस संरक्षक भिंत बांधल्यास अर्जदार यांना त्यांचे जागेकडे जाणेस रस्ता राहत नाही.

**०२.** मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर तथा भूसंपादन अधिकारी यांनी त्यांचे दिनांक २७ जानेवारी, २००९ रोजीचे अंतिम भूसंपादन निवाडयात, अर्जदार यांनी उपरोक्त जागेत सुरु केलेले व्यवसाय अनाधिकृत असलेबाबत स्पष्ट केले आहे.

**०३.** अर्जदार यांनी यापुर्वी मुलांना नोकरी द्यावी, तडजोड करावी या आशयाचे दिलेले अर्ज तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळाने तसेच मा. विद्यमान व्यवस्थापन समितीने फेटाळलेले आहेत. अर्जदार यांनी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळाकडे स्वतःहून जमीन विकत घ्यावी म्हणून सशर्त अर्ज दिलेला होता. तथापि, तो मान्य न झाल्याने उपरोक्त जमीन भूसंपादनाने घेणेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे.

**०४.** अर्जदार यांनी दिनांक २७ फेब्रुवारी, २०११ रोजीचे अर्जात, १० फुट बाय १० फुट आकाराचे दोन दुकानगाळे बांधून मिळावेत म्हणून विनंती केली आहे. वास्तविक पहातां, संस्थानने त्यालगत असलेले आपले क्षेत्र सलग होईल यादृष्टीने तसेच त्याठिकाणी भूसंपादनाचे प्रयोजनात नमुद केलेप्रमाणे विद्युत विभागाचे कार्यालय अथवा लाडू प्रसाद बनविणे अथवा इतर भक्तोपयोगी बांधकामासाठी भूसंपादीत करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे अर्जदार यांचे मागणीप्रमाणे त्यांना तेथे दोन दुकानगाळे बांधून देणेचे ठरविले तर भूंसपादनाचा मुळ हेतूच संपुष्टात आल्यासारखे होईल. तसेच तेथे दुकानगाळे बांधून दिल्यास, त्यांना संस्थान मालकीच्या जमिनीतून रस्ता द्यावा लागेल व त्याठिकाणी सार्वजनिक वहिवाट सुरु होईल.

**०५.** अर्जदार यांनी १० फुट बाय १० फुट आकाराचे दोन दुकानगाळे, म्हणजेच २०० चौरस फुट व्यावसायिक उपयोगी बांधकाम करुन मागितले आहे. त्यानुसार येणारा खर्च व भूसंपादनाचे माध्यमातून त्यांना देण्यात येणारी मोबदला रक्कम याचा तुलनात्मक माहिती खालीलप्रमाणे :

| अ.नं. | सर्व्हे नंबर | संपादीत होणारे क्षेत्र | खातेदाराचे नांव | खातेदारांना मिळणारी नुकसान भरपाई / मोबदला रक्कम रुपये | संस्थानमार्फत गाळा बांधणेसाठी देण्यात येणाऱ्या क्षेत्राची अंदाजे किंमत रु. | बांधकामाचा खर्च अंदाजे रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ३/२ | १५० चौमी | श्रीमती फातमाबी बक्षू शेख | **०५,३८,२०२/-** | ८०,०००/- | १,२०,०००/- |
| ०२ | ३/३ | ०५० चौमी | श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार | **०१,८९,८७०/-** | ८०,०००/- | १,२०,०००/- |

जमिनीची किंमत व बांधकामासाठी येणारा खर्च विचारात घेता, संस्थानला दोन गाळयांसाठी रुपये ४ लाख मात्र खर्च येणार आहे. तसेच भूसंपादनासाठी आलेला आस्थापना खर्च रुपये २१,८४२/- मात्र विचारात घेतां, एकुण रुपये ४,२१,८४२/- मात्र इतका खर्च येणार आहे. तसेच अर्जदारांनी त्यांना मिळणारी नुकसानभरपाईची रक्कम संस्थानला देणार किंवा कसे याबाबत अर्जात काहीच उल्लेख केलेला नाही. थोडक्यात, त्यांना नुकसान भरपाई तसेच संस्थानकडून दुकानगाळे ही बांधून हवे आहेत, असा दुहेरी फायदा अपेक्षित आहे. तसेच जमिनीचा ताबा सोडतां, इतर भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली असल्याने शासनास आस्थापना खर्च रक्कम रुपये २१,८४२/- मात्र द्यावेच लागणार आहेत, ते माफ होणार नाहीत.

**०६.** अर्जदार यांचा त्यांचे भूसंपादीत होणारे जागेच्या मोबदल्यात दुकानगाळे बांधून मिळावेत असा सर्वसाधारण हेतू आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील तरतुदीनुसार, सदर दुकानगाळे व जागा हस्तांतरीत करणेसाठी मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घ्यावी लागेल व त्यासाठी किती अवधी लागेल हे सांगता येणार नाही.

**०७.** श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार यांना संस्थानने पाठविलेले पत्र, मयत असा पोष्टाचा शेरा मारुन परत आलेले आहे. त्यामुळे त्यांनी श्री. अशोक एकनाथ शेलार यांना करुन दिलेले मुखत्यारपत्र आपोआप संपुष्टात आलेले आहे. अशा परिस्थितीत अशोक शेलार यांनी केलेला अर्ज अवैध होत आहे.

**०८.** अर्जदार यांच्या विनंतीप्रमाणे गाळे बांधून देण्याचा निर्णय झाला तर, येथूनपुढील भूसंपादनाच्या प्रकरणांमध्ये अशा प्रकारची मागणी भूसंपादनाने बाधित होणारे खातेदार करण्याची शक्यता आहे. त्यामुळे इतर भूसंपादन प्रस्तावाच्या कार्यवाहीमध्येही ही बाब अडथळा निर्माण करु शकते.

**०९.** मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोपरगांव यांनी उपरोक्त खातेदारांनी त्यांचे न्यायालयात दाखल केलेल्या दावा क्रमांक ५१/२००८ चा निकाल दिनांक १८ फेब्रुवारी, २०११ रोजी निकाल दिलेला असून, त्यामध्ये वादीचा अर्ज रद्द करणेत येत आहे, असे नमुद करुन दावा फेटाळलेला आहे व त्यावर संबंधित खातेदारांनी आता अपिल केलेले असून, अपिलाचा क्रमांक १२/२०११ असून तो न्याय प्रविष्ट आहे.

**(ड)** उपरोक्त परिच्छेद क मध्ये नमुद केलेल्या बाबींचा तपशील विचारात घेतां, अर्जदार श्रीमती फातमाबी बक्षू शेख व श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार (मयत) यांचेतर्फे श्री. अशोक शेलार यांची विनंती मान्य करणे उचित होणार नाही. तथापि, विषयांकित अर्जदार यांचा भूसंपादीत होणाऱ्या जमिनीच्या ठिकाणी १० फुट बाय १० फुट या आकाराचे दोन दुकानगाळे बांधून देणेबाबतची विनंती मान्य करणेत यावी किंवा कसे व त्याबाबतच्या अटी - शर्ती काय असाव्यात, याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती फातमाबी बक्षू शेख व कै.श्रीमती ठकूबाई एकनाथ शेलार यांचेतर्फे अशोक शेलार यांना त्यांचे मौजे शिर्डी येथील स.न.३/२ व ३/३ मध्ये भूसंपादीत**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**होणाऱ्या जागेच्या बदल्यात मानवतेच्या दृष्टीकोनातून दोन दूकानगाळे योग्य त्या ठिकाणी देणेस मान्यता देण्यात आली. याबाबत मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर तथा भूसंपादन अधिकारी यांचेशी चर्चा करावी व दुकानगाळे व जागा हस्तांतरीत करणेसाठी अधिनियमातील तरतूदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३१** **श्री नानासाहेब भिमराज चौधरी व इतर ३ यांची मौजे नांदूर्खी बुद्रुक हद्दीतील गट नं. ३४३ मधील एकुण क्षेत्र ०६ हे ०४ आर (पोटखराब्यासह) खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री. नानासाहेब भिमराज चौधरी व इतर ०३ यांनी दिनांक २२ ऑगष्ट, २०११ रोजीचे अर्जाने त्यांच्या मालकीची मौजे नांदुर्खी बुद्रूक हद्दीतील खाली नमूद केलेप्रमाणे एकुण ०६ हे ०४ आर (पोटखराबासह) जमीन रुपये ८०,००,०००/- मात्र (रुपये ऐंशी लाख मात्र) प्रति एकर या दराने संस्थानने खरेदी करावी म्हणून विनंती केली आहे.

अर्जासोबत जोडलेल्या ७/१२ व खाते उतारा ८ अ चे छायांकित प्रतीचे अवलोकन केले असतां, खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे :

| अ. नं. | खातेदाराचे नांव | गट नंबर | क्षेत्र व आकार | इतर हक्कातील नोंदी व पीकपहाणी |
|---|---|---|---|---|
| ०१ | **नानासाहेब भिमराज चौधरी** | **३४३** | ०१ हे ३४ आर<br>०० हे ०८ आर पोख<br>**०१ हे ४२ आर**<br>आकार रु.०३=०६ | ०१. धारणा प्रकार - भोगवटा वर्ग -१.<br>०२. नांदुर्खी बु ाा वि.का.स.सो. इ. प. क. घे.<br>०३. स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शाखा शिर्डी नजरगहाण खत करोन घेणार.<br>०४. नविन विहीर ता.१९.३.९३<br>०५. पीकपहाणीस खुद्द वस्तीपड ०-०४ / सोयाबीन १-३० |
| ०२ | **बाबासाहेब भिमराज चौधरी** | **३४३/२** | ०१ हे ३४ आर<br>०० हे ०८ आर पोख<br>**०१ हे ४२ आर**<br>आकार रु.०३=०५ | ०१. धारणा प्रकार - भोगवटा वर्ग -१.<br>०२. चेअरमन, राहाता मर्चन्ट नागरी सह. पतसंस्था, राहाता गहाण खत क. घे. रु. २५०००/-<br>०३. बँक ऑफ महाराष्ट्र शाखा शिर्डी ग.ख.क. घे.<br>०४. राहाता मर्चन्ट ना. सह. पत राहाता गहाणखत क. घे. बाबासाो.<br>०५. पीकपहाणीस खुद्द चिकु १-०० / पेरु ०-३० / वस्तीपड ०-०४ |
| ०३ | **सरुबाई भिमराज चौधरी** | **३४३/३** | ०१ हे ६० आर<br>०० हे ०० आर पोख<br>**०१ हे ६० आर**<br>आकार रु.०४=५० | ०१. धारणा प्रकार - भोगवटा वर्ग -१.<br>०२. स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा शिर्डी नजर गहाण खत करोन घेणार.<br>०३. पीकपहाणीस खुद्द चिकु १-०० / पेरु ०-६० |
| ०४ | **मनिषा बाबासाहेब चौधरी** | **३४३/४** | ०१ हे ६० आर<br>०० हे ०० आर पोख<br>**०१ हे ६० आर**<br>आकार रु.०४=५० | ०१. धारणा प्रकार - भोगवटा वर्ग -१.<br>०२. बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा शिर्डी ग.ख.क. घे.<br>०३. पीकपहाणीस खुद्द चिकु १-०० / पेरु ०-५५ / वस्तीपड ०-०५ |
| | **एकुण (०१ ते ०४)** | | **०५ हे ८८ आर**<br>**०० हे १६ आर पोख**<br>**०६ हे ०४ आर** | |

(ब) जमिनीची भौगोलिक स्थिती :

मौजे नांदुर्खी गावच्या नकाशाचे अवलोकन केले असतां, विषयांकित क्षेत्र हे नांदुर्खी गावाचे दक्षिणेस, गावातील जमिनींच्या दक्षिणेकडील शेवटच्या टोकास आहे. विषयांकित जमिनी कोऱ्हाळे शिवेलगत असून, शिर्डीपासून साधारणतः ९ ते १० किलोमीटर अंतरावर आहेत. सदरच्या जमिनी या हरीत पट्टयात असून, तेथे बांधकाम अनुज्ञेय नाही. तसेच विषयांकित जमीन संस्थानला मौजे नांदुर्खी बुद्रूक ग्रामपंचायतीमार्फत नियोजित रुग्णालयासाठी मिळणाऱ्या जमिनीपासून अंदाजे १ ते १.५ किमी अंतरावर आहे.

(क) जमिनीची उपयुक्तता :

विषयांकित जमिनींचे ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असतां, गट नंबर ३४३/२, ३४३/३ व ३४३/४ मध्ये चिक्कु व पेरुची झाडे (बाग) आहे तर, गट नंबर ३४३ मध्ये विहीर आहे. त्यामुळे सध्या तरी सदर जमीन संस्थानला शेती म्हणून उपयोगात आणावी लागेल.

(ड) कायदेशीर बाबी :

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



०१. विषयांकित जमिनींच्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असतां, सकृतदर्शनी जमीन खरेदी करणेस कुठलीही कायदेशीर अडचण नाही.

०२. गट नंबर ३४३ मध्ये विहीर असून, गट नंबर ३४३, ३४३/२ व ३४३/४ चे पीकपहाणीस वस्ती पड म्हणून नोंदी आहेत, म्हणजेच त्याठिकाणी अर्जदारांची घरे आहेत. अर्जदार यांनी अर्जात जमिनी सध्या अस्तित्वात असणाऱ्या घरांसह विकणार किंवा कसे याबाबत उल्लेख केलेला नाही. त्यामुळे अर्जदार यांचेशी चर्चा करुन याबाबत निर्णय घ्यावा लागेल.

०३. गट नंबर ३४३, ३४३/२, ३४३/३ व ३४३/४ चे ७/१२ उताऱ्याचे इतर हक्कांत विविध वित्तीय संस्थांचा कर्जबोजा दर्शविला असून, अर्जदार यांनी सदर कर्जबोजा / थकबाकी स्वत: फेडणार की संस्थानने जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, त्यांना आदा करावयाच्या रक्कमेतून संस्थानने फेडावी, याबाबत अर्जात कुठलाही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे अर्जदार यांचेशी चर्चा करुन याबाबत निर्णय घ्यावा लागेल.

०४. जमिनी खरेदी करावयाचे ठरल्यास, संस्थान वकिलांमार्फत शोध अहवाल (सर्च रिपोर्ट) घेऊन, कायदेशीर बाबी तपासून जमिनीचे खरेदीची कार्यवाही पूर्ण करता येईल.

(इ) जमिनीचे किंमतीबाबत :

अर्जदारांनी अर्जात, रुपये ८० लाख प्रती एकर दर मिळावा, म्हणून अपेक्षा व्यक्त केलेली आहे, म्हणजेच अर्जदार यांना रुपये २ लाख प्रती आर दर अपेक्षित आहे.

सन २०११ च्या जमिनीचे शासकीय मुल्यांकन दरसुचीनुसार, मौजे नांदुर्खी बुद्रूक हे गांव ग्रामीण क्षेत्रात नमूद केलेले असून, ते विभाग सात मध्ये समाविष्ट आहे. विषयांकित जमिनीचे लागवडीलायक क्षेत्र ०५ हे ८८ आर असून, आकार रुपये १५=११ पैसे मात्र आहे, म्हणजेच प्रति हेक्टर आकार रुपये २ = ५६ मात्र येत आहे, त्यानुसार सदर जमिनीचा दर रुपये १३,२०,०००/- मात्र प्रति हेक्टर म्हणजेच रुपये १३,२००/- मात्र प्रति आर येत आहे. जमीन बागायत असल्याने, जिरायत जमिनीचे दुप्पट दर गृहीत धरणेत येतो, त्यानुसार विषयांकित जमिनीमध्ये चिक्कू, पेरुची झाडे, विहीर असल्याने ती बागायत आहे, त्यामुळे सदर जमिनीचा शासकीय मुल्यांकन दर रुपये २६,४००/- मात्र प्रति आर हा दर येत आहे. त्यामुळे अर्जदार यांचेशी चर्चा करुन जमिनीचा खरेदी दर ठरविणे उचित होईल.

उपरोक्त विवेचनास अनुसरुन, खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती :

श्री. नानासाहेब भिमराज चौधरी व इतर ३ यांची मौजे नांदुर्खी बुद्रूक, ाालुका राहाता येथील गट नंबर ३४३ एकूण ०६ हे ०४ आर (पोटखराबासह) जमीन खरेदी करणेत यावी किंवा कसे.

जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, जमिनीचे किंमतीबाबत अर्जदार यांचेशी चर्चा-तथा-वाटाघाटी करुन जमिनीचा प्रती आर दर ठरविणे.

जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, खरेदीखत नोंदविणे, जमिनीची सरकारी मोजणी करणे, मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे आदि अनुषंगिक खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री नानासाहेब भिमराज चौधरी व इतर ३ यांची मौजे नांदूर्खी बुद्रुक हद्दीतील गट नं. ३४३ मधील एकूण क्षेत्र ०६ हे ०४ आर (पोटखराब्यासह) जमिनीची व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०४.२०१० चे सभेतील निर्णय क्र.४४५(०१) अन्वये जमीन खरेदीकामी मा.विश्वस्त शैलश श्रीहरी कुटे यांचे अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीतील सदस्यांनी समक्ष पहाणी करुन आपला अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३२** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे निधीतून पिंपळवाडी रस्ता कॉंक्रीटीकरण करणेकामी सल्लागार नियुक्त करणे व निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** मा.व्यवस्थापन समितीने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार शिर्डी नगरपंचायत हद्दीतील विविध एकुण २५ रस्त्यांची विकासकामे संस्थान निधीतुन प्रस्तावीत आहेत. प्रथम टप्प्यातील ११ रस्त्यांची सुमारे ८८ कोटी रकमेची कामे संस्थान व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत सुरु आहेत. त्यापैकी रुपये २८ कोटी खर्चास शासनमान्यता प्राप्त असून उर्वरीत रकमेस मान्यतेबाबत पाठपुरावा करणेत येत आहे. अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शिर्डी नगरपंचायतीची आहे. तथापी शिर्डी नगरपंचायतीची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने साईभक्तांकरीता आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देणसे शिर्डी नगरपंचायतीस कमकुवत अर्थिक परिस्थितीमुळे शक्य होत नाही, करिता त्या संस्थानमार्फत कराव्या लागत आहेत.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ जुलै २०१० रोजीचे सभेत उपरोक्त प्रकल्पांतर्गत विकसित करावयाच्या द्वितीय प्राधान्यगटातील रस्ते विकसित करणेस तसेच या रस्त्यांपैकी शिर्डी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



हद्दीतील १००० मीटर लांबीचा पिंपळवाडी रस्ता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे निधीतून विकसित करणेबाबत निर्णय झालेला आहे.

पिंपळवाडीकडे जाणारी, त्या भागातील सर्व हॉटेल्सकडे तसेच आठवडे बाजार, कालिकानगर, बिरेगांव रोड, भाजी मंडई, विरभद्र मंदिर याकडे जाणारी वाहतुक या रस्त्याने जाते. त्यावर पावसाच्या पाण्यामुळे व अवजड वाहतुकीमुळे खड्डे पडल्याने सदर रस्त्याची दुरवस्था झालेली आहे. सदरच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण केल्यास रस्ता भविष्यात लवकर खराब होणार नाही.

शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नविन पिंपळवाडी रस्ता या सुमारे ६०० मीटर लांब रस्त्याचे १५ मीटर रुंदीत संस्थानमार्फत सन २०१० मध्ये काँक्रीटीकरण करणेत आलेले आहे. त्याच पद्धतीने फुटपाथ व कॅरेज वे एकाच लेव्हलला ठेवून १००० मीटर अंतरात उपलब्धतेनुसार १२ मी. रुंदीत सध्याचा ५.५० मी. डांबरीकरण असलेल्या शिर्डी-पिंपळवाडी रस्त्याचे काँक्रीटीकरण करता येईल. सदरचे कामामध्ये प्रामुख्याने खालील कामांचा समावेश असेल.

०१. सध्याचे रस्त्याचे डांबरीकरण काढणे
०२. Granular sub base (G.S.B.)
०३. Wet mix macadam (०.१५m thk.)
०४. Dry lean concrete (D.L.C -०.१५m thk.)
०५. Pavement Quality Cement Concrete of M ३५ Grade (०.३० m thk.)
०६. फुटपाथचे कडेने कर्बस्टोन बसविणे.
०७. इरिगेशनाचे चारी क्रॉसिंगकरीता ९०० एमएम व्यासाचे पाईप टाकणे
०८. फुटपाथवर ६० एम एम जाडीचे M-३५ ग्रेडचे कॉंक्रीट पेव्हींग ब्लॉक बसविणे
०९. रस्त्यावर Thermoplastic Road मार्कींग करणे.
१०. चेंबर बांधणे.

रस्त्याचे दुतर्फा सर्व्हिस लाईन व स्टॉर्मवॉटर साठी पाईप लाईन टाकणे.

सदर रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे ढोबळमानाने प्राथमिक अंदाजपत्रक तयार करणेत आले असून याकामी रुपये चार कोटी मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे कामासाठी संस्थानमार्फत खर्च करणेकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधिल तरतुदीनुसार याकामी शासनाची मान्यता घ्यावी लागेल.

तरी सदरचे काम संस्थानमार्फत करणेकामी सल्लागार नेमुन सविस्तर आराखडे, अंदाजपत्रक तयार करुन विहीत पदधतीने निविदा मागवुन रस्ता विकसित करणेस तसेच याकामी येणारे अंदाजे रुपये चार कोटी मात्रचे खर्चास व शासनाचे मान्यतेकरीता प्रस्ताव पाठविणेस मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.७०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे निधीतून पिंपळवाडी रस्ता काँक्रीटीकरण करणेकामी युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा.लि., पुणे यांची यापुर्वी ठरविणेत आलेल्या २.५०% अधिक सर्व्हिस टॅक्स इतक्या फि वर नेमणूक करणेत यावी. त्यांचेमार्फत सविस्तर आराखडे, अंदाजपत्रक तयार करुन शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा. दरम्यान विहीत पध्दतीने निविदा मागविणेबाबत कार्यवाही करणेत यावी. विहीत पदधतीने निविदा मागवुन रस्ता विकसित करणेस तसेच याकामी येणारे अंदाजे रुपये चार कोटी मात्रचे खर्चास व शासनाचे मान्यतेकरीता प्रस्ताव पाठविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३३** **शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना व्दितीय प्राधान्यगटातील रस्त्याचे भुसंपादन व मोजणी खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व मा. शासनाचे मान्यतेनुसार, शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्ते विकसित करणेचे काम प्रगतीपथावर आहे. याकामी वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेत आलेला असून, तो शासनस्तरावर मान्यतेस्तव विचाराधीन आहे.

**(ब)** आता, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे विनंतीवरून द्वितीय प्राधान्यगटातील २४ रस्ते विकसित करणेस मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ जुलै, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५३८ नुसार मान्यता देणेत आली आहे.

शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी पुर्वी सुरु असणाऱ्या पत्रव्यवहारास अनुसरुन, जा. क्र. नपं/बांध/ कावि-५/ ९३/२०११, दिनांक २१ मे, २०११ रोजीचे पत्राने असे कळविले आहे की, .. दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील रस्त्यांकरीता क्षेत्र भूसंपादन व अस्तित्वातील रस्ते, शीव रस्ते मोजणी करणेकामी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



स्वतंत्र यंत्रणेची व्यवस्था संस्थानमार्फत झाल्यास भूसंपादन विकास कामास गती मिळेल व शहराचा विकास झपाटयाने होण्यास मदत होईल. तरी संस्थानमार्फत शिर्डी शहरातील दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील हाती घ्यावयाच्या रस्त्यांचे भूसंपादन व मोजणीची कामे सत्वर करणेसाठी व पाठपुरावा करणेकरीता स्वतंत्र यंत्रणेची नेमणूक व त्यासाठी आवश्यक निधी श्री साईबाबा संस्थानमार्फत मिळण्यास विनंती आहे.

थोडक्यात, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील प्रस्तावित रस्ते विकसित करणेसाठी, करावयाचे भूसंपादनाचे अनुषंगाने त्याबाबतची करावयाची कार्यवाही व मोजणीची कामे करणेसाठी स्वतंत्र यंत्रणेची आवश्यकता असून, या स्वतंत्र यंत्रणेची नेमणूक करणेसाठी आवश्यक असणारा निधी संस्थानमार्फत मिळावा, अशी अपेक्षा आहे.

उपरोक्त कारणांसाठी किती खर्च अपेक्षित याबाबतची विचारणा शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस दिनांक ०२ सप्टेंबर, २०११ रोजीचे पत्राने करणेत आलेली आहे.

प्रस्तावित रस्त्यांचे भूसंपादना संदर्भात, मा. महसूल मंत्री यांचे निर्देशनुसार, मा. उपसंचालक भूमि अभिलेख, संलग्न जमाबंदी आयुक्त, भूमापन, पुणे यांनी त्यांचेकडील दिनांक १३ सप्टेंबर,२०११ पत्रानुसार, मौजे शिर्डी विकास आराखडयातील आरक्षित जमिनी तसेच रस्त्यांसाठी संपादित करावयाच्या जमिनींच्या संयुक्त मोजणीकामी स्वतंत्र विशेष पथक (कर्मचारी वर्ग) नेमण्याबाबतचे विषयाचे अनुषंगाने संयुक्त बैठक दिनांक २१ सप्टेंबर, २०११ रोजी आयोजित केलेली आहे. त्यामुळे प्रस्तावित रस्त्यांचे भूसंपादनाचे अनुषंगाने भूसंपादन प्रस्ताव तयार करणेसाठी स्वतंत्र यंत्रणा नेमणे, शासकीय मोजणी करणे आदि कामासाठी किती खर्च येईल, हे स्पष्ट होऊ शकलेले नाही.

तरी प्रस्तावित रस्त्यांचे भूसंपादनाचे प्राथमिक कार्यवाहीसाठी, जसे भूसंपादन प्रस्ताव तयार करणे, शासकीय मोजणी करणे, हद्दी खुणा निश्चित करणेसाठी लोखंडी पोल रोवणे आदि कामासाठी येणाऱ्या खर्चासाठी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणेत यावा किंवा कसे याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

**(क)** तसेच, दरम्यानचे कालावधीत मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील रस्ते विकसित करणेसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेसाठी मा. शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे. त्या अनुसरुन, सदर प्रस्तावित २४ रस्त्यांचे सर्व्हेक्षण करुन, प्राथमिक बांधकाम आराखडे तयार करणे, त्यांचे खर्चाची अंदाजपत्रके तयार करणे आदि कामांसाठी प्रकल्प सल्लागार संस्था नेमणे आवश्यक आहे. याकामी प्रथम प्राधान्य गटातील रस्त्यांचे प्रकल्प व्यवस्थापन पाहत असलेले, मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि., पुणे यांची अथवा नवीन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणेसाठी विहीत पध्दतीने वृत्तपत्रात जाहिरात देऊन प्रस्ताव मागविणे कामी मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.७०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरीलपैकी नगर-मनमाड रस्त्याबाबत यापुर्वी झालेल्या दि.२८.०८.२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६७१ अन्वये कार्यवाही करणेत यावी. तसेच पिंपळवाडी रस्त्याबाबत आजचे सभेपुढील विषय नं.३२ वर घेण्यात आलेल्या निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी. भू-संपादनाची आवश्यकता नसलेल्या १७ रस्त्यांचे नकाशे व अंदाजपत्रके युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा.लि., पुणे यांचेमार्फत तयार करुन शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी सादर करणेत यावेत. दरम्यान निविदा मागविण्याची कार्यवाही सत्वर करणेत यावी. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा.लि., पुणे यांची याकामी २.५०% अधिक सर्व्हिस टॅक्स इतक्या फि वर सल्लागार म्हणून नेमणूक करणेत यावी. तसेच भू-संपादनासाठी आवश्यक असलेल्या रस्त्याचे मोजणीकामी शिर्डी नगरपंचायतीस मोजणी फी संस्थानतर्फे अदा करणेत यावी. याकामी अधिनियमातील तरतूदीनुसार शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता घेण्यता यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३४** **आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळ, हैद्राबाद यांचा शिर्डी येथे यात्री निवासस्थान (हॉटेल) उभारणेसाठी संस्थानची एक एकर जागा मिळणेबाबतचा प्रस्ताव**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री. जयेश रंजन, आंध्रप्रदेश शासनाचे सचिव तथा अध्यक्ष, आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळ, हैद्राबाद यांनी मा. अध्यक्षसाो. यांना अग्रेषित केलेल्या अर्धशासकीय पत्र क्रमांक एसपीएल/ अेपीटीडीसी/ २०११, दिनांक २१ जुलै, २०११ रोजीचे पत्रात खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे :

.. .. आंध्रप्रदेश शासनाचे पर्यटन खात्याने शिर्डी हे मुख्य पर्यटन व तीर्थस्थळ म्हणून वाढविण्यास प्रोत्साहन देणेचे ठरविले आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



आंध्रप्रदेश पर्यटन खात्यामार्फत हैद्राबाद ते शिडी अशा दररोज ०५ पेक्षा जास्त प्रवास यात्रा आयोजित केल्या जात असून, ३०० पेक्षा जास्त यात्री शिर्डी येथे भेट देत आहेत. सध्या आंध्रप्रदेश पर्यटन खात्याने शिर्डी येथील काही खाजगी हॉटेलशी यात्रीच्या निवासव्यवस्थेसाठी संपर्क केला असून, त्याप्रमाणे प्रवास यात्रा आयोजित करणेत येत आहेत.

पर्यटन खात्याच्या नुकत्याच मा. मुख्यमंत्री, आंध्रप्रदेश यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत असे ठरले आहे की, शिर्डी संस्थानकडे पर्यटन खात्यामार्फत यात्री निवासस्थान बांधणेसाठी तसेच पर्यटकांना इतर सोयी-सुविधा देणेसाठी एक एकर जागा उपलब्ध करुन देणेबाबत विनंती करणेत यावी.

उपरोक्त बाबींस अनुसरुन, कृपया संस्थान मालकीची एक एकर जागा उपलब्ध करुन देणेस विनंती आहे.

**(ब)** सध्या उपरोक्त कारणास्तव संस्थान मालकीची मौजे शिर्डी हद्दीत कुठलीही जमीन / जागा उपलब्ध नाही. मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील शेती महामंडळाची भूसंपादनाच्या माध्यमातून ४५ हे ६४ आर जमीन संस्थानला मिळालेली आहे, ती विखुरलेल्या स्वरुपात आहे. त्यापैकी बहुतांशी जमिनींमध्ये सध्या विविध विकास प्रकल्प, जसे साई आश्रम निवासस्थान प्रकल्प, साई गार्डन प्रकल्प आदि प्रकल्पांचे कामे सुरु आहेत / सुरु होत आहेत.

मौजे निमगांव को-हाळे येथील भूसंपादनाने मिळालेल्या जमिनी या रुग्णालय व इतर संस्थानच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी भूसंपादन करुन मिळालेल्या आहेत. त्यामुळे इतर कोणत्याही संस्थेला देणेपुर्वी मा. शासनाची मंजुरी घेणे आवश्यक राहील. तसेच आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळाने, संस्थानची जमीन / जागा विकत, भाडेपट्टयाने अथवा बक्षिसपत्राने मिळावी किंवा कसे याबाबत स्पष्ट प्रस्ताव दिलेला नाही.

यापूर्वी मा. व्यवस्थापन समितीने अलोक इंडस्ट्रिज, मुंबई व साईग्रेस फौडेंशन, मुंबई, एमपीए फायनान्शील सर्व्हिसेस, कलकत्ता यांना शिर्डी येथे भक्तनिवासस्थान इमारत बांधणेसाठी मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थान मालकीच्या जमिनीमध्ये अंदाजे दहा हजार चौरस फुट ते एक एकर जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता दिलेली आहे. तथापि, संस्थानने उपलब्ध करुन दिलेली जागा ही हरित पट्टयात असून, त्याठिकाणी बांधकाम करणेस सक्षम शासकीय कार्यालये मंजूरी देत नाही. तसेच शासनाने शिर्डी नागरी विकास प्राधिकरणाची निर्मिती केल्यापासून बांधकाम आराखडयांना तसेच बांधकामांना परवानगी देणेचे काम प्रलंबित आहे. तसेच, सदरहू जमिनी हरित पट्टयातून निवासी पट्टयात समाविष्ट करणेसाठी शासन स्तरावर प्रस्ताव सादर करणेत आलेला असून, त्यावर कार्यवाही सुरु आहे.

तसेच, यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीने महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळास संस्थान मालकीची मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील जमीन / जागा उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेतलेला होता. सदर निर्णयास अनुसरुन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील तरतुदी नुसार मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास संस्थान मालकीची जमीन / जागा उपलब्ध करुन देणेकामी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. तथापि, मा. शासनाने दिनांक १६ जुलै, २०११ रोजीचे पत्राने सदरचा प्रस्ताव अमान्य केलेला आहे.

**(क)** उपरोक्त परिच्छेद अ व ब मधील बाबींस व विवेचनास अनुसरुन, आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळ, हैद्राबाद यांना मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील एक एकर जमीन / जागा उपलब्ध करुन देणेत यावी किंवा कसे, जमीन उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास, ती कोणत्या अटी-शर्तीवर उपलब्ध करुन देणेत यावी, याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.७०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबा संस्थानला भक्तनिवासस्थान बांधणेसाठी एक एकर जमिन तिरुपती येथे देण्याचे अटीवरच आंध्रप्रदेश पर्यटन विकास महामंडळ, हैद्राबाद यांना शिर्डी येथे यात्री निवासस्थान (हॉटेल) उभारणेसाठी संस्थानची एक एकर जागा देण्यात यावी,असें ठरले.**
(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३५** **संस्थानतर्फे विकसित करण्यात येत असलेल्या नगर मनमाड रस्त्याचे पश्चिमेकडील शिर्डी निमगाव शिव रस्त्याचा पुढील भाग मजबुतीकरणासह डांबरीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** अहमदनगर - मनमाड रस्त्याचे पश्चिमेकडील निमगांव शिर्डी शिव रस्ता संस्थानचे गट नं.८७,८८ पर्यंत (लांबी ४०० मी.) जागेवर अस्तित्वात असून सदर रस्ता खराब झाल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१/०५/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२९१ नुसार अंदाजे ४०० मीटर लांबीचा व ५.५० मीटर रुंदीचे अस्तित्वात असलेल्या रस्त्याचे मजबुतीकरणासह डांबरीकरण करणेचे काम ठेकेदार मे. जगताप कन्स्ट्रक्शन कं. यांचेमार्फत सुरु आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**(ब)** आता दि.१५/०९/२०११ रोजीचे अर्जान्वये सितानगर व आंबेडकर नगर येथील स्थानिक नागरीकांनी मा. अध्यक्ष सोा. यांना दिलेले निवेदनामध्ये, त्यांनी नगर- मनमाड रस्त्याचे पश्चिमेकडील शिर्डी नगरपंचायत हद्दीतील निमगांव शिव रस्ता पुढे सितानगर व आंबेडकरनगर पर्यंत जात असून सदर ठिकाणी १५०० ते २००० लोकवस्ती आहे. सदर रहिवाश्यांना तोच रस्ता वाहतुकीसाठी उपलब्ध आहे. परंतू श्री साई प्रसादालयापासून पुढे रस्ता अतिशय खराब झालेला असल्यामुळे सदर रस्ता सितानगर व आंबेडकर नगर पर्यंत विकसित करावा तसेच सदरहू रस्ता ५.०० मी रुंदीमध्ये करावा, अशी विनंती केली आहे. याबाबत मा. अध्यक्ष सोा यांनी सदरहू रस्ता विकसीत करणेकामी अंदाजपत्रक तयार करणेबाबत सूचना केली आहे.

**(क)** संस्थानमार्फत करणेत येत असलेल्या शिर्डी निमगांव शिव रस्त्याचे गट नं.८७,८८ चे पुढील ७० मी. लांबीचे सितानगर पर्यंतचे अस्तित्वातील रस्त्यावर फक्त मुरुम टाकलेला आहे. सध्या काम चालू असलेल्या रस्त्यापुढील एकूण ७० मी. लांबीचे भागातील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकण करणेकामी अंदाजपत्रक तयार केले असून त्यानुसार खालिल तरतुदींचा समावेश केला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | खोदकाम | - | ९०० एम एम |
| ०२. | मुरुम फिलींग | - | ५०० एम एम |
| ०३. | जी.एस.बी. | - | १५० एम एम |
| ०४. | डब्ल्यु बी.एम. ग्रेड -I | - | ७५ एम एम |
| ०५. | डब्ल्यु बी.एम. ग्रेड -II | - | ७५ एम एम |
| ०६. | डब्ल्यु बी.एम. ग्रेड -II | - | ७५ एम एम |
| ०७. | बी.बी.एम.(Bitumen Bound Macadam) | - | ७५ एम एम |
| ०८. | बी.एम. (Bitumen Macadam) | - | ५० एम एम |
| ०९. | एस.डी.बी.सी. | - | २५ एम एम. |

वरीलप्रमाणे अंदाजपत्रकानुसार एकूण रु.४,९६,४००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम सध्या संस्थानमार्फत काम करीत असलेले ठेकेदार जगताप कन्स्ट्रक्शन कं. कोल्हार यांचेकडून मंजूर दरानुसार करुन घेता येईल.

**निर्णय क्र.७०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानतर्फे विकसित करण्यात येत असलेल्या नगर मनमाड रस्त्याचे पश्चिमेकडील शिर्डी निमगाव शिव रस्त्याचा पुढील भाग मजबुतीकरणासह डांबरीकरण करणेचे काम सध्या संस्थानमार्फत काम करीत असलेले ठेकेदार जगताप कन्स्ट्रक्शन कं. कोल्हार यांचेकडून मंजूर दरानुसार करुन घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.४,९६,४००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३६** **सुरक्षा साहित्याची सेंट्रलाईज कंट्रोलरुम करीता फर्निचर खरेदी करणेबाबत**

**प्रस्ताव-** समाधी मंदिरासह संस्थान परिसराचे व भक्तांचे सुरक्षेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत सेंट्रलाईज कन्ट्रोल रुम गुरुस्थान समोरील तळघरामध्ये करणेत आलेली आहे. यंत्रणा प्रकल्पासाठी नियंत्रण कक्षातील यंत्रणेचे साहित्य ठेवणेसाठी, ते नियंत्रित करणेसाठी संगणकीकृत यंत्रणेसाठी स्वतंत्र कक्ष, कक्षातील छताला फॉल्स सिलींग, विद्युत व्यवस्था आदि सोयी सुविधांसह व्यवस्था करुन देणेत आलेली आहे.

सदर कंन्ट्रोल रुममध्ये तांत्रीक कुशल ऑपरेटर व सुपरवायझर यांना बसणेकरीता ०६ नग खुर्च्या व व्हिजीट देण्यासाठी येणाऱ्या व्हि. आय. पी. यांना बसणेसाठी कंट्रोल रुममध्ये बाहेरील बाजूस ०२ नग थ्री सिटर सोफासेट खरेदी करणेबाबत संरक्षण विभाग यांनी त्यांचेकडील दि. ०८ सप्टेंबर, २०११ रोजीचे टिपणी कळविले आहे.

याकामी यापूर्वी डाटा सेंटर करीता खुर्च्या (Mid back Chair) खरेदी करणेत आलेल्या आहेत. त्याच प्रकारच्या खुर्च्या खरेदी करता येतील. याकरीता रु.५५०००/- मात्र खर्च येइल

तरी याकामी आवश्यक ०६ नग खुर्च्या खरेदी करीता येणारे अंदाजे रु. ५५,०००/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सुरक्षा साहित्याची सेंट्रलाईज कंट्रोलरुम करीता आवश्यक असणाऱ्या ०६ नग (Mid back Chair) खुर्च्या खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रु. ५५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३७** **सिक्युरीटी सिस्टमच्या बॅगेज स्कॅनर मशीनकरीता ॲल्युमिनीयम पार्टीशन बाबत**

**प्रस्ताव-** समाधी मंदीर परिसरात सेंट्रलाईज कंन्ट्रोल सिस्टम अंतर्गत मशीन शांतीनिवास इमारत दर्शनरांग गेट येथे साईभक्तांकडील साहीत्यांची तपासणी करणेकरीता दोन बॅगेज स्कॅनर मशीन बसविणेत आलेले आहेत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सदर बॅगेज स्कॅनर मशीन दर्शनरांगेत मोकळया जागेत असल्यामुळे दर्शन रांगेत साफ-सफाई करतांना उडणारी धुळ व बाहेरील बाजूस असलेल्या वहातूकीमुळे निर्माण होणारी धुळ यामुळे बॅगेज स्कॅनर मशीन जवळील संगणक संच या इलेक्ट्रीक वस्तूचे पॉईंट लवकर खराब होऊन नादुरुस्त होण्याची शक्यता असल्याने, सदरहू ठिकाणी ॲल्युमिनिअम पार्टीशनमध्ये सुशोभित कॅबीन तयार करुन घेणेसाठी येणारे अंदाजे रु. ६७,१५८/- मात्रचे खर्चास व सदरहू काम विहित पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि. १२.०६.२०११ रोजीचे सभेत निर्णय क्र. ४२४ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त निर्णयानुसार सदरहू कामी विहित पध्दतीने कोटेशन मागवून निम्नतम दराचे ठेकेदार मे. रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर यांचेकडून १२'x५' व उंची ८' साईजचे पार्टीशन करुन घेणेकामी त्यांना रु. ६५,६००/- मात्रचा कार्यादेश देणेत आला असून, त्यांचेमार्फत सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

आता, संरक्षण विभाग यांनी त्यांचेकडील दि. १२ सप्टेंबर, २०११ रोजीचे डि. पी. पत्रान्वये सदर कॅबीनची साईज १२'x६' व उंची ८' घेणेत यावी तसेच वरिल बाजूस बंदीस्त करणेत येवून पार्टीशन करीता वरील भागात काच व खालील भागात प्लायवूड बसविणेत यावी. तसेच सदरचे काम दि. १५ सप्टेंबर, २०११ पर्यंन्त पूर्ण करुन मिळणेबाबत कळविले आहे. त्यानुसार सदरचे काम ठेकेदार मे. रविंद्र रबर प्रॉडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर यांचेकडून करुन घेता येईल. याकरीता मंजूर कार्यादेशापेक्षा रुपये ३२,६००/- जादा खर्च येणार आहे.

तरी विषयांकीत कामासाठी जादा येणारे रु. ३२,६००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम ठेकेदार मे. रविंद्र रबर प्रॉडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर यांचेकडून करुन घेणेस मंजूरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिक्युरीटी सिस्टमच्या बॅगेज स्कॅनर मशीनकरीता ॲल्युमिनीयम पार्टीशनचे काम ठेकेदार मे. रविंद्र रबर प्रॉडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणारे रु. ३२,६००/- मात्रचे जादा खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३८** **शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेतील व्दारकामाई ते ताजिमखान बाबा चौक रस्ता पेव्हींग ब्लॉक ऐवजी कॉक्रीटीकरण करणेकरीता शिर्डी नगरपंचायत यांचे विनंतीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे निधीतून रस्तेविकास महामंडळाचे माध्यमातुन प्रथम प्राधान्य गटातील ०५ रस्त्यांचे कामातंर्गत द्वारकामाई ते ताजिमखान बाबा चौक हा ९० मीटर लांबी व ०९ मिटर रुंदीचा रस्ता पेव्हिंग ब्लॉक बसवून करणेचे काम ठेकेदार अशोका बिल्डकॉन, नाशिक यांना देणेत आले आहे. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.०२ सप्टेंबर, २०११ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, सदर रस्त्याची भुसंपादन कार्यवाही शिर्डी नगरपंचायत, शिर्डी मार्फत पूर्ण करणेत आले असून ठेकेदार यांनी अद्याप पावेतो या रस्त्याचे काम सुरु केलेले नाही. तसेच सदरचा ०९ मिटर रुंदीचा रस्ता लगतचे नागरिकांनी पेव्हिंग ब्लॉक ऐवजी कॉक्रीटी करणामध्ये करावा अशी मागणी केली आहे.

सदर रस्ता गांवठाण हद्दीतील असून, त्यास लागून नाट्यगृह चौक व उत्तरेस श्री व्दारकामाई मंदिर आहे. सद्यस्थितीत नगरपंचायतमार्फत करणेत आलेले पूर्वीचे काँक्रीटी करण खराब झालेले आहे.

निविदेनूसार या रस्त्याचे काम पेव्हिंग ब्लॉकमध्ये करणेचे ठरलेले आहे. सदरचे रस्त्याचे काम काँक्रीटी करणामध्ये करावयाचे झाल्यास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे / मुंबई यांचेकडून सदरहू कामी येणारे अपेक्षित खर्चाचे सविस्तर अंदाजत्रक तयार करुन घेवून, सदरचे काम त्यांचेमार्फत करुन घेता येईल. निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेतील व्दारकामाई ते ताजिमखान बाबा चौक रस्त्याबाबत यापूर्वीचे नियोजनाप्रमाणे टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्याप्रमाणे पेव्हींग ब्लॉक्स् बसवून कार्यवाही करणेत यावी, असें ठरलें.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३९** **आरक्षण क्र. ४५ (ट्रक टर्मिनस) मधुन रहीवास क्षेत्र वगळणेकरीता या आरक्षणात येणारे स्थानिक नागरिकांनी केलेल्या विनंतीबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ४५ (ट्रक टर्मिनन्स) या आरक्षणाने बाधित होणाऱ्या क्षेत्रातील श्री. विश्वनाथ विठ्ठल वाकचौरे व इतर २१ स्थानिक नागरिकांनी मा. ना. श्री. राधाकृष्ण विखे पा., कृषि व पणन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना अग्रेषित केलेल्या दिनांक ०४ सप्टेंबर, २०११ रोजीचे विनंती अर्जात खालीलप्रमाणे नमुद केले आहे, त्याचा थोडक्यात तपशील :

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



.. .. वर नमुद केलेल्या क्षेत्रात २० ते ३० वर्षापासून (सर्व्हे क्रमांक १५०) रहिवास करत आहोत. परंतु आपल्या शिर्डी नगरपंचायतचे सदर जागेवर ट्रक टर्मिनस चे आरक्षण आहे. त्या आरक्षणाच्या कनकुरी रोड लगतच्या क्षेत्रामध्ये आम्ही रहीवाशी राहत आहोत. सदर (विकसित) रहिवास क्षेत्र हे आरक्षणाच्या एका बाजुला आहे (कनकुरी रोड लगत).

त्यामळे ते वगळणे तांत्रिक दृष्टया आपण सहकार्य केल्यास शक्य होईल. आपल्या आदेशाने शिर्डी नगरपंचायतीने तसा प्रस्ताव तयार केलेला आहे. शासन दरबारी हा विषय प्रलंबित आहे.

सदर विनंती अर्जावर मा.कृषि व पणन मंत्री यांनी मा. अध्यक्षसाो. यांना उद्देशून असे नमूद केले आहे की, .. .. कृपया अर्जात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे. संस्थान विस्तारात स्थानिक लोकांना विस्थापीत होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**(ब)** विषयाची पूर्वपीठीका व सद्य:स्थिती :

०१. शिर्डी विकास आराखडयात आरक्षण क्रमांक ४५ - सर्व्हे नंबर १४९ (सि.स.नं. ९३५ ते ९३७), सर्व्हे नंबर १५०/१ (सि.स.नं.९३०,९२९) मधील क्षेत्र ०३ हेक्टर ८० आर हे ट्रक टर्मिनन्स या प्रयोजनासाठी आरक्षित असून, सध्या त्याची विकसन संस्था शिर्डी नगरपंचायत, शिर्डी आहे.

०२. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडील दिनांक २२ जानेवारी, २००९ रोजीचे विनंती पत्रानुसार, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८ फेब्रुवारी, २००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १५८ नुसार, आरक्षण क्रमांक ४५ - ट्रक टर्मिनन्स या आरक्षणाचे प्रयोजनात / उद्देशात ट्रक टर्मिनन्स व वाहनतळ (पार्किंग) असा फेरबदल करणेस व सदरहू आरक्षण क्रमांक ४५ ची विकसन संस्था म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असा बदल करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

०३. मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, आरक्षण क्रमांक ४५ चे प्रयोजनात व विकसन संस्थेत बदल करणेबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार, शिर्डी नगरपंचायत, शिर्डीने मा. शासनाचे सक्षम विभागाकडे फेरबदल प्रस्ताव सादर केलेला आहे.

**(क)** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी आरक्षण क्रमांक ४५ - ट्रक टर्मिनन्स बाबत त्यांचे दिनांक ११ ऑगष्ट, २००६ रोजीचे सभेतील ठराव क्रमांक ६२ नुसार, विषयांकित आरक्षणातील जामा मस्जीद ट्रस्ट यांची ४.० आर जागा व या आरक्षणाने बाधीत होणाऱ्या नागरिकांचे बांधीव घरांचे क्षेत्र वगळणेबाबत निर्णय घेतलेला आहे व त्या निर्णयानुसार, आरक्षण क्रमांक ४५ चे प्रयोजनात, क्षेत्रात व विकसन संस्थेत करावयाच्या फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे.

त्यामुळे परिच्छेद अ मध्ये नमुद केलेप्रमाणे स्थानिक नागरिकांनी केलेल्या विनंतीनुसार व शिर्डी नगरपंचायत, शिर्डीने पूर्वीच मा. शासनाकडे सादर केलेल्या फेरबदलाचे प्रस्तावानुसार, आरक्षण क्रमांक ४५ मधील बाधित होणाऱ्या नागरिकांचे रहिवास क्षेत्र (बांधीव घरांचे क्षेत्र) वगळून उर्वरित क्षेत्रात संस्थान ट्रक टर्मिनन्स व वाहनतळ (पार्किंग) म्हणून विकसित करणेस तयार आहे, असे शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना कळविणेत यावे किंवा कसे याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७१२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यात यावा, असें ठरलें.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४० साईबाबा हॉस्पिटल वाढीव लोड व साईनगर स्टाफ क्वॉर्टर वीज जोडणीचे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे व सी.टी.पी युनिटचे येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटल व साईनगर स्टाफ क्वॉर्टर परिसरासाठी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडून कन्झ्युमर क्र.१६१५८९००४४२-६ या एच.टी.कन्झ्युमरकरीता ३६० KW (३५० KVA) इतका लोड जोडून घेण्यात आलेला आहे. श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सातत्याने नवनवीन मशिनरींची वाढ होत गेल्याने तेथील सबस्टेशनचा विद्युतभार ५८५ (५८५ KVA) च्या आसपास गेलेला आहे. श्री साईबाबा हॉस्पीटल वाढीव लोडकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे पत्रव्यवहार करुन एकुण ५८५ KW (५८५ KVA) लोडकरीता मंजूरी मिळालेली आहे.

साईनगर येथील एकाच सबस्टेशन मधून श्री साईबाबा हॉस्पीटल व साईनगर स्टाफ क्वॉर्टर करीता विद्युत पुरवठा केला जातो. हॉस्पीटल व कर्मचारी वसाहत यांना वेगवेगळे दर लागू असल्यामुळे मा.अधिक्षक अभियंता, अहमदनगर यांनी सध्याचा उपरोक्त ग्राहक क्रमांकाचा विद्युतपुरवठा बंद करुन नविन विद्युतपुरवठा जोडून घ्यावा व कर्मचारी वसाहतीकरीता सबमीटर जोडून घ्यावे असे कळविलेले आहे. मा.अधिक्षक अभियंता, अहमदनगर यांनी वरील संदर्भीय पत्र पाठवून श्री साईबाबा हॉस्पीटलची वाढीव लोडची ५८५ KW (५८५ KVA) मागणी मान्य केल्याचे व त्यापोटी खालीलप्रमाणे रक्कम महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, अहमदनगर यांचेकडे भरणेसाठी कळविलेले आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| ०१) | फिक्सड सर्व्हिस कनेक्शन चार्जेस | रु. ०,१६,७००.०० |
| ०२) | इन्स्टॉलेशन टेस्टींग फी | रु. ०,००,२००.०० |
| ०३) | नॉन रिफंडेबल १.३% सुपरव्हिजन चार्जेस | रु. ०,०१,५००.०० |
| ०४) | सिक्युरिटी डिपॉझिट | रु. ०,८५,०००.०० |
| ०५) | ॲग्रीमेंट कॉस्ट | रु. ०,००,२००.०० |
| ०६) | ॲप्लीकेशन व रजिस्ट्रेशन फी | रु. ०,०१,०००.०० |
| ०७) | C.T. टेस्टींग फी | रु. ०,०१,५००.०० |
| | एकुण रक्कम :- | रु. १,०६,१००.०० |

तसेच महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने याठिकाणी हॉस्पीटलच्या वीजवापर मोजणीसाठी स्वतंत्र मीटर व स्टाफ क्वॉर्टरच्या वीजवापर मोजणीसाठी स्वतंत्र मीटर बसवून घेण्यास लेखी कळविले आहे. कारण हॉस्पीटलसाठी व स्टाफ क्वार्टरची वीजवापर टॅरीफ वेगवेगळे आहेत. तसेच हॉस्पीटलमधील मशिनरींचा लोड वाढल्याने पूर्वी लावलेल्या मीटरींग युनिटची क्षमता कमी असल्याने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने या मीटरींग युनिटमधील सी.टी.पी.टी.वाढीव क्षमतेचे बसविण्यास सांगितलेले आहे.याकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या पत्रानुसार दर खालीलप्रमाणे आहे. :-

| अ.क्र. | तपशील | संख्या | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | ११००० व्होल्टस सी.टी.रेटींग ५०-५ अँ. | ०३ नग | रु. २२,०००/- | रु. ०,६६,०००.०० |
| ०२) | ४४० व्होल्ट एल.टी.मिटरींग सी.टी. | ०३ नग | रु. ०२,५००/- | रु. ०,०७,५००.०० |
| ०३) | एल.टी.मिटरींग पॅनेल | ०१ नग | रु. १८,५००/- | रु. ०,१८,५००.०० |
| ०४) | एल.टी.सि.टी.ऑपरेटेड मीटर | ०१ नग | रु. ३१,०००/- | रु. ०,३१,०००.०० |
| ०५) | अर्थिंग | १२ नग | रु. ०४,४००/- | रु. ०,५२,८००.०० |
| ०६) | C.T. P.T. संबंधी इतर काम (नटबोल्ट, जंपर वगैरे) | | | रु. ०,०२,०००.०० |
| | | | एकुण :- | रु. १,७७,८००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु.१,७७,८००.००** |

साईनगर सबस्टेशनकडील एल.टी.पॅनेल बसविणे व ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम मे.इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईजेस, मुंबई यांना जा.नं.एसएसएस / विद्युत / ८८०६ / २०१० दिनांक ०३-०८-२०१० अन्वये कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यांनी सदरचे काम हे जवळपास पुर्ण केलेले आहे. तरी उपरोक्त एच.टी.मीटर व एल.टी.मीटर बसविण्याचे कामही मे.इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईजेस, मुंबई यांचेकडून करुन घेणे सोईचे होईल. त्याकामी उपरोक्तप्रमाणे रक्कम रुपये १,७७,८००/- मधून मे.इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईजेस, मुंबई यांनी टेंडरमध्ये दिलेल्या डिस्काऊंट १६.१२५६७ नुसार होणारी रक्कम रुपये ४,४४५/- वजा करुन रुपये १,७३,३५५/- इतका खर्च येईल.

उपरोक्तप्रमाणे महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडे रक्कम रुपये १,०६,१००.०० इतकी रक्कम आदा करणेस व मे.इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईजेस, मुंबई यांचेकडून मीटरींग युनिटमधील C.T. बदलणे व त्यासंबंधी अनुषंगिक कामे करणे यासाठी येणा-या रक्कम रुपये १,७३,३५५.०० चे खर्चास (एकत्रित खर्च रुपये २,७९,४५५.००) मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडे रक्कम रुपये १,०६,१००/- इतकी रक्कम आदा करणेस व मे.इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईजेस, मुंबई यांचेकडून मीटरींग युनिटमधील C.T. बदलविणे व त्यासंबंधी अनुषंगिक कामे करुन घेण्यास व यासाठी येणा-या रक्कम रुपये १,७३,३५५/- असे मिळून एकूण रुपये २,७९,४५५/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४१** **लेखाशाखेच्या स्ट्रॉंगरुमच्या आतील व बाहेरील बाजूस सी.सी.टी.व्ही कॅमेरा बसविणे बाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्त मौल्यवान वस्तु, सोने चांदीचे दागीने इत्यादी वस्तू देणगी स्वरुपात श्रींना अर्पण करत असतात. सध्या सदर मौल्यवान वस्तू श्रींना अर्पण करणाऱ्या भक्तांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होत आहे.तसेच संस्थानचे इतर विभागाकडील दैनंदिन रोख रकमेचा भरणा देखील लेखाशाखेच्या कॅश विभागात जमा होत असतो.

उपरोक्त प्रमाणे साईभक्तांनी श्रींना अर्पण केलेल्या मौल्यवान वस्तु व जमा होत असलेली मोठया स्वरुपाची रक्कम लेखाशाखा येथील स्ट्रॉग रुम,कॅश विभाग तसेच श्रींचे समाधी मंदिरातील तळघर इत्यादी महत्वाचे ठिकाणी असल्याने सदर मालमत्तेची सुरक्षितता लक्षात घेता त्याठिकाणी सी.सी. टी.व्ही कॅमेरे व नाईट व्हीजन कॅमेरे बसविणे अत्यंत महत्वाचे आहे.

करीता लेखाशाखा कॅश विभागा समोरील मागील पुढील पॅसेजमध्ये ०३ नग फिक्स कॅमेरे, स्ट्रॉंगरुममध्ये नाईट व्हीजन कॅमेरा नग ०१ व मंदिर तळघरात नाईट व्हीजन कॅमेरा ०१ नग असे एकुण

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



०५ कॅमेरे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बसविणे अत्यंत आवश्यक आहे.त्यासाठी कॅमेऱ्यासाठी खालील प्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

१) तिन नग फिक्स कॅमेऱ्यासाठीचा खर्च ३,५०,०००/-

२) दोन नग नाईट व्हीजन कॅमेऱ्यासाठी २,५०,०००/-

त्याचप्रमाणे सदर बसविण्यात येणाऱ्या ०५ नग कॅमेऱ्यामधील हालचालीचे दृष्य बघण्यासाठी ४२ इंच एल सी.डी.०१ नग अंदाजे खर्च रु.६०,०००/- आणि सदर दृष्य (फुटेज ) स्टोरेज करण्यासाठी ०१ नग सर्व्हेर त्यासाठी अंदाजे खर्च रु.२,९०,०००/- मात्र ची देखील आवश्यकता भासेल.

तरी उपरोक्त ०५ नग कॅमेरा, ४२ एल. सी. डी ०१ नग आणि ०१ सर्व्हेर या साठी एकुण खर्च रु.९ ,५०,०००/-इतका खर्च अपेक्षित आहे.

तथापी मा.व्यवस्थान मंडळाचे सभेत झालेल्या निर्णयानुसार ट्रायकलर कन्सल्टंट यांचे मार्गदर्शनाखाली व्हेन्टेज कंपनी मार्फत मंदिर परिसरात अदयावत सुरक्षा यंत्रणा कार्यन्वित करण्याचे काम चालू आहे.त्यामध्ये सी. सी . टी .व्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत.

करीता मा.व्य.मंडळाचे सभेत झालेल्या निर्णयानुसार कंपनीस मंदिर व परिसरात सुरक्षा यंत्रणा उभारणीचे काम देण्यात आलेले आहे त्यासाठी सदर कंपनीमार्फत पूर्वीच्या कोटेशन दराप्रमाणे कॅमेरे खरेदी करुन कंपनीमार्फत उपरोक्त ठिकाणी बसविणेस व कार्यान्वित करण्यासाठी येणारा एकुण खर्च रु ९,५०,०००/- मात्र च्या अंदाजित खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे लेखाशाखेच्या स्ट्रॉंगरुमच्या आतील व बाहेरील बाजूस सी.सी.टी.व्ही कॅमेरा मे.व्हेन्टेज कंपनी मार्फत पूर्वीचे मान्य दरानुसार बसविणेस व याकामी येणारे रक्कम रुपये ९,५०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४२** **अद्यावत सुरक्षा साहित्य बसविण्यात येणाऱ्या पुरवठादार मे.व्हेन्टेज यांना कामाची मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती चे सभेतील दि.१८.१०.२००८ विषय नं.३६ व निर्णय क्रं.७९३ नुसार समाधी मंदिर व परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने करावयाच्या विविध उपाय-योजना व अत्याधुनिक सुरक्षा साहित्य खरेदीस व त्या कामी येणारे अंदाजे रक्कम रु.४.५ कोटीचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्याअनुषंगाने दि.०६.०३.२०१० रोजीचे मा.व्य.मंडळाचे सभेतील निर्णय क्र.२८३ नुसार मे.व्हेन्टेज इंटेग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन, नोईडा यांची अत्याधुनिक सुरक्षा साहित्य पुरविणे बाबत निवड झालेली असुन त्यानुसार त्यांना जा.नं.एसएसएस/वशी/संरक्षण/५९५८/दि.१४.०४.२०१० अन्वये मंदिर व परिसरात सिक्युरिटी सिस्टीम कार्यान्वित करणेसाठी व त्याकामी लागणारे सुरक्षा साहित्यांचा पुरवठा करणेबाबतचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. पुरवठा आदेशामध्ये नमुद केलेप्रमाणे ताब्यात मिळालेल्या सुरक्षा साहित्यांच्या बिलावरील ७०% रक्कम पुरवठादारास आदा करण्यात यावी असे ठरले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही चालू आहे.तसेच त्या बाबत पुरवठादार व्हेंन्टेज यांचे सोबत करावयाचे करारपत्रही पुर्ण करण्यात आलेले आहे.

परंतु सदरील कामे पुरवठा आदेशात नमुद केले प्रमाणे १६ आठवडयामध्ये मे.व्हेन्टेज यांनी पुर्ण करणे आवश्यक होते.तथापी सदर काम पुर्ण होण्यास खालील प्रमाणे अडचणी येत गेल्याने सदरचे कामास उशीर होत गेला.

**१)** यापूर्वी दि.२२.०९.२००७ रोजीचे मा.व्य.मंडळाचे सभेतील निर्णय क्रं.७७२ अन्वये श्रींचे मंदिर व मंदिर परिसराचे सुरक्षिततेकरीता सुरक्षा साहित्य खरेदी करणेसाठी यापूर्वी कन्सल्टंट म्हणून मे.ट्रायकलर कन्सल्टंन्स,मुंबई यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. त्याप्रमाणे सुरक्षा साहित्य पुरवठा करणेसाठीची वर्क ऑर्डर तयार करणे या पर्यंतची कामे त्यांनी पुर्ण केलेली आहेत.त्यानंतर मे व्हेन्टेज यांचेकडून खरेदी करण्यात येणारे सुरक्षा साहित्यांचा दर्जा,कार्यक्षमता,इत्यादी बाबी पुरवठा आदेशा प्रमाणे तपासून घेणे अत्यावश्यक असल्यामुळे तसेच सदर यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत दि.०४.०७.२०१० रोजी मा.व्य. मंडळाचे समितीच्या सभेतील विषय नं.६५ व निर्णय क्र.५८६ अनुसार मे.ट्रायकलर कन्सल्टंट,मुंबई यांची ५ वर्षाकरीता नेमणुक करण्यात आली.त्यामुळे पुरवठादार यांच्याकडून वेळोवेळी आलेल्या सुरक्षा साहित्यांची तपासणी कामाकरीता अवधी लागला.

**२)** सुरक्षा साहित्य बसविण्याचे प्रत्यक्ष काम सुरु होणे पूर्वी ट्रायकलर कन्सल्टंट यांनी सुरक्षा साहित्य बसविण्यात येणाऱ्या ठिकाणांची पाहणी केली.

**३)** त्यानंतर सुरक्षासाहित्यांचे कामासाठी अंडर ग्राऊंड वायरिंगचेकाम सुरु करण्यात आले परंतु सदर कालावधीत गुरुपौर्णिमा उत्सव,श्रावण महिण्यांतील साई चरित्र पारायण सोहळा,श्री पुण्यतिथी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उत्सव,दिपावली व नववर्ष महोत्सव या गर्दीचे कालावधीत व पावसाळा या कारणांमुळे सदरचे वायरिंग टाकण्यासाठी करावयाची खोदाई व वायरिंग टाकणेसाठी विलंब होत गेला.

**४)** अंडर ग्राऊड वायरिंग काम व सुरक्षा साहित्य बसविण्याचे काम पुर्ण झाल्यानंतर दि.०५.१२.२०१० रोजीचे मा.व्य.मंडळाचे सभेतील निर्णय क्रं.९९४ दि.१५.०२.२०११ चे पत्रान्वये जादा सुरक्षा साहित्य खरेदी करणे बाबतचा निर्णय झालेला होता.त्यामध्ये कंट्रोलरुममध्ये लागणारे फर्निचर,फेस रेकॉडिंग सिस्टीम इत्यादी कामे पुर्ण होण्यासाठी बराचसा कालावधी लागला.

**५)** कंट्रोलरुमसाठी इलेक्ट्रीक लोड, बॅगेज स्कॅनर मशीनसाठी कॅबीन,बसविण्यातआलेल्या डोअर फ्रेम समोर तयार करावयाच्या सिंगल स्टे.स्टील रिलींग,मायक्रोसॉप्ट २००८ यासाठी लागणारा परवाना इत्यादी कामामुळे विलंब होत गेला.

तरी उपरोक्त कामामुळे मे.व्हेन्टेज यांना अद्यावत सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी होत गेलेला विलंब लक्षात घेता सुरक्षा साहित्य पुरवठादार यांना सदरच्या कामाची सप्टेंबर २०११ अखेर पर्यत मुदतवाढ मिळणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अद्यावत सुरक्षा साहित्य बसविण्यात येणाऱ्या पुरवठादार मे.व्हेन्टेज यांना कामाची सप्टेंबर २०११ अखेरमुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.**

**याचवेळेस संरक्षण विभागातील सुरक्षा रक्षाकांना फिजिकल ट्रेनिंग देणेबाबत नियोजन करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं ४३** **गाय दुध दरवाढ देणे बाबत**

**प्रस्ताव-** संस्थानचे कॅन्टीन विभागाकरिता जा.एसएसएस-वशी-खरेदी-कॅन्टीन-५२७ व ५२८ दि. २५.०४.२०११ नुसार सन २०११-१२ साठी ( दि.१६.०४.२०११ ते ३१.०३.२०१२ अखेर ) प्रति लिटर रु.२२.५० दराने दररोज अंदाजे १४०० लिटर्स गाय दुध होमीजीनाईज्ड व पाश्चराईज्ड, ५०० मिली पॅकिंग, ३.५ ते ३.८ फॅट, ८.५ एसएनएफ पुरवठा करणेकामी गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. कोपरगांव व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांना वार्षिक पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. कोपरगांव यांनी दि. ३१.०८.२०११ चे पत्राने "महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार दि.०१.०९.२०११ पासून गाय दुध खरेदी दरात वाढ करण्यात आलेली आहे.त्यामुळे दूध उत्पादक शेतक-यांचे दुधास द्यावी लागणारी खरेदी दरातील वाढ, इंधन दरवाढ,जनावरांचे चारा,पशुखाद्य, औषधे व तद्अनुषंगिक बाबींच्या किंमतीत झालेली दरवाढ,शिवाय दूध प्रोसेसिंगसाठी येणारा खर्च,पॉलिथीन पॅकिंगचा वाढलेला खर्च, इ.बाबीचा विचार करता बाजारपेठेतील सध्याचे दूधाचे दर हे दूध खरेदी-विक्रीचा खर्च बघता होमीजीनाईज्ड व पाश्चराईज्ड गाय दूध दरात दिनांक ०१.०९.२०११ पासून प्रति लिटर रु. १.५० पैसे प्रमाणे वाढ करण्यात येत आहे. त्यानुसार संस्थानने प्रति लिटर १.५० पैसे याप्रमाणे वाढ द्यावी "अशी विनंती पत्राने केली आहे.

तसेच श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांनी दि.०६.०९.२०११ चे पत्राने "महाराष्ट्र शासनाने गायीचे दूधात दि.०१.०९.२०११ पासून रु. १.५० पैसे दरवाढ केलेली आहे. त्यानुसार दि.०१.०९.२०११ पासून १.५० पैसे दरवाढ देणेबाबत" विनंती केलेली आहे.

निविदा व पुरवठा आदेशातील अट क्र. २ मध्ये "महाराष्ट्र शासनाने दुध खरेदी दरात दरवाढ केल्यास, व संबंधीतांनी शासन निर्णयाची प्रत सादर केल्यानंतर मा.व्यवस्थापन समिती त्याबाबत निर्णय घेईल." असे नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र शासन कृषी, पशुसंवर्धन, दूग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय क्र. एमएलके/२०११/प्र.क्र.१९१/प्रदुम-८,दिनांक २५ ऑगस्ट २०११ चे आदेशाने शासकीय दूध योजनेमार्फत बृहन्मुंबई व ग्रामिण योनामार्फत होणा-या दूध विक्रीसाठी गाय दूध आणि टोण्ट दूध विक्री दरात प्रति लिटर रु.१-५० पै. मात्रने वाढ केली आहे. त्यानुसार उपरोक्त दोन्ही दुध पुरवठादार संघाने त्यांचे पत्रान्वये दूध पुरवठा दरात प्रति लिटर रु.१.५० पैसे दरवाढीची मागणी केली आहे.

सबब पुरवठा आदेशातील अटीनुसार गाय दुध दरवाढीबाबत शासन निर्णयाचे अधिन राहून वरील दोन्ही पुरवठाधारकांना दि.०१.०९.२०११ पासून प्रति लिटर रु.१.५० पै. दरवाढ देणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त दोन्ही पुरवठाधारकांना पुरवठा आदेशातील प्रति लिटर रु.२२.५० पैसे दरात शासन निर्णयानुसार प्रति लिटर दर रु. १.५० पैसे वाढ देण्यात येऊन गायीचे दूधाचा दर प्रति लिटर रु. २४.०० (रु.च्योवीस) मात्र दि.०१.०९.२०११ पासून देणेस मान्यता असावी.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.७१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, निविदा व पुरवठा आदेशातील अटीनुसार गाय दुध दरवाढीबाबत शासन निर्णयाचे अधिन राहून गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. कोपरगांव व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांना दि.०१.०९.२०११ पासून प्रति लिटर दर रु. १.५० पैसे वाढ देण्यात येऊन गायीचे दूधाचा दर प्रति लिटर रु.२२.५० ऐवजी प्रति लिटर रु. २४.०० मात्र देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.४४** **सन २०११-१२ कीरता ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** पाणी पुरवठा विभागाचे कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरणांसाठी ब्लीचिंग पावडर विक्रम (ग्रासीम) ब्रॅड डी.सी.एच.(डी.एस.सी.एल.) आय.एस.आय. मार्क ३४ % क्लोरीन उपलब्ध, फेरीक ॲलम- १६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध व क्लोरीन गॅस सिलेंडर (१०० किलोचे) यांची दैनंदिन आवश्यकता भासते. मागील वर्षी आपण मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार वार्षिक खरेदीमध्ये निविदा मागवून नियमानुसार खरेदी केलेली आहे. सदरच्या मटेरियलचा झालेला खर्च तपशिल खालील प्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | मागणी कालावधी | मागणी | ऑगस्ट २०१० अखेर खर्च | शिल्लक येणे बाकी |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | ब्लीचिंग पावडर. | ०१-०९-२०१० ते ३१-१०-२०११ | ३५ टन. | २७ टन. | ०८ टन. |
| ०२. | फेरीक ॲलम. | ०१-०९-२०१० ते ३१-१०-२०११ | ६० टन. | ४० टन. | २० टन |
| ०३. | क्लोरीन गॅस सिलेंडर. | ०१-०९-२०१० ते ३१-१०-२०११ | ४० सिलेंडर. | २८ सिलेंडर. | १२ सिलेंडर. |

पुढील वर्षासाठी सन २०११-२०१२ करीता नविन निविदा मागवून मटेरियल खरेदी करणे आवश्यक आहे. त्यात खालील प्रमाणे मटेरियलची आवश्यकता आहे.

| अ.नं. | तपशिल | आवश्यकता | अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | **ब्लीचिंग पावडर.** विक्रम (ग्रासीम) ब्रॅड डी.सी.एच. (डी.एस.सी.एल.) आय.एस.आय. मार्क ३४ % क्लोरीन उपलब्ध. | ३५ टन. | रु.१६,०००/- प्रती टन. १२.५ % वॅटसह. | ५,६०,०००.०० |
| ०२. | **फेरीक ॲलम.** (१६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध) | ६० टन. | रु.६,५००/- प्रती टन. १२.५ % वॅटसह. | ३,९०,०००.०० |
| ०३. | क्लोरीन गॅस सिलेंडर. (प्रत्येकी १०० किलोचे) | ४० सिलेंडर. | रु.४,५००/- प्रती सिलेंडर ४ % वॅटसह. | १,८०,०००.०० |
| **अंदाजे एकुण खर्च -** | | | | **११,३०,०००.००** |

मागील वर्षाप्रमाणेच ॲलम, ब्लीचिंग व क्लोरीन गॅस सिलेंडरची मागणी करण्यात आलेली आहे. तरी वरील प्रमाणे पाणी शुध्दीकरणांकरीता लागणारे मटेरियल विहित पध्दतीने खरेदी विभागामार्फत कोटेशन मागवून खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणा-या अंदाजे रु. ११,३०,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.७१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थानचे पाणीपुरवठा करणारे कनकुरी तलावातील पाणी शुध्दीकरणासाठी सन २०११-१२ कीरता आवश्यक असणारे ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ११,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.४५** **मे.मदर्स ग्राफिक्स (इं.) प्रा.लि., मुंबई यांचे श्री साई सत्चरित्र- तेलगू व फोटोंची छपाई करणेस असमर्थ असलेबाबत पत्र.**

**प्रस्ताव-** मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांना जा.नं.एसएसएस/ वशी/ प्रकाशने/ ८२७५/दि.१.७.२०१०. अन्वये खालील प्रमाणे पुस्तके व जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/८२७६/ दि.०१.०७.२०१०. अन्वये फोटो छपाईकामी कार्यादेश देणेत आलेला असून, केलेला पुरवठा स्तंभ क्र.५ मध्ये नमुद केला आहे.

**अ) पुस्तके-**

| अ.नं. १ | पुस्तकाचे नाव २ | मंजूर दर रुपये पैसे ३ | आदेशीत छपाई संख्या ४ | जमा छपाई संख्या ५ | येणे छपाई संख्या ६ | दिलेली अंतिम मुदत ७ | शेरा ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सच्चरित - मराठी आवृत्ती क्र. २८ | ७२.२८ | ३०,००० | २९१७४ | ८२६ | दि.१७.२.११ | आदेश अपूर्ण |
| ०२ | श्री साईचरित्र - तेलगू आवृत्ती क्र. २१ | ३३.७० | १,००,००० | ६९,९३६ | ३०,०६४ | दि.०१.५.११ | आदेश अपूर्ण |
| ०३ | श्री साईचरित्र - तामिळ | ४०.७६ | ४०,००० | ४०००० | -- | दि.०१.४.११ | आदेश पूर्ण |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | आवृत्ती क्र. १५ | | | | | | |
| ०४ | श्री साई सच्चरित - तेलगू (पोथी) आवृत्ती क्र. ३ | ७४.७२ | १०,००० | १०००० | -- | दि.१७.२.११ | आदेश पूर्ण |
| ०५ | मुलांचे साईबाबा इंग्रजी आवृत्ती क्र. १३ | ०४.९६ | १०,००० | १०००० | -- | दि.२८.५.११ | आदेश पूर्ण |
| ०६ | गुरुपाठाचे अभंग- मराठी आवृत्ती क्र. २ | २.८५ | ५,००० | ५००० | -- | दि.२८.५.११ | आदेश पूर्ण |

**ब) फोटो-**

| अ.नं. १ | फोटोंचे नाव २ | मंजूर दर रुपये पैसे ३ | आदेशीत छपाई संख्या ४ | जमा छपाई संख्या ५ | **येणे छपाई संख्या ६** | दिलेली अतिम मुदत ७ | शेरा ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | द्वारकामाई बसलेले बाबा फोटो ४ रंगात साईज १४"x२०" | २.७० | १,००,००० | -- | **१,००,०००** | २८.०५.२०११ | आदेश अपूर्ण |
| २ | दगडावर बसलेले बाबा फोटो ४ रंगात साईज २०"x२८" | ५.७० | १,००,००० | ९३४५ | **९०,६५५** | ०१.०६.२०११ | आदेश अपूर्ण |

उपरोक्त **अ** परिशिष्टातील अ.नं.३,४,५,६ या पुस्तकांचा पुरवठा पूर्ण केला आहे. व अ.नं. १ व २ पुस्तके तसेच **ब** परिशिष्टातील फोटोंचा पुरवठा पूर्ण केलेला नाही छपाईकामी १ वेळा मुदवाढ देऊनही वेळेत छपाईचा पुरवठा केलेला नाही. प्रेसधारकांना अनेक वेळा स्मरणपत्रे दिली असून दूरध्वनीवरुनही नियत वेळेत पुस्तके, फोटोंचा पुरवठा करणेबाबत कळविले होते. तथापि त्यांनी त्याची दखल घेतलेली नाही.

प्रेसधारकांनी दि.३०.०६.२०११ चे पत्रान्वये उपरोक्त **अ** मधील अ.नं. १ व २ ही पुस्तके व **ब** मधील अ.नं.१ व २ फोटो, स्तंभ क्रमांक ६ मध्ये दर्शविलेप्रमाणे येणे छपाईचा पुरवठा आर्थिक समस्येमुळे करण्यास असमर्थ असल्याचे कळविले आहे.

(क) कार्यादेशातील शर्त/अट क्र.०६ नुसार दरपत्रकात नमूद केलेले दर मान्य केल्याने त्यानुसारच छपाई करुन द्यावी लागेल, त्यामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मिळणार नाही. आपण पुरवठा करावयाचे नाकारल्यास दरपत्रकासोबतची सुरक्षा अनामत रक्कम संस्थान खाते जमा करुन घेण्यात येईल. तसेच आपले फर्मचे नांव संस्थानचे निवडक प्रेसधारकांचे यादीतून वगळणेबाबत विचार करण्यात येईल. याबाबत आपली तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.छ अशी तरतूद आहे.

(ड) प्रेसधारकांनी त्यांना संदर्भीय क्र. १ अन्वये दिलेल्या कार्यादेशातील श्री साईसच्चरित मराठी, तेलगू, तामिळ पुस्तकांमध्ये, बाईडींगमध्ये पाने उलटसुलट, तेलगूचे पुस्तकास तामिळचे कव्हर, तामिळ पुस्तकास तेलगूचे कव्हर अशा स्वरुपाच्या चुका आढळलेल्या आहेत. विक्री झालेली पुस्तके सदर चुकांमुळे काही प्रमाणात परत होत असून, त्यांना पुस्तके बदलून द्यावी लागत आहेत. त्यामुळे संस्थानचे आर्थिक नुकसान होत आहे.

सबब उपरोक्त **क** व **ड** बाबींचा विचार करता प्रेसधारकांना दंडात्मक कारवाई म्हणून निविदेतील व कार्यादेशातील शर्ती/अटी प्रमाणे त्यांची देय सुरक्षा अनामत रक्कम रु.३,९८,९९३/- +४२०००/- एकूण रु.४,४०,९९३/- मात्र दंड म्हणून संस्थान जमा करुन त्यांचे नाव संस्थानचे प्रेसधारकांचे अधिकृत यादीतून वगळणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.७१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.मदर्स ग्राफिक्स (इं.) प्रा.लि., मुंबई यांनी श्री साई सत्चरित्र- तेलगू व फोटोंची छपाई करणेस असमर्थता दर्शविल्याने निविदेतील व कार्यादेशातील शर्ती/अटी प्रमाणे त्यांची देय सुरक्षा अनामत रक्कम रु.३,९८,९९३/- +४२०००/- एकूण रु.४,४०,९९३/- मात्र दंड म्हणून संस्थान जमा करुन, त्यांचे नाव संस्थानचे प्रेसधारकांचे अधिकृत यादीतून वगळण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४६** **मे.साई सिक्युरिटीज प्रिंटर्स प्रा.लि., बेंगलोर यांना श्री साई दिनदर्शिका सन २०१२ छपाईकामी दिलेला कार्यादेश साईपॅकेजींग कंपनी या नावाने बदलून देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका २०१२ छपाईकामी विहीत पद्धतीने दरपत्रके मागविणेत येऊन, दि.२४.०७.११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे दरपत्रके उघडणेत येऊन प्रेसधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निम्नतम दर धारक मे.साई सिक्युरिटी प्रिंटर्स प्रा.लि., बेंगलोर यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी/ प्रकाशने/२२०७/२०११ दि.०२.०८.२०११अन्वये खालीलप्रमाणे श्री साई दिनदर्शिका २०१२ छपाईकामी कार्यादेश देणेत आलेला आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या | सर्व करांसह मंजूर दर रुपये पैसे | एकूण रक्कम | देणगी मुल्य रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा दिनदर्शिका२०१२ सिंगल शीट(लहान) आकार १७"x२२" (दिनदर्शिकेच्या खालील बाजूस प्रत्येक महीन्याचे तारखेसह स्वतंत्र १२ डेट पॅड) | ३,००,००० नग | ७.०० | २१,००,०००.०० | १०.०० |
| ०२ | श्री साईबाबा दिनदर्शिका २०१२ सिंगल शीट (मोठे) आकार १९"x२९" (दिनदर्शिकेच्या खालील बाजूस प्रत्येक महीन्याचे तारखेसह स्वतंत्र १२ डेट पॅड)) | ३,००,००० नग | ११.५० | ३४,५०,०००.०० | १५.०० |
| | | | एकूण रु. | ५५,५०,०००.०० | |

तथापि मे. साई सिक्युरिटी प्रिंटर्स प्रा.लि., बेंगलोर यांनी त्यांचे दि.२९.०७.२०११ चे पत्रान्वये कळविले आहे की, भारत सरकारने दिनदर्शिका छपाईवर १% एक्साईज ड्युटी आकारली असल्याने ते त्यांचे कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी खालील नांवाने विलींग करणार आहेत.

साई पॅकेजींग कंपनी ( ए डिव्हीजन ऑफ साई सेक्युरिटी प्रिंटर्स प्रा.लि.)
नं.४२/४३, थर्ड फेज, फोर्थ मेन,
पिन्या इंडस्ट्रीयल एरिया,
बेंगलोर ५६० ०५८

तरी सदर नावाने श्री साई दिनदर्शिका २०१२ छपाई कामाचा कार्यादेश मिळावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

सबब इकडील जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/२२०७/२०११ दि.०२.०८.२०११ अन्वये मे. साई सिक्युरिटी प्रिंटर्स प्रा.लि., बेंगलोर या नावाने दिलेला कार्यादेश रद्द करुन साई पॅकेजींग कंपनी , बेंगलोर या नांवाने दुसरा कार्यादेश देणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.७१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.साई सिक्युरिटीज प्रिंटर्स प्रा.लि., बेंगलोर यांना श्री साई दिनदर्शिका सन २०१२ छपाईकामी दिलेला कार्यादेश रद्द करुन साई पॅकेजींग कंपनी , बेंगलोर या नांवाने दुसरा कार्यादेश देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४७** **श्रीसदगुरु साईनाथ सगुणोपासना-मराठी आरतीचा पंजाबी भाषेत अनुवाद करणे बाबत**

**प्रस्ताव-** डॉ.गुणजितसिंग वालीया, अमृतसर यांनी दि.१६.०६.२०११ चे पत्रान्वये श्री साईनाथ सगुणोपासना (आरती) मराठी चा पंजाबी भाषेत अनुवाद केला असून, त्याची सी.डी. पाठविली आहे. सदर अनुवाद संस्थानने पंजाबी भाषिकांकरीता प्रकाशित करावा असी ईच्छा प्रदर्शित केली आहे. प्रकाशनाचे सर्व हक्क ते संस्थानला देणार आहेत. त्यांनी श्री साईचरित्र- इंग्रजी पुस्तकाचा पंजाबी भाषेत अनुवाद केला असून, सदर पुस्तक संस्थानने प्रकाशित केले असून विक्रीस उपलब्ध आहे.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं. १७ ठ "श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील "अशी तरतुद आहे.

सगुणोपासना-मराठी आरतीचा खालील भाषेत अनुवाद प्रकाशित असून, पुस्तीका विक्रीस उपलब्ध आहेत.

१) सगुणोपासना - इंग्रजी,२) हिंदी,३) गुजराथी,४) तामिळ, ५) तेलगू , ६) बंगाली.

पंजाबी भाषेत आरतीचा अनुवाद झाल्यास पंजाबी भाषिक साईभक्तांना उपयोग होईल. श्री गुणजितसिंग वालीया यांनी, मराठी आरतीचा पंजाबी भाषेत केलेला अनुवाद योग्य असल्याबाबत श्री गुरुनानक देव विद्यापीठ, अमृतसर यांचा अभिप्राय असलेले पत्र दिले आहे.

पंजाबी भाषेतील साहित्यास विशेष मागणी नसते तरीही प्रायोगिक तत्वावर २५०० प्रती छपाई करुन विक्रीस ठेवता येतील, योग्य प्रतिसाद मिळाल्यास पुढील छपाई करता येईल.

सबब डॉ.श्री गुणजितसिंग वालीया- अमृतसर यांनी अनुवाद केलेली श्री सगुणोपासना- पंजाबी पुस्तीका प्रायोगिक तत्वावर २५०० प्रती छपाई करुन घेणेस व त्याकामी येणा-या योग्य त्या खर्चाचे मान्यतेसाठी सादर.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.७२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.श्री गुणजितसिंग वालीया- अमृतसर यांनी अनुवाद केलेली श्री सगुणोपासना - पंजाबी पुस्तीका प्रायोगिक तत्वावर २५०० प्रती छपाई करुन घेणेस व त्याकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४८** **श्री पुण्यतिथी उत्सव- २०११ निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती.अंबिका व्ही नायर,मुंबई. यांनी कळविले की, श्री पुण्यतिथी उत्सव -२०११ या निमित्ताने समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान इ. ठिकाणी फुलांची सजावट देणगी दाखल करुन देण्यास तयार आहे. यासाठी त्यांनी संस्थान कडे परवानगी मागीतलेली आहे.

संस्थान, संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी , गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते. सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी म्हणुन सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

मकर संक्रात-२०११ या निमित्ताने साई फ्लोरिस्ट डेकोरेटेर्स,नवी मुंबई, श्री रामनवमी उत्सव -११ या निमित्ताने श्रीमती रिम्पल लोहीया , विश्वस्त श्री साईबाबा संस्थानविश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी व श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०११. या निमित्ताने के.सी. सुब्रामणी,राजु बंगलोर यांनी फुलाची सजावट देणगी दाखल केलेली आहे.

श्रीमती.अंबिका व्ही नायर,मुंबई.यांनी श्री पुण्यतिथी उत्सव -२०११. या निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलाची सजावट करणेस व फुलांची सजावट करणेकामी येणाऱ्या कर्मचाऱ्यांची राहण्याची, भोजनाची सोय विनामुल्य करणेस परवानगी मागीतलेली आहे त्यास मान्यता मिळावी ही विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती.अंबिका व्ही नायर,मुंबई.यांनी श्री पुण्यतिथी उत्सव -२०११. या निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलाची सजावट करणेस व फुलांची सजावट करणेकामी येणाऱ्या कारागिरांची राहण्याची, भोजनाची सोय विनामुल्य करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं. ४९** **दिपावली निमित्त मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री राजेंद्र तलवार, दिल्ली यांनी दिपावली- २०११.या निमित्ताने समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट देणगी दाखल करुन देण्यास तयार आहे. यासाठी त्यांनी संस्थान कडे परवानगी मागीतलेली आहे.मागील वर्षी दोन वर्षापासून दिपावली निमित्त त्यांनी सजावट केलेली आहे.

संस्थान, संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी म्हणुन सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते. श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०११ मध्ये बंगलोर येथील साईभक्त श्री के.सी सुब्रामनी राजु यांनी देणगी दाखल सजावट केलेली होती.

तरी श्री राजेंद्र तलवार,दिल्ली यांना सजावट करणेस व दर्शनासाठी व सजावटी करणेकामी येणारे कारागीर यांना सजावटीचे सामान ठेवणेसाठी हॉल देता येईल.

तरी सदर प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री राजेंद्र तलवार, दिल्ली यांनी दिपावली- २०११.या निमित्ताने समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी,गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट देणगी दाखल करणेस तसेच सजावटी करणेकामी येणारे कारागीर यांना सजावटीचे सामान ठेवण्यास हॉल तसेच त्यांचे भोजनाची व्यवस्था विनामुल्य करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.५०** **मान्यवरांचे सत्कार करणेकामी देणगी शॉल स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** समाधी मंदिरात श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवर, अतिथी, व्ही.व्ही.आय.पी. व महत्वाचे पदसिद्ध अधिकारी वर्ग यांचा संस्थानचे वतीने शॉल, श्रीफळ, देऊन सत्कार केला जातो. त्यांचे सत्काराकामी संस्थानचे वतीने शॉल देण्याची पूर्वापार पद्धत आहे.

माहे एप्रिल २०११-ते मार्च २०१२ या आर्थिक वर्षासाठी शॉल खरेदी करण्यात येणार आहेत. संदर्भ क्र.०१ नूसार १०००० नग शॉल खरेदीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



दि.१२/०६/२०११ रोजी ठेवला होता तो मंजूर झाला आहे. सदर शॉल खरेदीची कार्यवाही खरेदी विभागामार्फत कोटेशन मागवून करण्यांत येणार आहे.

त्यानंतर उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये देणगीदार साईभक्त श्री.के.सी.सुब्रमणी यादव, रा. बेंगलोर यांनी संस्थान मार्फत सत्काराकरीता देण्यात येणा-या शॉल देणगीरुपाने देण्याची इच्छा दि.१६/०७/२०११ रोजीच्या अर्जात प्रदर्शित केलेली आहे.

प्रत्येक वर्षी सदर सत्कारासाठी शॉल संस्थानमार्फत खरेदी करण्यात येतात. परंतु श्री.के.सी.सुब्रमणी यादव बेंगलोर हे संस्थानच्या नमुन्यानुसार शॉल देणगी देण्यास तयार आहेत. शॉल बनविण्याचे त्यांचे स्वत:चे मॅन्युफॅक्चरींग आहे असे त्यांनी समक्ष सांगितले आहे.

तरी देणगीदार साईभक्त श्री.के.सी.सुब्रमणी यादव, रा. बेंगलोर यांचेकडून देणगीरुपाने आपले नमुन्याप्रमाणे १०,००० नग शॉल स्वीकारण्यास व देणगी पावती देणेस मान्यता मिळावी.

सदर विषयास मा.व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मान्यवरांचे सत्कार करणेकामी साईभक्त श्री.के.सी.सुब्रमणी यादव, रा. बेंगलोर यांचेकडून देणगीरुपाने आपले नमुन्याप्रमाणे १०,००० नग शॉल स्वीकारुन देणगी पावती देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,मंदिर विभाग)

---

**विषय नं.५१** **सोन्याच्या चादरीबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींच्या समाधी मंदिरात साईभक्त श्री.राजेंद्र गायकवाड, पुणे यांनी श्रींच्या चरणी सोन्याची चादर अर्पण केली.

सदर भक्ताने सोन्याची चादर अर्पण करतेवेळी चादरीची किंमत रुपये २५,२५,०००/- इतकी असुन, सोन्याची आहे असे सांगितले. सदर चादर मुल्यमापन केलेली नसल्याने फक्त मंदिर आवक रजिस्टरला नोंद घेण्यात आलेली आहे. आवक रजिस्टर पा.क्र. १७ अ.क्र.४७ प्रमाणे नोंद करण्यात आलेली आहे.त्यानंतर मुख्यलेखाधिकारी यांना मुल्यमापनाबाबत विचारले असता त्यांनी संस्थान अधिकृत मुल्यमापन करणारे पुण्याचे श्री.कालरा यांना बोलावून घेतले. व त्यांनी दि. २२/०६/२०११ या तारखेस मुल्यमापन केले असता फक्त किंमत रुपये २५,०००/- इतकी असल्याचे सांगितले.

सदर चादरीची संस्थानमार्फत अदयाप पावती करण्यात आलेली नसून मंदिर विभागाचे आवक रजिस्टरवर नोंद घेतली आहे. श्री.गायकवाड यांचे मागणीनुसार त्यांनी सदर चादर परत मागणी केलेली आहे. तसे दि.१५/०७/२०११ रोजीचे पत्र त्यांनी दिलेले आहे. त्यांनी रु.२५,२५,००० चा धनाकर्ष क्र.००१३१२ दिलेला आहे. त्यात त्यांनी जुन्या सोन्याची चादरीची सोन्यासह किंमत म्हणून नवीन धनाकर्षाने रक्कम दिलेली आहे.

सदरची चादर श्री.गायकवाड, पुणे (चादर देणगीदार) यांना २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) मात्र इतकी रक्कम भरुन घेऊन त्यांना परत देता येईल. ती रक्कम धनाकर्षाने रुपये २५,२५,०००/- मध्ये समाविष्ट दिसत आहे. त्यापूर्वी संस्थान देणगीपावती करुन चादर परत देणे अगर तशीच आवक रजिस्टरला नोंद घेऊन परत देणेबाबत आदेश व्हावा.

सदर विषयास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री राजेंद्र गायकवाड,पुणे यांनी श्रींचे चरणी अर्पण केलेली सोन्याची चादर रुपये २५,००१/- इतकी रक्कम भरुन घेऊन त्यांना परत करण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,मंदिर विभाग)

---

**विषय नं.५२** **श्रींच्या चावडी मंदिरातील चांदीच्या नवीन सिंहासनाबाबत.**

**प्रस्ताव-** चावडी मंदिरामध्ये असलेल्या श्रींची तसबीर (फोटो) तसेच सिंहासन चांदीची करुन देणेबाबत मुंबई येथील साईभक्त श्री.किरण मेहता, सी.एम.डी. वरुण इंडस्ट्रिज, मुंबई यांनी इच्छा प्रगट केली आहे. सदरच्या दोन्ही वस्तु देणगीदाखल करुन देणार आहेत.

श्रींचे चावडी मंदिरातील फोटोसाठी चांदीची फ्रेम बनविलेली आहे. त्यामुळे फोटो फ्रेम चांदीची बनविण्याची आवश्यकता नाही. परंतु श्रींचे चावडी मंदिरातील सिंहासन चांदीचे देणगीदाराकडुन तयार करुन घेता येईल. सदरचे सिंहासन भक्कम तसेच सुबक चांदीचे तयार करुन घेण्यास हरकत नाही.

तरी श्रींचे चांदीचे सिंहासन श्री.किरण मेहता, मुंबई यांचेकडुन देणगीस्वरुपात करुन घेणेबाबत सदर विषयास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींच्या चावडी मंदिरातील नवीन चांदीचे ०सिंहासन श्री.किरण मेहता, सी.एम.डी. वरुण इंडस्ट्रिज, मुंबई यांचेकडून देणगी स्वरुपात करुन घेण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, मंदिर विभाग)

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



---

**विषय नं.५३** **प्लॉस्टिक क्रेट खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांना प्रसादरुपाने मोतीचूर लाडू सहज मिळावे म्हणून साईप्रसाद नं २ इमारतीच्या उत्तरबाजूस ८ काऊंटर, व्दारावती येथे १ काऊंटर तसेच भक्तनिवास (५०० रुम) येथे १ काऊंटर चालविले जाते. सध्या कॅन्टीन विभागाचे डेडस्टॉकला १४० क्रेटची नोंद आहे. परंतु दैनंदिन वापरामुळे त्यातील २५ क्रेट खराब झालेले आहे.उर्वरित ११५ क्रेट वापरात आहे.श्रींचे रामनवमी, गुरुपौर्णिमा व पुण्यतिथी उत्सव व तसेच गर्दीचे काळात सध्या असलेले क्रेट कमी पडतात.साईआश्रम भाग ०१ (खोल्या) साईआश्रम भाग ०२ ( हॉल) या नुतन इमारतीचे काम पूर्ण होत असून लवकरच येथे साईभक्तांना वास्तव्यासाठी रुम, हॉल देण्यात येणार आहे. त्यामुळे तेथेही साईभक्तांच्या सोयीसाठी लाडू काऊंटर चालु करणे गरजेचे आहे. त्यासाठी प्लास्टिक क्रेटची आवश्यकता भासणार आहे.

यापूर्वी कॅन्टीन विभागाकडे लाडू वाहतुक करिता निलकमलचे प्लास्टिक क्रेट दैनंदिन वापरात असून टिकाऊ स्वरुपाचे आहेत. तरी आत्ताही १०० क्रेट खरेदी करतांना निलकमल प्लास्टिक या नामांकित कंपनीचे J.B.C. ५४ x ३६ x ४०० या साईजचे क्रेट खरेदी करण्यासाठी अंदाजे प्रति नग रु १०००= ०० या प्रमाणे १०० x १००० = १,००,००० = ०० ( अक्षरी रुपये एक लाख मात्र ) खर्च अपेक्षित आहे. तरी निलकमलचे प्लास्टिक क्रेट खरेदी करणेचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन विभागाचे वापरासाठी आवश्यक असणारे प्लॅस्टिक क्रेट प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मे.निलकमल प्लास्टिक या नामांकित कंपनीचे J.B.C. ५४ x ३६ x ४०० या साईजचे क्रेट खरेदी करण्यासाठी अंदाजे प्रति नग रु १०००/- प्रमाणे १०० क्रेट खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रुपये १,००,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.५४** **साईआश्रम भाग ०१ व भाग ०२ मध्ये चहा कँन्टीनसाठी सामान खरेदी करणेबाबत**

**प्रस्ताव-** साईआश्रम भाग ०१ (खोल्या) व साईआश्रम भाग ०२ ( हॉल ) या इमारतीमध्ये चहाची कॅन्टीन चालु करावयाची असल्याने खालिल तपशिलाप्रमाणे खरेदी विभागामार्फत सामान खरेदी करणे अत्यावश्यक आहे.

**साईआश्रम भाग ०१ व साईआश्रम भाग ०२ करीता खरेदी करावयाचा सामान तपशिल-**

| अ.नं. | सामानाचा तपशिल | नग | प्रति नग किमंत | अंदाजे २० % जादा किमंत |
|---|---|---|---|---|
| ०१ | गॅस शेगडया | ०८ | १२,५००= ०० | १,००,०००x२०%= १,२०,०००.०० |
| ०२ | अल्यु. पातेले (१००० कपाचे) | १२ | २,५९० = ०० | ३१,०८०x २०% = ३७,२९६.०० |
| ०३ | अल्यु. पातेले ( ७०० कपाचे ) | ०४ | १,८६७ = ०० | ७,४६८x २०% =८,९६१.६० |
| ०४ | अल्यु. पातेले ( ६०० कपाचे ) | ०४ | १,६३५ = ०० | ६,५४० x २०% = ७,८४८.०० |
| ०५ | दूध कुकर ( ५०० लिटरचे) | ०२ | १,००,००० = ०० | २,००,०००x २०% =२,४०,०००.०० |
| ०६ | अल्यु. दांडा पातेले | ०८ | ३०० = ०० | २,४००x २०%=२,८८०.०० |
| ०७ | बोटल कुलर( डिप फ्रिज) | ०४ | १९,००० = ०० | ७६,००० x २०% =९१,२००.०० |
| ०८ | फॅट मशिन | ०२ | २५,००० = ०० | ५०,००० x २०% = ६०,०००.०० |
| ०९ | इले. वजन काटा | ०२ | १२,५०० = ०० | २५,००० x २०% = ३०,०००.०० |
| १० | स्टिल ओगराळे | ०८ | ६० = ०० | ४८० x २०% =५७६.०० |
| ११ | स्टिल टि-जार ( २५ लि.चे) | २० | २,७४५ = ०० | ५४,९०० x२०% = १,३१,७६०.०० |
| १२ | स्टिल टि-जार ( १५ लि.चे) | १६ | १,७८२ = ०० | २८,५१२ x २०% =३४,२१४.४० |
| १३ | स्टिल- टि-जार( १० लि.चे) | ०४ | ८१६ = ०० | ०३,२६४ x २०% =०३,९१६.८० |
| १४ | चहा तिकिट बुके | १०.००० | ३०= ०० | ३,००,००० x २०%= ३,६०,०००.०० |
| १५ | कॉफी तिकिट बुके | ८,००० | ३०= ०० | २,४०,००० x २०% =२,८८,०००.०० |
| १६ | दूध तिकिट बुके | ६,००० | ३०= ०० | १,८०,००० x २०% = २,१६,०००.०० |
| १७ | अन्नपाकिटे तिकिट बुके | ७,००० | ३०= ०० | २,१०,००० x २०% = २,५२,०००.०० |
| १८ | ऑफिस टेबल | ०६ नग | ३,५०० = ०० | २१,००० x२०% =२५,२००.०० |
| १९ | खुर्च्या | ०६ नग | १५०० =०० | ९,००० २०% =१०,८००.०० |
| २० | कपाटे | ०६ नग | ३,००० = ०० | १८,००० x २०% =२१,६००.०० |
| | | | | एकुण रु. =१९,४२,२५२.८० |
| | | | | पूर्णांकित रक्कम १९,४२,२५३.०० |

( अक्षरी रुपये एकोणावीस लाख बेचाळीस हजार दोनशे त्रेपन्न मात्र)

उपरोक्त प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.तरी उपरोक्त सामान विहित पध्दतीने खरेदी करणेचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.७२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग ०१ व भाग ०२ मध्ये चहा कॅन्टीनसाठी सामान खरेदी करणेऐवजी पंचवटी ग्रुप नाशिक,कामत ग्रुप नाशिक,वुडलॅण्ड,शाहू,सिन्नर व भगत ताराचंद या नामांकित हॉटेल व्यावसायिकांकडून आयटम वाईज रेट मागविण्यात यावेत, असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.५५** **इम्पोंटेड मशिन्स करीता स्पेअरपार्ट खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालयातील प्रसाद भोजन बनविणेकामी सुलभता येणेसाठी मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार मे. राईट इक्विपमेंट प्रा. लि. मुंबई यांचेकडुन हॉबर्ट-जर्मनी, निलमा-इटली या कंपनीचे इम्पोरटेड मशिन्स खरेदी करणेत आलेले आहे. हॉबर्ट व निलमा कंपनीचे खालीलप्रमाणे मशिन खरेदी करणेत आलेले आहे.

**हॉबर्ट -जर्मनी**

१. डिश वॉशर मशिन्स - ०२ नग
२. व्हेज प्रोसेसर - ०२ नग

**निलमा- इटली**

१. ओनियन पिलर मशिन्स - ०२ नग
२. गार्लिक पिलर मशिन - ०१ नग
३. व्हेजेटेबल वॉशर मशिन - ०१ नग
४. ग्रेन वॉशर मशिन्स - ०२ नग
५. होमोनाराईझर मशिस - ०१ नग

उपरोक्त मशिन्सचे जानेवारी २००९ मध्ये इन्स्टॉलेशन केलेले असुन गॅरंटी व वारंटी कालावधी संपलेला आहे. सदरचे मशिन्सचा वापर दैनदिन प्रसाद भोजन बनविण्याच्या प्रक्रियामध्ये अत्यंत उपयोग होत असुन कमी मनुष्यबळाकडुन जास्त काम होत आहे. सदर मशिनपैकी डिश वॉशिंग मशिन्स व व्हेज प्रोसेसर मशिन्सचे दैनंदिन वापराने काही स्पेअरपार्ट खराब झालेले आहे. त्यामुळे दैनंदिन प्रसाद भोजन बनविणेच्या प्रक्रियेस अडचन निर्माण झालेली आहे.

सदरचे इम्पोरटेड मशिनचे स्पेअरपार्ट मार्केटमध्ये सर्व्हिस डिलर व्यतीरिक्त मिळत नसल्याने मशिनचे पुरवठादार व सर्व्हिस डिलर मे. राईट इक्विमेंट प्रा. लि. मुंबई यांना दुरध्वनी व ईमेल द्वारे कळविले असता त्यांनी खालीलप्रमाणे दरपत्रक दिलेले आहे.

| अ.न. | मशिनचे नाव | पार्टचा तपशिल | नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | डिश वॉशर | Slide | ०६ | ७९९.०० | ४,७९४.०० |
| २. | | Door Spring | १२ | ३५१४.०० | ४२,१६८.०० |
| ३. | | Solenoid Coil | ०४ | १०,७०९.०० | ४२८३६.०० |
| ४. | | Circlip Dia ५mm | १० | २१७.०० | २१७०.०० |
| ५. | | Gasket | १० | २७०.०० | २७००.०० |
| ६. | | Spacer | १० | ३१३.०० | ३१३०.०० |
| ७. | व्हेज प्रोसेसर | Dicing Grid १५x१५mm | २ | २६,१३२.०० | ५२२६४.०० |
| ८. | | Disc | २ | ५,१७३.०० | १०,३४६.०० |
| | | | | एकुण रक्कम | १,६०,४०८.०० |
| | | | | व्हॅट १२.५% | २०,०५१.०० |
| | | | | **एकुण रक्कम** | **१,८०,४५९.००** |

(एकुण रक्कम रु. एक लाख ऐंशी हजार चारशे एकोणसाठ मात्र)

वरीलप्रमाणे इम्पोरटेड मशिनचे स्पेअरपार्ट मे. राईट इक्विमेंट प्रा. लि. मुंबई यांचेकडुन खरेदी करता येतील. त्याचप्रमाणे सदरचे स्पेअरपार्ट परदेशातुन मागविणार असल्याने स्पेअरपार्ट मिळणेस कमीत कमी ४५ दिवस लागणार आहे.

तरी श्री साईप्रसादालयाचे दैनंदिन प्रसाद भोजन बनविणेच्या कामाची अडचन लक्षात घेऊन परदेशी बनावटीच्या मशिनरीचे स्पेअरपार्ट मे. राईट इक्विमेंट प्रा. लि. मुंबई यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,८०,४५९/- + वाहतुक चे खर्चास मान्यता मिळणेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन,साईप्रसादालयाचे दैनंदिन प्रसाद भोजन बनविणेच्या कामाची अडचन लक्षात घेऊन परदेशी बनावटीच्या मशिनरीचे स्पेअरपार्ट मे. राईट इक्विमेंट प्रा. लि. मुंबई यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,८०,४५९/- + वाहतुक चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.५६** **स्टे.स्टील कुकिंगरेज (शेगडी) खरेदी करण्यास मान्यता मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** दिनांक ८/०१/२००९ पासुन श्री साईप्रसादालय सुरु झालेले आहे. श्री साईप्रसादालय सुरु करतेवेळेस आवश्यक स्टे. स्टील फॅब्रीकेट इक्युपमेट नवीन खरेदी करणेत आलेले होते. त्यामध्ये १० नग कुकिंग रेज (गॅस भट्टया) खरेदी करणेत आलेल्या होत्या. मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापुर व मे. मेटल फॅब्रीकेशन ऑफ इंडिया प्रा. लि. मुंबई यांचेकडुन प्रत्येकी ५ नग प्रतीनगास रक्कम रु. १८९००/- प्रमाणे मा. व्यवस्थापन समिती सभेच्या मान्यतेने बनवुन घेणेत आलेले होते.

२००९ मध्ये प्रसादालयातील सुस्थीतीत असलेल्या खालीलप्रमाणे गॅस शेगडया नविन श्री साईप्रसादालयात वापरासाठी घेतलेल्या होत्या.

| अ.नं. | तपशिल | संख्या/नग | नविन खरेदी केलेल्या स्टे.स्टील गॅस शेगडी नग | एकूण शेगडी संख्या/नग |
|---|---|---|---|---|
| १) | स्टे. स्टील गॅस शेगडी | १० | १० | २० |
| २) | लोखंडी गॅस शेगडी | ०९ | -- | ०९ |
| | **एकूण =** | **१९** | + **१०** = | **२९** |

जुन्या प्रसादालयापेक्षा नविन साईप्रसादालयात प्रसाद भोजन सुरु झालेपासुन भक्तांचे गर्दीचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे दैनंदिन साईभक्तांचे प्रसाद भोजन पदार्थाशिवाय रुग्णलयातील कॅम्पस्, वेगवेगळे उत्सव, पारायण सोहळा, आपत्कालिन परिस्थीतीत अन्नपाकिटे बनविणे, सलग सार्वजनिक सुट्टी कालावधी, नियमीतपणे साजरे होणारे उत्सव वैगरे कारणास्तव प्रसाद भोजन, अल्पोपहार पदार्थ तयार करावे लागतात. तसेच मोतीचुर लाडु तयार करणेसाठी एप्रिल २०११ पासुन दोन ठेकेदारांची नेमणुक केलेली आहे. त्यामुळे सध्याचे असलेले कुकींग रेंज (गॅस शेगडया) कमी पडतात.

सध्या वापरात असलेल्या कुकींग रेज, गॅस शेगडया (लोखंडी फ्रेम) खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | स्टे.स्टील | लोखंडी | एकूण शेगडी नग |
|---|---|---|---|---|
| १) | मुख्य किचन | १३ | ०१ | १४ |
| २) | नाष्टापाकीट किचन | ०३ | ०२ | ०५ |
| ३) | लाडू किचन श्री साई प्रसादालय | ०१ | ०८ | ०९ |
| ४) | लाडू किचन जुने प्रसादालय | ०३ | १४ | १७ |
| ५) | चपाती/पुरी किचन | ०० | ०६ | ०६ |
| | **एकूण शेगडी नग** | **२०** | **३१** | **५१** |

वरीलप्रमाणे ५१ शेगडया पैकी २९ शेगडया सुस्थितीत आहेत. उर्वरीत २२ ठिकाणी लोखंडी फ्रेम तयार करुन बर्नर्स बसविलेले आहेत. त्यापैकी ६ ठिकाणी फक्त गर्दीचे कालावधीमध्येच वापर होत आहे. मात्र १६ ठिकाणी शेगडयाचा सततचा वापर चालु आहे. त्यामुळे त्या ठिकाणी स्टे. स्टीलच्या शेगडयाचा वापर करणे गरजेचे आहे. मुख्य किचन मध्ये सुमारे १४ तास, लाडु किचन सुमारे १४ तास वेळप्रसंगी २१ तास, नाष्टा पाकिट किचनमध्ये सुमारे ८ तास, चपाती किचनमध्ये १४ तास भट्टयांचा वापर असतो. त्यामुळे तेथे सुरक्षतितेच्या दुष्टीने स्टे. स्टीलच्या शेगडया असणे आवश्यक आहे.

सन २००८- २००९ मध्ये प्रती नगास १८,९००/- प्रमाणे स्टे. स्टील कुकींग रेंज(शेगडी) खरेदी केलेल्या आहेत. मात्र सध्या सर्वच साहित्य व मजुरीचे दरात वाढ झालेने नवीन खरेदी करावयाचे स्टे. स्टील शेगडयासाठी प्रत्येकी अंदाजे रु. २५०००/- खर्च येण्याची शक्यता आहे. त्यानुसार १६ नग स्टे. स्टील शेगडयासाठी रु. ४,००,०००/- पर्यत खर्च अपेक्षित आहे. याकामी प्रसादालय अंदाजपत्रकात नवीन मशिनरी खरेदीसाठी रक्कम रु.४,५४,६०,०८७/- शिल्लक आहेत.

सन २००८-२००९ मध्ये खालील स्टे. स्टिल फेब्रीकेटर्स यांचेकडुन वेगवेगळया स्टे.स्टिल किचन ईक्वीपमेंट, फर्निचर खरेदी करण्यात आलेले आहे.

१) मे. मेटल फॅब्रीकेटर्स ऑफ इंडिया, मुंबई
२) मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापुर
३) मे. ग्रेहाऊंड इंडस्ट्रीज, कोल्हापुर
४) मे. मेटाप्रो इंडस्ट्रीज, पुणे
५) मे. सुयोग ईक्वीपमेंट प्रा. लि., पुणे.
६) मे. स्वराज इंडस्ट्रीज, पुणे

तरी साई प्रसादालयाकरीता १६ स्टे. स्टील कुकींग रेंज (शेगडया) खरेदीसाठी अंदाजे रक्कम रु.४,००,०००/- (अक्षरी रुपये चार लाख मात्र) पर्यतच्या खर्चास व सन २००८-२००९ मध्ये वरीलप्रमाणे स्टे.स्टील फॅब्रीकेट इक्युपमेंट पुरवठादारांकडून दरपत्रक मागविणेसकामी निर्णयार्थ सादर.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.७२९ यावर सविस्तर चर्चा होऊन, साई प्रसादालयाकरीता १६ स्टे. स्टील कुकींग रेंज (शेगड्या) स्टे.स्टील फॅब्रीकेट इक्युपमेंटचे वर नमूद केलेल्या पुरवठादारांकडून दरपत्रक मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४ लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

---

**विषय नं.५७ सौ.मोनिका सतिष चव्हाण, परिचारिका श्री साईनाथ रुग्णालय यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत**

**प्रस्ताव-** सौ. मोनिका सतिष चव्हाण, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी केलेल्या गैरशिस्त वर्तनाबद्दल त्यांना जा. नं. एसएसएस/वशी ७बी/१२८८/२०१०. दि. १७/०४/२०१० अन्वये संस्थान सेवेतुन खाते चौकशीसाठी तात्पुरते सेवा निलंबीत करण्यात आलेले होते. तसेच जा. नं. एसएसएस/वशी ७बी/१४४८/२०१०. दि. २४/०४/२०१० अन्वये त्यांचेवर आरोपपत्र ठेवण्यात आलेले होते. जा. नं. एसएसएस/वशी ७बी/१४४९/२०१० दि. २४/०४/२०१० अन्वये, त्यांचेवर ठेवलेल्या आरोपपत्राचे खाते चौकशीकामी ॲड. बी. वाय. काळवाघे, कोपरगाव यांची खाते चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली होती. ॲड. काळवाघे यांनी नियमाप्रमाणे खाते चौकशी पूर्ण करुन दि. ०६/०९/२०१० रोजी चौकशीचा निष्कर्ष अहवाल सादर केलेला आहे. सौ. चव्हाण, परिचारीका यांनी केलेल्या गैरवर्तनाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सौ. मोनिका सतिष चव्हाण, परिचारीका या दि. १६/०४/२०१० रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या डयुटीत डिलक्स/ स्पेशल रुम येथे कामावर होत्या. सदर दिवशी सकाळी १० ते ११ च्या दरम्यान त्यांनी त्यांची नेमुन दिलेली कामाची जागा विनापरवानगी व योग्य कारणाशिवाय सोडून त्या TSR वॉर्ड मध्ये आल्या. सदर दिवशी TSR वॉर्ड मधील रुम नं. १० मध्ये श्री. संजय बबन गावडे, संस्थान कर्मचारी रुग्ण म्हणुन ॲडमीट होते. त्याच रुममध्ये श्री साहेबराव पंढरीनाथ कोबरणे या नावाचे रुग्ण ॲडमीट होते. श्री कोबरणे या रुग्णास फक्त गोळयांच्या स्वरुपात औषधोपचार चालु होते आणि श्री गावडे या रुग्णास इंजेक्शन व गोळयांच्या स्वरुपात औषधोपचार चालु होते. सौ. मोनिका चव्हाण यांनी श्री कोबरणे यांची फाईल न बघता चुकीने श्री गावडे यांचे फाईलमध्ये लिहीलेली इंजेक्शने (Inj. Rantac, Inj. Emset, Inj. Voveron) श्री कोबरणे यांना दिली. वास्तविक सौ. चव्हाण, परिचारीका यांनी श्री कोबरणे यांना इंजेक्शन देण्यापुर्वी त्यांच्या फाईलमधील ड्रगचार्ट बघणे आवश्यक होते. तसे न करता त्यांनी श्री कोबरणे या रुग्णास श्री गावडे यांची इंजेक्शन्स दिली.

ॲड. बी. वाय. काळवाघे, कोपरगाव खाते चौकशी अधिकारी यांनी चौकशी पूर्ण करुन दि. ०६/०९/२०१० रोजी चौकशीचा निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढल्याचे नमुद केले आहे.'सौ. मोनिका सतिष चव्हाण यांचेवरील आरोप निर्विवाद शाबीत झाल्याने त्या दोषी आहेत.'

त्यानुसार जा. नं. एसएसएस/वशी ७बी/१७०/२०१० दि. ०५/१०/२०१० अन्वये सौ. चव्हाण यांना दि. ०५/१०/२०१० ते दि. ०८/१०/२०१० अखेर ४ दिवस संस्थान सेवेतुन तात्पुरते निलंबीत करण्यात आलेले असून दि. ०९/१०/२०१० पासुन त्या पूर्ववत कामावर हजर झालेल्या आहेत.

दि. २८/०८/२०११ रोजी मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. ६७३ (४) नुसार खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

श्री साईबाबा रुग्णालयातील परिचारीका मोनिका सतिष चव्हाण (वक्ते) यांनी रुग्णास चुकीचे इंजेक्शन दिले या प्रकरणी चौकशी करुन त्यांना चार दिवस सस्पेंड करण्यात येऊन, कामावर हजर करुन घेण्यात आले आहे. हा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेबाबत सांगितले असतानाही विषय सादर झालेला नाही. सबब, सदरचा विषय व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करावा.

द इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडींग ऑर्डर्स) ॲक्ट १९४६ चे कलम २५ (१) नुसार गैरवर्तनाबद्दल दोषी असलेल्या कर्मचाऱ्यास खालीलप्रमाणे शिक्षा सुचित केलेल्या आहेत.

**अ.** ताकीद दयावी किंवा ठपका दयावा.

**ब.** पेमेंट ऑफ मेजेस ॲक्ट १९४६ च्या तरतुदीच्या मर्यादेत राहून आणि त्यानुसार दंड करावा.

**क.** चार दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीच्या आदेशाने सस्पेंड करावे.

**ड.** नोटीसीशिवाय बडतर्फ करावे.

तरी सदर प्रकरणी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७३० सौ.मोनिका सतिष चव्हाण, परिचारिका श्री साईनाथ रुग्णालय यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत संस्थान कामगार कायदे सल्लागार ॲड.अशोक पाटील यांचा सल्ला घेऊन, फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा असें ठरलें.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/ कामगार अधिकारी)

---

**विषय नं.५८** **श्री मोहन एकनाथ उपासनी, (बडतर्फ) वरिष्ठ लिपिक, प्रशासनशाखा यांचे कोर्ट केस संदर्भात तडजोड करुन, त्यांना पूर्ववत कामावर रुजू करुन घेणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री.मोहन एकनाथ उपासनी, वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा, हे दि.१४-०६-१९८९ पासून संस्थान सेवेत कार्यरत होते. श्री.उपासनी हे दि.१३-११-२००७ रोजी सकाळी ७.३० वाजेपासून कॅश काउंटींग हॉल येथे कॅश काउंटींगसाठी हजर होते. सदर दिवशी सकाळी ८.४५ वाजेच्या दरम्यान श्री.उपासनी हे बाथरूमचे कारणांसाठी कॅश काउंटींग हॉल मधून बाहेर जात असतांना तेथील सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांची तपासणी केली. त्यावेळी श्री.उपासनी यांचे रूमालातुन प्रथम एक हजारची एक नोट व रूमाल झटकल्यानंतर एक हजार रूपयाच्या १९ नोटा खाली पडल्या. सदर रूपये एक हजारच्या २० नोटांचा रितसर पंचनामा करून, शिरडी पोलीस स्टेशन, शिरडी येथे श्री.उपासनी यांचे विरूध्द तक्रार दाखल करणेत आली होती. सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.उपासनी यांना दि.१३-११-२००७ रोजीचे आदेशान्वये खातेचौकशीकामी सेवा निलंबीत करण्यात येऊन, त्यांना जा.नं. एसएसएस/वशी-७ए/३४२१/२००७ दि.२०-१२-२००७ अन्वये आरोपपत्र देण्यात आले होते. सदर आरोप पत्राची खातेनिहाय चौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय. काळवाघे, चौकशी अधिकारी यांनी पुर्ण करुन, त्यांचा दि.११-०५-२००९ रोजीचा खाते चौकशी निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केला होता. त्यात श्री.उपासनी यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोप पत्रातील आरोप खाते चौकशीत सिध्द झाले असून, श्री.उपासनी हे दोषी आहेत असा चौकशी अधिकारी यांनी निष्कर्ष काढला होता. म्हणून सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७-०५-२००९ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता. सदर सभेतील निर्णय क्र.४६५नुसार श्री.उपासनी यांना जा.नं. एसएसएस/ वशी-७ए/१६१६/ २००९ दि.१८/०५/२००९ अन्वये संस्थान सेवेतून बडतर्फ (Dismiss) का करण्यात येऊ नये? अशी सेकंड शोकॉज नोटीस बजावण्यात आली होती.

उपरोक्त सेकंड शोकॉज नोटिसी संदर्भात श्री.उपासनी यांनी संस्थान विरूध्द मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे तक्रार (यु.एल.पी)क्र.३०/२००९ ही कोर्ट केस दाखल केली आहे. त्यात "श्री.उपासनी यांनी दि.१८-०५-२००९ रोजीचा तक्रारदाराबाबत बडतर्फी विषयक कारणे दाखवा नोटीस आदेश बेकायदेशीर, अयोग्य, नैसर्गिक न्यायाविरूध्द असल्याचे जाहिर करून रद्द करण्याचे आदेश जाब देणार संस्थान यांना व्हावेत, तक्रारदाराचे निलंबन काळातील पुर्ण वेतन तक्रारदारास आदा करण्याचे आदेश जाब देणार संस्थान यांना व्हावेत. दरम्यानचे काळात दि.१८-०५-२००९ चा तक्रारदाराचे बडतर्फी विषयक कारणे दाखवा नोटीस आदेश मुळ तक्रारीच्या सुनावणीच्या काळात स्थगित करून तक्रारदारास बडतर्फ न करण्याविषयक आदेश जाब देणार यांना व्हावेत." अशी मागणी केलेली आहे. त्यानंतर सदर कोर्ट केसमधील निशाणी क्र.२ मनाई हुकूम मिळणे संदर्भातील अर्जाचे निर्णयापर्यंत सध्य स्थितीत स्टेटस्को (जैसे थे परिस्थिती) ठेवावी असे आदेश मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी दि.२६-०५-२००९ रोजी दिले होते. सदर स्टेटस्को आदेशाची मुदत मा.कामगार न्यायालयाने दि.१८-०६-२००९ रोजीचे ॲड इंटेरियम आदेशान्वये वाढविली होती.

त्यानंतर मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी निशाणी-२ मनाई हुकूमाचे अर्जावर सुनावणी घेवून, उभयपक्षाचे म्हणने विचारात घेऊन, दि.३०-१२-२००९ रोजी खालीलप्रमाणे आदेश देवून श्री.उपासनी यांचा मनाई हुकूमाचा अर्ज डिसमिस करून निकाली काढला आहे.

**ORDER**

1. Interim relief application Exh. U-2 is hereby dismissed.
2. Consequently, ad-interim order dated 18-06-2009 passed below Exh.C-7 which came to be extended till the date of this order is hereby quashed and set aside.
3. Application Exh.U-2 is accordingly disposed off.

Ahmednagar (K.B.Wagh)
Date:-30-12-2009 Judge,
2nd Labour Court, Ahmednagar

उपरोक्तप्रमाणे श्री.उपासनी यांचा मनाई हुकूम मिळणेबाबत निशाणी नं.-२ चा अर्ज दि.३०-१२-२००९ रोजी डिसमिस झाले नंतर तसेच मा.कामगार न्यायालयाचा दि.१८-०६-२००९ रोजीची ॲड-इंटेरिम ऑर्डर (स्टेटस्को ऑर्डर) व्हॅकेट झालेनंतर संस्थान ॲडव्होकेट यांचे दुरध्वनीवरील सुचनेस अनुसरून, श्री.उपासनी यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४६२८/२००९ दि.३१-१२-२००९ रोजीचे आदेशान्वये संस्थान सेवेतून दि.०१-०१-२०१० पासून कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस) करणेत आलेले आहे. दरम्यानचे काळात श्री.उपासनी यांनी मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांचे तक्रार

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



(यु.एल.पी.) क्र.३०/ २००९ मधील दि.३०-१२-२००९ रोजीचे आदेशा संदर्भात संस्थान विरूध्द मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.२/२०१० ही कोर्ट केस दि.०४-०१-२०१० रोजी दाखल केलेली आहे. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

**१)** तक्रार (यु.एल.पी.) क्र.३०/२००९ मा.कामगार न्यायालय, अहमदनगर क्र.२ अंतिम अंतरिम आदेश दि.३०-१२-२००९ हे रद्द करून, बदल करून, अर्जदाराबाबत अंतिम कारणे दाखवा नोटीस दि.१८-०५-२००९ काढून अर्जदाराबाबत सामनेवाले यांनी प्रथम दर्शनी कामगार विषयक अनुचीत प्रथांचा अवलंब केलेचे जाहिर करून, मुळ तक्रारीच्या सुनावणीच्या काळात अंतिम कारणे दाखवा नोटीस स्थगित ठेवणे विषयक, अर्जदारास बडतर्फ न करणेबाबत आदेश सामनेवाले यांना व्हावेत.

**२)** अर्जदारास आवश्यक असल्यास त्याच्या हुद्दयाप्रमाणे पैशाच्या व्यवहारा व्यतिरिक्त इतर काम मुळ तक्रारीच्या सुनावणीच्या काळात निलंबन रद्द करून देण्याचे आदेश व्हावेत.

श्री.उपासनी यांनी संस्थान विरूध्द मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे उपरोक्तप्रमाणे दाखल केलेली तक्रार (यु.एल.पी.) क्र.३०/२००९ तसेच त्यांनी संस्थान विरूध्द मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे दाखल केलेले रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.०२/२०१० हया दोन्हीही कोर्ट केसेस सध्या मा.न्यायालयात न्यायप्रविष्ट असून प्रलंबीत आहे.

श्री.उपासनी यांना पुर्ववत कामावर रूजू करून घेणेबाबत प्रस्ताव यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७-०८-२०१० रोजी झालेल्या सभेत सादर करणेत आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होवून, निर्णय क्र.६५४ अन्वये " श्री.मोहन एकनाथ उपासनी यांनी आर्थिक गैरव्यवहार केला असल्याने त्यांचे बडतर्फीबाबत फेरविचार करणेत येऊ नये" असा निर्णय पारीत झालेला आहे.

त्यानंतर श्री.उपासनी यांनी दि.२५-०४-२०११ व दि.२९-०८-२०११ रोजीचे अर्ज सादर केले असून, त्यात त्यांनी " दि.३१-१२-२००९ चे आदेशान्वये मला संस्थान सेवेतून कमी करण्यात आले आहे. याबाबत संस्थान विरूध्द तक्रार (यु.एल.पी.) क्र.३०/२००९ व रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.२/ २०१० या केसेस न्यायप्रविष्ठ असून प्रलंबीत आहेत. मी संस्थानमध्ये १९८९ पासून कायम कर्मचारी असून, माझ्या घरची परिस्थिती अत्यंत सर्व साधारण आहे. माझा मुलगा इंजिनिअरींगचे प्रथम वर्ष शिक्षण घेत असून, लहान मुलगा इयत्ता ७ वी मध्ये शिकत आहेत, त्यांची पालनपोषणाची तसेच वडिल ८० वर्षाचे वृध्द असून त्यांच्या औषधोपचाराची जबाबदारी माझेवरच आहे. मला नौकरीशिवाय उदरनिर्वाहाचे दुसरे साधन नाही. मला आहे त्याच पदावर व आहे त्याच वेतनावर वरिष्ठ लिपीक म्हणून फ्रेश नेमणूक दिल्यास मी संस्थानचे विरूध्द लेबर व इंडस्ट्रियल कोर्टात दाखल केलेल्या केसेस विना विलंब मागे घेण्यास तयार आहे. तरी माझे अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार करून मला आहे त्या पदावर व आहे त्या वेतनावर कामावर घेऊन, माझ्या कुटुंबाला जगण्याची, मला संस्थानमध्ये पुर्ववत सेवा करण्याची संधी दयावी ही नम्र विनंती" असे म्हटलेले आहे. श्री.उपासनी यांचे दि.२५-०४-२०११ रोजीचे अर्जावर मा.अध्यक्ष महोदय यांनी "येत्या सभेमध्ये ठेवणे" अशी शिफारस केलेली आहे.

त्याचप्रमाणे श्री.उपासनी यांना पुर्ववत कामावर घेणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीपुढे ठेवून त्यास मान्यता घ्यावी. अशी शिफारस मा.उपाध्यक्ष महोदय यांनी दि.१९-०८-२०११ रोजीचे पत्रान्वये केलेली आहे. सदर पत्रात "श्री.उपासनी यांनी त्यांचे जून-२०१० चे पत्रान्वये संस्थान विरूध्द कामगार न्यायालयात दाखल केलेली तक्रार मागे घेऊन, तडजोड करण्यास तयार आहे. त्यांनी पुन्हा कामावर घेण्याबाबत विनंती केलेली आहे. श्री.उपासनी यांचे वयोवृध्द वडिल ७९ वर्षाचे असून ते सतत आजारी असतात. त्यांची मुलेही अभियांत्रीकी शिक्षण घेत आहेत. त्यांना दि.०१ जानेवारी २०१० पासून संस्थानकडून कोणताही पगार मिळत नाही. तरी श्री.मोहन उपासनी यांना कामावर घेण्याबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीसमोर ठेवून, त्यास मान्यता घ्यावी व आवश्यक ती कार्यवाही करून तडजोड करावी"असे म्हटलेले आहे.

सबब, श्री.मोहन एकनाथ उपासनी, बडतर्फ वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा यांचे दि.२५-०४-२०११ व दि.२९-०८-२०११ रोजींचे अर्जाबाबत, तसेच मा.उपाध्यक्ष महोदय यांचेकडील जा.क्र.७४२ दि.१९-०८-२०११ रोजीचे पत्राबाबत सहानुभूतीपुर्वक विचार करून, श्री.उपासनी यांचे बडतर्फीबाबत फेर विचार होऊन, त्यांना कोर्ट केसेस संबंधीत न्यायालयातून काढून घेणेचे अटीवर पुन्हा वरिष्ठ लिपीक म्हणून फ्रेश नेमणूक देऊन, संस्थान सेवेत रूजू करून घ्यावयाचे किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.मोहन एकनाथ उपासनी यांनी कॅश कांऊटींग मधील पैसे चोरुन आर्थिक गैरव्यवहार केला असल्याने त्यांचे बडतर्फीबाबत फेरविचार करणेत येऊ नये. तसेच श्री. उपासनी यांचेबाबतचा प्रस्ताव ०२ वेळा मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवणेत आलेला असून**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**समितीने तो अमान्य केलेला असल्यामुळे श्री.उपासनी यांचेबाबत कोणीही शिफारस केली तरी पुन्हा फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करण्यात येऊ नये, असे ठरले.**

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.५९** **जुने प्रसादालय परिसरात प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक शेतकरी सहकारी संस्था,लोणी यांचे स्टॉलला पुढील मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **१)** साईभक्तांचे सोयीसाठी (जुने) प्रसादालय परिसरात (स्टॉलसाठी) यापुर्वी प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रीया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्या. लोणी, यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०५/१२/२०१० चे व दि. १३/०२/२०११ चे सभेतील निर्णयास अनुसरुन जा.क्र. एसएसएस वशी -विधी /६३४/२०११ दि. २९/०४/२०११ चे आदेशाने दि. ३०/१०/२०१० ते दि. २९/०९/२०११ याकालावधी साठी लिव्ह अँन्ड लायसेन्स तत्वावर खालील तक्त्या प्रमाणे व्यवसाय चालविण्यास परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | डिपॉझिट फी व मासिक भाडे,विद्युत बिल वेगळे | जागेचा वापर | पुर्वीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रवरा फळे भाजीपाला उत्पा.व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सह.संस्था, लोणी | मासिक भाडे ५,५००/- (डिपॉझिट रक्कम १०,०००/-) | बेदाणा विक्री साठी | दि. ३०/१०/२०१० ते दि. २९/०९/२०११ |

जुने प्रसादालय परिसरात प्रवरा फळे भाजीपाला उत्पा.शेतकरी सह.संस्था लोणी यांचे व्यतिरीक्त **०१)** श्रीरामपुर दुध जिल्हा मध्यवर्ती संघ,बाभळेश्वर,ता.राहाता, **०२)** संगमनेर तालुका सहकारी दुध उत्पादक व प्रक्रिया संघ,मर्या.घुलेवाडी, **०३)** गोदावरी खोरे दुध संघ,कोपरगांव या ३ संस्थांना देखील याच परिसरात मा.व्यवस्थापन मंडळाचे ठरावा नुसार मासिक परवाना फी रु. ५,५००/- आकारुन जागा वापरांस दिलेली आहे. दि. ३१/१२/२०११ अखेर मुदतवाढ देण्यात आली आहे.

**२)** प्रवरा फळे भाजीपाला उत्पा.शेतकरी सह.संस्था लोणी यांनी दि. १६/०९/२०११ च्या पत्राने जुन्या प्रसादालय परिसरातील मोकळ्या जागेतील स्थळाची पुढील मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे. तसेच संस्थान नियमाप्रमाणे असणारे भाडे भरण्यास तयार असलेबाबत कळविले आहे. दि.३०/१०/२०१० ते दि.२९/०९/२०११ अखेर त्यांनी परवाना फी जमा केलेली आहे.

**३)** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार प्रवरा फळे भाजीपाला उत्पा.शेतकरी सह.संस्था लोणी यांना वापरांस देण्यात आलेल्या परवानगीचा कालावधी दि. २९/०९/२०११ रोजी संपुष्टात येत आल्याने पुढील कालावधीकरीता सदर जागेत संस्थेस स्टॉल चालविणेस परवानगी मिळणेस विनंती केली आहे. प्रस्तुतचे सहकारी संस्थेस मागील अटी शर्ती प्रमाणेच त्याचठिकाणी स्टॉल करीता लिव्ह अँन्ड लायसेन्स तत्वावर वापरांस देण्यात आलेल्या स्टॉलसाठी दि. ३०/०९/२०११ ते दि. २९/०८/२०१२ पावेतो ११ महिन्यासाठी मुदतवाढ देता येईल व त्यांचेकडुन मासिक परवाना फी रु. ५,५००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजे रुपये ६,०५०/- ( अक्षरी रु. सहा हजार पंन्नास ) मात्र व मिटर रिडींग प्रमाणे लाईट बील वेगळे आकारुन मुदतवाढ देणेबाबतचे विषयावर निर्णय होणेसाठी सादर.

**निर्णय क्र.७३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जुने प्रसादालय परिसरात प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक शेतकरी सहकारी संस्था, लोणी यांचे स्टॉलला स्टॉलसाठी दि. ३०/०९/२०११ ते दि. २९/०८/२०१२ पावेतो ११ महिन्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी व त्यांचेकडुन मासिक परवाना फी रु. ५,५००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजे रुपये ६,०५०/- मात्र व मिटर रिडींग प्रमाणे लाईट बील वेगळे आकारण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी )

---

**विषय नं.६०** **प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया,मुंबई यांना भाडे पट्ट्याने देण्यात आलेल्या जागेच्या मासिक परवाना फी मध्ये वाढ करणे व पुढील एक वर्षाचा करारनामा करणेस मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** १) प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडे पट्ट्याने देण्यात आलेल्या संस्थानचे सर्व्हे नं.१४८/२ मधील जागेचे (४ खोल्या ११४.३२ चौ.मी. बांधकाम क्षेत्रासह व २६६.२८ चौ.मी. मोकळ्या जागेच्या) मासिक परवाना फी मध्ये वाढ करणे व पुढील एक वर्षाचे म्हणजे दि.२१/०८/२०१० ते दि. २०/०८/२०११ कालावधीचा करारनामा करणेस मान्यता देणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/११/२०१० रोजीचे सभेत विषय क्र. ६४ ने सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ९१२ अन्वये प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांचे अधिकाऱ्यांना पुढील सभेपुढे समक्ष चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे ठरले होते. त्याप्रमाणे जा.नं. एसएसएस वशी -विधी /१२०३३/२०११ दि. ०९/०२/२०११ ने त्यांना दि. १३/०२/२०११ रोजी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चेसाठी बोलविण्यात आले होते. श्री राजेश बारापत्रे ( आय ई एस) व श्री

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



बी.ए.जपे, ( असिस्टंट इंजिनीअर ) हे शिर्डीस चर्चेसाठी आले होते. प्रकरणी त्यांनी मा.अध्यक्ष सोा. यांचेशी चर्चा केली. चर्चे मध्ये.-

१) सन दि. २१/०८/२००६ ते दि. २०/०८/२००९ या कालावधी साठी मुळ ( मासिक भाडे ) रेट रु. ३३२५/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजे रु. ३६५७-५० निश्चीत करुन त्याप्रमाणे फरकाची रक्कम प्रसार भारती यांचेकडून वसुल करणेत यावी.

२) दि.२१/०८/२००९ पासून ३ वर्षासाठी मासिक परवाना फी रुपये ३६५७-५० मध्ये १०% वाढ करुन ( म्हणजे रु. ४,०२४/- प्रती महा ) रेंट निश्चीत करुन त्याप्रमाणे फरकाची रक्कम प्रसार भारती यांचेकडून वसुल करणेत यावी.

३) प्रसारभारती दुरदर्शन, मुंबई यांना १५ वर्षासाठी जागा भाड्याने देणेबाबत मंजूरी आहे, परंतू संस्थानच्या सन २००४ च्या अधिनियमाचे तरतुदीस आधीन राहून प्रसारभारती यांना १ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी संस्थान मिळकत लिज डिडवर देता येणार नाही. करीता प्रसारभारती यांना पुढील टप्प्यासाठी दि.२१/०८/२०१० ते दि. २०/०८/२०११ पावेतो मासिक परवाना फी रु. ४,०२४/- ( अक्षरी रु. चार हजार चोवीस मात्र ) व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन कराराचे नुतनीकरण करणेसाठी मान्यता देण्यात आली.

या प्रस्तावास प्रसारभारती कडून सहमती / तयारी दर्शविली आहे.

मा.अध्यक्ष सोा. यांचेशी प्रसारभारतीचे प्रतिनिधींनी दि. १३/०२/२०११ रोजी समक्ष चर्चा केलेली आहे. प्रकरणी अ.क्र. नं. १,२ व ३ वरील प्रमाणे प्रस्तावास उभयंतांकडून संमती दर्शविण्यात आलेली आहे. करीता सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२/०६/२०११ चे व दि.२८/०८/२०११ चे सभेपुढे विषय सादर करण्यात आला होता. त्यावर " सविस्तर चर्चा होऊन, प्रसार भारती ब्रॉडकास्टीग कार्पो. ऑफ इंडीया, मुंबई यांचे अधिकाऱ्यांना / प्रतिनिधींना पुढील सभेपुढे चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे ठरले. " त्याप्रमाणे प्रसार भारती ब्रॉडकास्टीग कार्पो. ऑफ इंडीया, मुंबई यांचे अधिकाऱ्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चेसाठी बोलविण्यात आले आहे. प्रसार भारती यांचे सोबत दि.२१/०८/२०१० ते दि. २०/०८/२०११ पावेतो करावयाचे करारनामा Lease Deed करावयाचे मान्यतेसाठी सादर. तसेच

दि.२१/०८/२०१०ते दि.२०/०८/२०११ चा कालावधी संपूष्टात आला असल्याने दि.२१/०८/२०११ ते दि.२०/०८/२०१२ या एक वर्षाचे कालावधी साठी Lease वर जागा वापरांस/करारास मुदतवाढ देणेबाबतचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.७३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया,मुंबई यांना भाडे पट्ट्याने देण्यात आलेल्या जागेस मासिक प्रस्तावित केलेली मासिक फी आकारुन श्री साईबाबांच्या आरत्या प्रक्षेपण करण्याचे अटीवर दिनांक २१.०८.२०११ पासून पुढे सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी. याकामी करारनामा मा.विश्वस्त श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर यांचे सल्ल्याने करण्यात यावा, असें ठरलें.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.६१** **शिर्डी येथील संस्थानचे साईउद्यान इमारतीतील पोष्ट ऑफिस करिता वापरास दिलेल्या जागेबाबत.**

**प्रस्ताव-** ०१) अधिक्षक, डाकघर, श्रीरामपूर यांचे दि. २८/११/२००३ व दि. ०१/१२/२००३ चे पत्रास अनुसरुन संस्थानने मा.व्यवस्थापन समितीचे दि. १३/१२/२००३ चे मंजूर ठरावा प्रमाणे शिर्डी येथे पोस्टऑफीसचे वापरासाठी संस्थानने लिव्ह अँड लायसन्स तत्वावर दि. १८/१२/२००३ ते दि. १७/११/२००४ या कालावधीसाठी ११ महिने मुदतीसाठी संस्थानचे साईउद्यान इमारतीमधील २ हॉल्स् (१,५९९.४१ स्क्वे.फुट)वापरांस देणेत आले आहे. सदर जागेची परवाना फी शासकीय दराने(लाईट बिल अलहिदा ) पोस्टऑफीसने संस्थानास अदा करणेबाबत जा.क्र.एसएसएस/वशी ०२/६९४/२०१० दि.०७/०४/२००४ ने कळविणेत आलेले आहे.

त्यानंतर मा.व्यवस्थापन समीतीचे दि.२७/१२/२००४ ठरावांस अनुसरुन पुढील ११ महिने कालावधी साठी (दि.१८/११/२००४ ते १७/१०/२००५) लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर उपरोक्त जागा पोस्टखात्यास वापरास देणेत आली. टपाल विभागाचे भाडे-निर्धारण समितीने निर्धारित केलेले भाडे आकारणी (लाईट चार्जेस अलहिदा) प्रमाणे भाडे आकारणीवर प्रस्तुतची जागा त्यांना वापरांस देणेत आलेली आहे.

शिर्डी पोस्टऑफीसला वापरांस दिलेले उपरोक्त जागेचे संदर्भात त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि. १४/१२/२००५ चे व्यवस्थापन समितीचे सभेत ठराव होऊन पी.डब्ल्यु.डी. ने ठरवुन दिलेले दराने पोस्टऑफीसकडुन पांच वर्षाचा करारनामा करणेत यावा. व त्यानंतर महाराष्ट्र शासनाची मान्यता घ्यावी असा निर्णय झाला आहे. थोडक्यात खाली तक्त्यात दर्शविलेप्रमाणे जागा वापरांस दिलेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.क्र. | मा.व्यवस्थापन मंडळाचा ठराव दिनांक | वापरांस दिलेला कालावधी |
|---|---|---|
| १ | दि. १३/१२/२००३ निर्णय क्र. ५९० | दि. १८/१२/२००३ ते दि. १७/११/२००४ |
| २ | दि. २७/१२/२००४ निर्णय क्र. १६६ | दि. १८/११/२००४ ते दि. १७/१०/२००५ |
| ३ | दि. १४/१२/२००५ निर्णय क्र. ७७० | दि. १८/१०/२००५ ते दि. १७/१०/२०१० |
| ४ | दि.२६/०३/२०११ निर्णय क्र. २३९ | दि. १७/१०/२०१० ते दि. १६/१०/२०११ |

पोस्टखात्याकडून दि.०५/०३/२०१० चे पत्राने व त्यापुर्वीही ५ वर्षाचा भाडेपट्टा नोंदणी नुतनीकरणाबाबत मागणी केलेली होती. मात्र संस्थानचे अधिनियमाप्रमाणे ५ वर्षाचा भाडेपट्टा करता येणार नाही व तसे पोस्टखात्यास दि.३१/०७/२०१० जा.क्र.८७५१/१०, चे पत्राने कळविलेले आहे. शासनाचे मान्यतेशिवाय ५ वर्षासाठी अधिनियमाचे तरतुदीस अनुसरुन त्यांना जागा वापरांस देता येणार नाही. याबाबतचा विचार करता १ वर्षासाठी दि. १७/१०/२०१० ते दि. १६/१०/२०११ या कालावधीसाठी त्यांना जागा लिव्ह अँड लायसन्स तत्वावर वापरांस देणेबाबत व त्यांचेकडून शासन नियमास अनुसरुन पी.डब्ल्यु.डी. / सेंट्रल पी.डब्ल्यु.डी. / पोष्टाची भाडे निर्धारण समिती यांनी निर्धारीत केलेले रेंट (भाडे) आकारुन ( मिटर रिडींग प्रमाणे लाईट बील वेगळे आकारुन ) जागा वापरांस देणेचे मंजूरीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०३/२०११ चे सभेपुढे विषय सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. २३९ ने "सविस्तर चर्चा होऊन, साईदद्यान इमारतीत शिर्डी पोस्ट ऑफीसला दिलेल्या जागेस दि.१७/१०/२०१० ते दि.१६/१०/२०११ या ०१ वर्ष कालावधीसाठी लिव्ह अँन्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देण्यात यावी. त्यांचेकडून शासन नियमास अनुसरुन पी.डब्ल्यु.डी./सेंन्ट्रल पी.डब्ल्यु.डी./ पोष्टाची भाडे निर्धारण समिती यांनी निर्धारीत केलेले रेट (व ) मिटर रिडींग प्रमाणे लाईट बील वेगळे आकारण्यात यावे. तसेच ०१ वर्षाचा कालावधी संपलेनंतर पुन्हा मुदतवाढ देण्यात येणार नाही. असे त्यांना स्पष्ट कळविण्यात यावे, असे ठरले. "

उपरोक्त ठरावास अनुसरुन पोस्टखात्यास दि.३१/०५/२०११ चे पत्राने दि.१७/१०/२०१० ते दि.१६/१०/२०११ या ०१ वर्षाचे कालावधीसाठी त्यांचे जागेचे वापरांस मुदतवाढ दिलेबाबत व दि.१२/०७/२०११, दि.०४/०८/२०११ व दि.१७/०९/२०११ चे पत्राने करारनामा करुन देणेबाबत कळविलेले आहे. तसेच दि.१२/०९/२०११ रोजी करारनाम्याचा मसुदादेखील पाठविला आहे. परंतू अद्याप त्यांनी करारनामा करुन दिलेला नाही. तसेच रेंटबाबत देखील लेखी काही कळविलेले नाही.

यापुर्वी पोस्टऑफीसकडून त्यांना वापरांस दिलेल्या जागेचे रु. १,०००/- मासिक परवाना फी प्राप्त झाली आहे व होत आहे. अधिक्षक, श्रीरामपूर पोस्टऑफीस यांचे अखत्यारीत रु.३०००/- मात्र मासिक परवाना फी अदा करणेचे अधिकार आहेत, असे श्री संतोष जोशी, इन्स्पेक्टर, कोपरगांव यांनी दुरध्वनीवरुन सांगीतले आहे. परंतू त्याबाबतही काही लेखी प्रस्ताव नाही.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०३/२०११ च्या निर्णयाप्रमाणे दि.१७/१०/२०१० ते दि.१६/१०/२०११ या १ वर्षाचे कालाधीसाठी जागा वापरांस पोस्टखात्यास मुदतवाढ दिलेली आहे व पुढील मुदतवाढ देता येणार नाही, असे कळविले आहे. आता पोस्टखात्यास वापरांस दिलेल्या साई उद्यान इमारतीतील जागेची मुदत दि.१६/१०/२०११ रोजी संपुष्टात येत आहे. व पोस्टखात्याकडून अद्यापपर्यंत शासन नियमास अनुसरुन पी.डब्ल्यु.डी. किंवा सेंट्रल पी.डब्ल्यु.डी. किंवा पोष्टाची भाडे निर्धारण समिती यांनी निर्धारीत केलेली मासिक परवाना फी ठरविलेली नाही / निश्‍चित केली नाही, मात्र दि.२५/०८/२०११ रोजीचे पत्र इकडेस पाठविले असून सेंट्रल पी.डब्ल्यु.डी.चे दि.०९/०८/२०११ चे पत्रास अनुसरुन पोष्टाचे फेअर रेंट असेसमेंट कमिटी यांचेकडून रेंट निश्‍चित करणेसाठी हायर ऑथरिटीज् कडे प्रकरण सादर केले आहे. करीता रेंट निश्‍चित झालेनंतजर करार करणे उचित राहील, असे त्यांनी कळविले आहे. याच पत्रान्वये पोस्टऑफीस जनतेसाठी कामकाज करते, बहूतांशी कामकाज शिर्डी संस्थानशी/ साईभक्तांशी निगडीत आहे. करिता खाजगी संस्थेप्रमाणे पोष्ट ऑफीस मानु नये, सहकार्य करावे, अशी विनंती पोस्टऑफीसमार्फत करणेत आलेली आहे. करीता सदर पत्राचा विचार होऊन

०१) पोस्टऑफीस, शिर्डी यांना दि.१७/१०/२०११ ते १६/१०/२०१२ पावेतोचे मुदतीसाठी संस्थानचे साईउद्यान इमारतीचे २ हॉल्स क्षेत्र १५९९.४१ चौ.फुट क्षेत्र लिज वर/ लिव्ह अँड लायसन्स तत्वावर (वापरांस सध्याचे वापरात असलेले क्षेत्र) वापरास देणेबाबत मुदतवाढ देणेबाबत व त्याबाबत लिव्ह अँड लायसन्स फी/भाडे पोस्टऑफीसचे रेंट असेसमेंट कमिटीकडून निश्‍चित केलेली रेंट आकारणेबाबत पुढील विचारार्थ सादर. सदर रेंट/भाडे दि.१७/१०/२०१० ते दि.१६/१०/२०११ सन २०१०-११ व दि.१७/१०/२०११ ते दि.१६/१०/२०१२ या कालावधीस आकारणेबाबत (लाईट बिल वेगळे आकारुन) व त्या अनुषंगाने करारनामा करणेचे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.७३४ यावर सविस्तर चर्चा होऊन, पोस्टऑफीस, शिर्डी यांना दि.१७/१०/२०११ ते १६/१०/२०१२ पावेतोचे मुदतीसाठी संस्थानचे साईउद्यान इमारतीचे २ हॉल्स क्षेत्र १५९९.४१ चौ.फुट सध्याचे वापरास असलेले क्षेत्र लिज वर/ लिव्ह अँड लायसन्स तत्वावर वापरास मुदतवाढ देणेस व**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**त्याबाबत लिव्ह अँड लायसन्स फी/भाडे पोस्टऑफीसचे रेंट असेसमेंट कमिटीकडून निश्चित होणारे रेंट आकारणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.६२ खुले नाटयगृह व त्यासमोरील जागेत भजनाचे कार्यक्रमास परवानगीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री ए.एन. रेडडी, हैद्राबाद यांनी श्री साईबांबाना सोन्याचे सिहांसन देणगी स्वरुपात अर्पण कलेले आहे. तसेच समाधी मंदिराच्या मुख्य गाभ्या-यातही भिंतीवर तसेच खांबावर सोन्याचे काम देणगी स्वरुपात अर्पण केले आहे. मागील वर्षी त्यांना लेंडीबागेत उपरोक्त कार्यक्रमास परवानगी देण्यास शिरडी ग्रामस्थांनी त्यास हरकत घेतल्यामूळे श्री रेडडी यांना लेंडीबागे ऐवजी खुले नाटयगृहात भजन करणेस परवानगी देणेत आलेली होती.

श्री ए.एन.रेड्डी, हैद्राबाद, यांनी दि ९/८/२०११ अर्जान्वये दि.२४/१२/२०११ ते दि.३१/१२/२०११ अखेर मागील वर्षाप्रमाणे खुले नाटयगृह येथे अखंड भजनाचे कार्यक्रमास परवानगी तसेच इतर खालील प्रमाणे इतर सुविधा मिळणे बाबत विनंती केलेली आहे.

| अ.नं. | मागणीचा तपशिल | कार्यालयीन अभिप्राय |
|---|---|---|
| ०१ | दिनांक २४/१२/२०११ ते ३१/०१२/२०११ या कालावधीत खुले नाटयगृह व त्यासमोरची जागा मिळावी. | विशेष देणगीदार साईभक्त असलेने मागील वर्षाप्रमाणे सदर जागेवर भजनास परवानगी देता येईल. |
| ०२ | इलेक्ट्रीक कनेक्शन, साऊंड सिस्टीम संस्थानकडून मिळावी | मिटर प्रमाणे विद्युत आकार घेऊन विद्युत कनेक्शन देता येईल. मात्र साऊंड सिस्टीम, मंडप व स्टेज ची व्यवस्था अर्जदारस स्वत: करावी लागेल. |
| ०३ | साईभक्त निवासस्थान मध्ये साधारणत: ४०० साईभक्तांसाठी खोल्या व त्यांना जेवण तयार करण्यासाठी जागा मिळावी. | या कालावधीत गर्दी जास्त असल्याने तसेच काही खोल्यांचे आरक्षण ऑन लाईन होत असलेने उपलब्धते नूसार खोल्या सशुल्क देता येतील. |

तरी श्री रेडडी यांना दिनांक २४/१२/२०११ ते ३१/१२/२०११ या कालावधीत खुले नाटयगृह व त्यासमोरील जागेत भजन करण्यास परवानगी देणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.७३५ यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री ए.एन.रेड्डी, हैद्राबाद, यांना दि.२४/१२/२०११ ते दि.३१/१२/२०११ अखेर मागील वर्षाप्रमाणे खुले नाटयगृह येथे अखंड भजनाचे कार्यक्रमास परवानगी देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.६३ भक्त मंडळांचे सभासदांना प्रत्येक उत्सवाचे निमंत्रण पत्रिका व उदी प्रसाद वेगवेगळा न पाठविता उत्सवाचे अगोदर एकत्र पाठविणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान मार्फत साजरे करण्यात येणारे रामनवमी , गुरुपौर्णिमा व पुण्यतिथी या तिन मुख्य उत्सवापूर्वी भक्तमंडळाचे सभासदांना प्रत्येक उत्सवापूर्वी निमंत्रण पत्रिका व उत्सवा नंतर उदी प्रसाद पाठविण्यात येतो. दिवसेंदिवस भक्त मंडळाचे सभासदांची संख्या वाढत आहे.

गुरुपौर्णिमा उत्सव २०११ करीता याकामी खालील प्रमाणे खर्च आला आहे.

| अ.नं. | तपशिल | संख्या | पोष्टेज दर | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | भारतातील सभासदांना निमंत्रण पत्रिका पाठविणे | १५२२५४ | २.५० | ३८०६३५.०० |
| ०२ | परदेशातील सभासदांना निमंत्रण पत्रिका पाठविणे | २७८९ | २५.०० | ६९७२५.०० |
| ०३ | भक्त मंडळाचे सभासदांकरीता निमंत्रण पत्रिका छपाई करणे | १६०००० | - | १८४८००.०० |
| ०४ | भारतातील सभासदांना उदी प्रसाद पाठविणे | १५२२५४ | ५.०० | ७६१२७०.०० |
| ०५. | परदेशातील सभासदांना उदी प्रसाद पाठविणे | ३७८९ | २५.०० | ९१७२५.०० |
| | | | एकुण खर्च- | १४६६१५५.०० |

भक्त मंडळाचे सभासदांना प्रत्येक उत्सवापूर्वीच निमंत्रण पत्रिका व उदी प्रसाद एकाच पाकीटातून पाठविल्यास भारतीतील सभासदांस प्रत्येकी ५ रुपये व परदेशातील सभासदास प्रत्येकी रु. २५ मात्र खर्च येईल. म्हणजेच सध्या उदी प्रसादा करीता येणारे पोष्टेज खर्चातच निमंत्रण पत्रिका व उदी प्रसाद भक्त मंडळाचे सभासदांना मिळेल. यामूळे संस्थानला सध्या येणारे निमंत्रण पत्रिकेचे पोष्टेज खर्चात बचत होईल.

तसेच सध्या निमंत्रण पत्रिका अंर्तदेशीय कार्ड पध्दतीने पाठविण्यात येतात त्या करीता सदर पत्रिका विशिष्ट ग्लुसह छपाई कराव्या लागत असलेने छपाई खर्च जास्त येतो आहे. प्रस्तावीत पध्दतीने एकाच पाकीटात पत्रिका व प्रसाद पाठविलेस सदर पत्रिका विना ग्लुच्या छपाई करता येतील त्यामूळे छपाई खर्चात देखील बचत होईल.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तसेच निमंत्रण पत्रिका व उदी प्रसाद पाठविणेचे काम एकाच वेळी केल्याने कामगारांचे पगारावरील खर्चात देखील बचत होईल.

प्रत्येक उत्सवापुर्वी भक्त मंडळाचे सभासदांना निमंत्रण पत्रिका व उदी प्रसाद एकाच पाकीटात पाठविलेस खालील प्रमाणे खर्च येईल.

| अ.नं. | तपशिल | संख्या | पोष्टेज दर | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | भारतातील सभासदांना निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद पाठविणे. | १५२२५४ | ५.०० | ७६१२७०.०० |
| ०२ | परदेशातील सभासदांना निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद पाठविणे. | २७८९ | २५.०० | ६९७२५.०० |
| ०३ | भक्त मंडळाचे सभासदांकरीता निमंत्रण पत्रिका छपाई करणे. | १६०००० | - | १०००००.०० |
| | | | एकुण खर्च- | ९,३०,९९५.०० |

वरील प्रमाणे प्रत्येक उत्सवा ९,३०,९९५.०० खर्च येईल म्हणजे प्रत्येक उत्सवा ५,३५,१६०/- इतकी म्हणजे वर्षातील ३ उत्सवात १६,०५,४८०/- इतकी पोष्ठेज खर्चात बचत होईल.

प्रस्तावित केलेल्या भक्त मंडळ विनीयमात खालील प्रमाणे तरतूद सुचविलेली आहे.

**4. The rights and privileges of the members of the Bhakta Mandal:-**

1) Invitations of three ustavas of Sansthan Viz Ramnavami, Guru Pournima and Punyatithi of Shri Saibaba shall be extended to members by Post, Express Courier, Fax, E-mail or any other mode of electronic communications.

2) Every member shall be entitled to receive the 'Udiprasad' by post after each of the three official festivals.

उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळाल्यास सदरचे विनीयमात तशी सुधारणा करणेचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी सादर करता येईल.

तरी यापूढील उत्सवापासून भक्त मंडळाचे सभासदांना प्रत्येक उत्सवापूर्वी निमंत्रण पत्रिका व उदी प्रसाद एकाच पाक्रीटातून पाठविणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.७३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, यापूढील उत्सवापासून भक्त मंडळांचे सभासदांना प्रत्येक उत्सवाची निमंत्रण पत्रिका व उदी प्रसाद वेगवेगळा न पाठविता उत्सवाचे अगोदर एकत्रित पाठविण्यात यावा. तसेच विनीयमात तशी सुधारणा करणेचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.६४ श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०११ कार्यक्रम व मानधन निश्चितीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०११ हा दि.१४/०७/२०११ ते दि.१६/०७/२०११ अखेर तीन दिवस साजरा झालेला आहे. सदर उत्सवात कार्यक्रम करणेस परवानगी मिळणेकरीता ४ किर्तनकार व २३ भजन-संगीत कलाकारांनी संस्थानला विनंती पत्रे पाठविली होती.

दि. १२/०६/२०११ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रंमाक ४८४ नूसार श्री गुरुपौर्णिमा-२०११ चे उत्सवाचे तीन दिवसाचे कालावधीसाठी कलाकार / मानधनासह निश्चीती स्थानीक विश्वस्त समिती सभेत करण्यात यावी असे ठरले होते.

यानूसार श्री गुरुपौर्णिमा उत्सवा २०११ करीता मा.श्री अशोकराव खांबेकर व मा.डॉ. एकनाथराव गोंदकर यांनी मा.श्री सुरेशराव वाबळे व मा. अध्यक्ष सो। यांनी चर्चा करुन खालीलप्रमाणे किर्तनकार/ कलाकार कार्यक्रम व त्यांचे मानधन निश्चीत केलेले असून त्यानूसार गुरुपौर्णिमा उत्सवात कीर्तन व कलाकार कार्यक्रम झालेले आहेत.

| **अ.नं.** | **कलाकार/ किर्तनकार नांव** | **कार्यक्रम तपशील** | **दिनांक** | **मानधन** |
|---|---|---|---|---|
| **०१.** | ह.भ.प. मनोहर महाराज कोकलेगांवकर विठ्ठलवाडी , नांदेड | **कीर्तन** | **१४/०७/२०११ ते १६/०७/२०११** | **रु.९००१/-** |
| **०२.** | श्री बॉबी श्रीवास्तव ए/ ६०१ , ग्रीन वूडस को.हौ.सो. चिकूवाडी, लिंक रोड , शिफोली , बोरीवली, मुंबई- ९२ मो. ९८२००४६६११ | **साई भजन संध्या** | **१४/०७/२०११ रा. ७.३० ते ९.००** | **रु. ११,०००/-** |
| **०३.** | डॉ. सौ. मंगला सुधीर आपटे, मधुरा अपार्टमेंट, कमला नेहरु पार्क मागे, एरंडवणे, पुणे - ४११ ००४. फो.नं. ०२०- २५६५७८९८ | **साई भजन संध्या** | **१४/०७/२०११ रा. ९.०० ते १०.३०** | **रु.११,०००/-** |
| **०४.** | श्री. भूषण नंदकिशोर तोष्णीवाल ,श्रा निवास , जीवन नगर, रामकृष्ण मोरे सभागृहाजवळ, चिंचवड , पुणे. ९४२२०५७१४ | **विविध गीत गायन** | **१५/०७/२०११ रा. ७.३० ते ९.००** | **रु.११,०००/-** |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.नं. | कलाकार/ किर्तनकार नांव | कार्यक्रम तपशील | दिनांक | मानधन |
|---|---|---|---|---|
| ०५. | श्री. विजय साखरकर, दत्तनिवास चाळ नं.२/१०, देविपाडा,मच्छीमार्केट समोर,बोरीवली (पुर्व ) मुंबई नं. ६६. मो. ९८२१३९३३२३ | **साई स्वर नृत्योत्सव** | **१५/०७/२०११ रा. ९.०० चे पुढे** | **रु.११,०००/-** |
| ०६. | उस्ताद मुमताज हूसेन खॉं, वाराणसीउस्ताद मुमताज हुसैन खान, डी-५५-१४९९,औरंगाबाद, वाराणसी-२२१०१०,उत्तरप्रदेश मो.नं.९८३९३०७८८६ | **शहनाई वादन** | **१६/०७/२०११ रा. ७.३० ते ९.००** | **रु. ५१,०००/-** |
| ०७ | सक्सेना बंधु , (मुकेश सक्सेना), ए-१, साई अपार्टमेंटस, ८३/१, गौतम नगर - नवी दिल्ली -११००४९ मो.नं. ०९८११०९१३०३ , ०९८९९२२००२४. | **साई भजन संध्या** | **१६/०७/२०११** रा. ९.०० ते १०.३० | **रु.११,०००/-** |

तरी गुरुपौर्णिमा उत्सव- २०११ मध्ये उपरोक्त प्रमाणे कलाकार कार्यक्रम व मानधन निश्चतीबाबत स्थानिक विश्वस्तांसमवेत चर्चा करुन घेऊन पार पाडले आहेत. तरी व्यवस्थापन समितीत नोंद घेणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.७३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०११ मध्ये आयोजित करण्यात आलेले कार्यक्रम व कलाकारांना देण्यात आलेले मानधन निश्‍चितीबाबत नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.६५ झेरॉक्स कंपनीच्या ५६४५ झेरॉक्स मशिनसाठी ड्रम कार्टेज खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** संस्थानचे कार्यालयीन कामासाठी झेरॉक्स कंपनीचे मॉडेल नं.५६४५ हे मशीन दि.२७/०३/२०१० रोजी देणगी मिळाले आहे.

उपरोक्त मशीनकरीता सन २०१०-२०११ या वर्षात ३ ड्रम कार्ट्रेजची आवश्यकता असल्याने ते खरेदी विभागामार्फत खरेदी करुन मिळणेबाबत खरेदी विभागास कळविण्यात आले होते.

खरेदी विभागामार्फत सुरेंद्र ट्रेडर्स, नाशिक, यांना जा.नं.एसएसएस,वशी-खरेदी/ १०४३४/ २०१०, दि.१५/१२/२०१० अन्वये प्रती नग रु.२४,०१०/- प्रमाणे ३ ड्रम कार्ट्रेजचा पुरवठा करणेचा आदेश देण्यात आला होता.

सदर पुरवठादाराने एकच ड्रम कार्ट्रेज पुरविले आहे. त्यात साधारण १ लाख प्रती झेरॉक्स झालेल्या आहेत. उर्वरीत २ नग ड्रम कार्ट्रेज ते पुरविण्यास तयार नाहीत. त्यामुळे खरेदी विभागाने पुरवठादाराला सांगुन त्यांची डिपॉझिट रक्कम रु.१३९९०/- जप्त केली आहे.

तातडीची गरज म्हणून झेरॉक्स कंपनीचे अधिकृत डिलर `ओम साई मार्केटिंग औरंगाबाद` यांचेकडून एक ड्रम कार्ट्रेज खरेदी विभागामार्फत व्हॅटसह ३८,०००/- रुपयास खरेदी करण्यात आले आहे व सध्या ते वापरात आहे. दि.०१/०९/२०११ पर्यंत सदर ड्रममध्ये ९० हजार झेरॉक्स प्रती झालेल्या असून ६५ % ड्रम कार्ट्रेज शिल्लक आहे, म्हणजे त्यामध्ये साधारण आणखी १.२० लाख प्रती झेरॉक्स निघतील. हे ड्रम कार्ट्रेज साधारण १ महीना पुरेल.

त्यानंतर सध्याच्या वापराप्रमाणे मार्च २०१२ पर्यत अजुन साधारण ४ ड्रम कार्ट्रेज लागणार आहे. प्रती ड्रम कार्ट्रेज बाजार भावानुसार व्हॅटसह किमंत रु.४१,६२५/- प्रमाणे ४ ड्रम कार्ट्रेजसाठी अंदाजे रु.१,६६,५००/- (रु.एक लाख सहासष्ठ हजार पाचशे ) खर्च अपेक्षीत आहे.

तरी सदरचे ड्रम कार्ट्रेज खरेदी विभागामार्फत खरेदी करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, झेरॉक्स कंपनीच्या ५६४५ या झेरॉक्स मशिनसाठी आवश्यक असणारे ४ ड्रम कार्टेज बाजारभावानुसार खरेदी करणेस व याकामी येणारे एकूण अंदाजे रु.१,६६,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-१२)

---

**विषय नं.६६ कु.सुप्रिया चक्रधर ससाणे, रा.तिसगांव ता.पाथर्डी जि.अहमदनगर हीला खेळासाठी ऑस्ट्रेलिया येथै जाण्यासाठी आर्थिक मदत देणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री. चक्रधर माधवराव ससाणे, रा.तीसगांव, ता.पाथर्डी, जिल्हा-अ.नगर यांनी दि.१९/०८/२०११ च्या अर्जाने, माझी मुलगी कु. सुप्रिया चक्रधर ससाणे हीची ऑट्रलिया येथे खेळासाठी निवड झालेली आहे. या करीता रु.१ लाख, २० हजार खर्च येणार आहे. सदरचा खर्च मला करणे शक्य नसल्यामुळे तो खर्च श्री साईबाबा संस्थानने करणेची विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) (एक) नुसार छाननी समितीच्या शिफारसीने राज्य शासनाचे मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे." त्यामध्ये वैयक्तीक अनुदान देणेबाबत तरतुद नाही.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.७३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कु.सुप्रिया चक्रधर ससाणे, हिस ऑस्ट्रेलिया येथै खेळासाठी जाण्यास आर्थिक मदत मिळणेबाबत श्री. चक्रधर माधवराव ससाणे, रा.तीसगांव, ता.पाथर्डी, जिल्हा-अ.नगर यांनी केलेली विनंती अमान्य करण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

---

**विषय नं.६७** **श्री नारायण रावसाहेब पाडेकर, वर्ग -४ कर्मचारी, औद्योगिक प्रशिक्षण संस्था शिर्डी यांची स्पेन या देशात बॉडी बील्डींग चॅम्पीयनशिप स्पर्धेसाठी निवड झालेली असल्याने सदरचे खर्चासाठी आर्थिक मदत देणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री.नारायण रावसाहेब पाडेकर, वर्ग ४ कर्मचारी, औदयोगिक प्रशिक्षण संस्था शिर्डी यांनी दि.०७/०९/२०११ च्या अर्जाने स्पेन या देशात वर्ल्ड बॉडीबिल्डींग चॅम्पीयनशिप स्पर्धा दि.२५/११/२०११ ते दि.२८/११/२०११ या कालावधीत होणार आहे. स्पर्धेसाठी माझी निवड झाली असून त्यासाठी अंदाजे रु.१.३० लाख खर्च येणार आहे. तरी सदरची रक्कम संस्थानकडून मिळावी अशी विनंती केलेली आहे.

सदरच्या अर्जा सोबत, इंडियन बॉडी बिल्डींग ॲण्ड फिटनेस फेडरेशन यांचे दि.०३/०९/२०११ चे पत्र जोडले असून त्यात स्पधेचा कालावधी व श्री.पाडेकर यांची निवड झालेचा उल्लेख आहे. मात्र खर्चाच्या रक्कमेचा उल्लेख नाही.

मा.ना.श्री.राधाकृष्ण विखे पाटील मंत्री, कृषि व पणन, महाराष्ट्र राज्य यांनी "श्री.पाडेकर यांना संस्थान जे अनुदान देईल ते त्यांना मान्य असुन त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी," असे शिफारस पत्र दिलेले आहे.

अधिनियमातील कलम २१ (२) नुसार वैयक्तीक साठी अनुदान देण्याची तरतुद नाही. तसेच दि.२८/०६/२००९ चे मा.छाननी समितीचे सभेमध्ये, वैयक्तीक प्रस्ताव छाननी समितीच्या अखत्यारीत नसल्याने शासनाचे मान्यतेसाठी पाठविण्यात यावेत, असे ठरले होते, त्यानुसार यापुर्वी श्रीमती शितल महाजन यांना पॅराशुट जम्पसाठी, श्री.आप्पासाहेब ढुस यांस स्कायडायव्हींग खेळाचे प्रशिक्षण व साहित्य खरेदीसाठी, व चि.गागरे बंधु यांना बुध्दीबळ खेळाचे प्रशिक्षण व साहित्य खरेदीसाठी, आर्थिक मदत मागणीचे प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले होते. शासनाने त्यांना विशेष बाब म्हणून मान्यता दिलेली होती.

सदरच्या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यास सदर प्रस्ताव थेट शासनाचे मान्यतेसाठी सादर करता येईल.

**निर्णय क्र.७४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री नारायण रावसाहेब पाडेकर, वर्ग -४ कर्मचारी, औद्योगिक प्रशिक्षण संस्था शिर्डी यांची स्पेन या देशात बॉडी बील्डींग चॅम्पीयनशिप स्पर्धेसाठी निवड झालेली असल्याने सदरचे खर्चासाठी आर्थिक मदत मिळणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

---

**दि.२४.०९.२०११ चे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल-**

**विषय नं.६८** **संस्थान कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणे बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान कर्मचाऱ्यांना दरवर्षी दिवाळीपूर्वी एकूण वार्षिक वेतनाच्या एक बारांश रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात येत असते.त्यानुसार गत वर्षी संस्थान कर्मचा-यांना खालीलप्रमाणे सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

०१. संस्थान आस्थापनेवर मासिक वेतनावर नेमणूक झालेल्या शैक्षणिक विभाग,दोनही (श्री साईनाथ व श्री साईबाबा) रुग्णालयासह सर्व विभागांकडील मासिक वेतनावरील/मानधनावरील सेवकांना दि.०१/१०/२००९ ते दि.३०/०९/२०१० या कालावधीत दिलेल्या एकूण वेतनाचे / मानधनाच्या एक बारांश (एकूण वेतन ÷ १२)

०२. कार्यकारी संपादक,व सह.कार्यकारी संपादक "साईलिला" (मराठी,इंग्रजी व हिंदी), यांना दि.०१/१०/२००९ ते दि.३०/०९/२०१० या कालावधीत दिलेले मानधन ÷ १२.

०३. संस्थान आस्थापनेवर दि.०१/१०/२००९ नंतर मासिक वेतनावर/ मानधनावर नेमणूक झालेल्या सेवकांना दि. ३०/०९/२०१० अखेरच्या कालावधीत दिलेल्या एकूण वेतनाच्या/मानधनाच्या एक बारांश.

०४. दि.३०/०९/२०१० पूर्वी संस्थान सेवेतून निवृत्त झालेले,राजीनामा देवून नोकरी सोडून गेलेल्या सेवकांना दि.०१/१०/२००९ अगर त्यानंतर प्रत्यक्ष नोकरीत असलेल्या तारखेपासून ते कामावर असलेल्या कालावधीत दिलेल्या वेतनाच्या एक बारांश (एकूण वेतन ÷ १२ या प्रमाणात येणारी रक्कम)

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



०५. प्रतिनियुक्तीने तात्पुरत्या कालावधीसाठी संस्थानकडे नेमणूका झालेले शासनाकडील अधिकारी यांना उपरोक्त कालावधीत देण्यात आलेल्या एकूण वेतनाच्या एक बारांश रक्कम.

०६. दि.०१/१०/२००९ ते दि.३०/०९/२०१० या कालावधी मध्ये कंत्राटी पध्दतीने मासिक एकत्रित मानधनावर सेवेत असलेले कनिष्ठ-अभियंते-०७, मदतनीस-०१, ग्रंथालय सहाय्यक -०१, सहाय्यक आचारी-०१, यांना उपरोक्त कालावधीत देण्यात आलेल्या एकूण फिक्स-पे/मानधनाच्या एक बारांश (एकूण फिक्स-पे/मानधन ÷ १२ )

०७. दि.०१/१०/२००९ ते दि.३०/०९/२०१० या कालावधीत ज्या कर्मचाऱ्यांस गैरवर्तणाचा ठपका ठेवून अथवा ज्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करुन सेवेतून कमी केलेले आहे. अशा कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देय होणार नाही.

उपरोक्त प्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०/१०/२०१० रोजीच्या सभेतील निर्णय क्र.८२९ नुसार संस्थान कर्मचाऱ्यांना रक्कम रु.०२,८२,६९,०९३ (रु. दोन कोटी ब्याऐंशी लाख एकोणसत्तर हजार त्र्याण्णव) मात्र इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून आदा करण्यात आलेली आहे.

तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिरडीकडे कंत्राटी पध्दतीने मासिक एकत्रित मानधनावर काम करीत असलेल्या सल्लागार-०१, सर्व्हेअर-०१, विशेष कार्य अधिकारी ०१,यांना दि.०१/१०/२००९ ते दि. ३०/०९/२०१० या कालावधी मध्ये मिळालेल्या एकूण मानधनाच्या १/१२ एवढी रक्कम अग्रीम म्हणून देण्यात आली होती. सदरची रक्कम त्यांचे मासिक मानधनातून वसूल करण्यात आलेली आहे.

तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीकडे ठेकेदारामार्फत २००८ ते २००९ अथवा त्यापूर्वीपासून व सध्याही कामावर असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना दि.०१/१०/२००९ ते ३०/०९/२०१० या कालावधी मध्ये मिळालेल्या एकूण वेतनाच्या १/१२ एवढी रक्कम अग्रीम म्हणून देण्यात येऊन सदरची रक्कम त्यांचे वेतनबीलातून तीन समान हप्त्यात वसुल करण्यात आलेली आहे. मात्र सदरची अग्रीम रक्कम सन-२००९ -२०१० या अर्थिक वर्षात किमान १५० दिवस कामावर हजर असणा-या कंत्राटी कर्मचा-यांनाच देण्यात आली होती.

**<u>आता या वर्षीही संस्थान कर्मचाऱ्यांना मागील प्रमाणेच खालील प्रमाणे सानुग्रह अनुदान देता येईल.</u>**

०१. संस्थान आस्थापनेवर मासिक वेतनावर नेमणूक झालेल्या शैक्षणिक विभाग,दोनही (श्री साईनाथ व श्री साईबाबा) रुग्णालयासह सर्व विभागांकडील मासिक वेतनावरील/मानधनावरील सेवकांना दि.०१/१०/२०१० ते दि.३०/०९/२०११ या कालावधीत दिलेल्या १२ महिण्याचे एकूण वेतनाचे / मानधनाच्या एक बारांश (एकूण वेतन ÷ १२).

०२. मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१७/०५/२००९ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार ०६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी दि.०१/०१/२००६ पासून लागू करण्यात आल्या व त्यानुसार जून २००९ पासून वेतन देण्यात आले. व मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१० रोजीच्या सभेतील निर्णयानुसार माहे जानेवारी २००६ ते माहे मे २००९ या कालावधीची सुधारित पे बँड नुसार फरकाची रक्कम सन-२०१०-२०११ या वर्षात देण्यात आल्याने सदर फरक वेतनाच्या एकूण रक्कमेच्या एक बारांश (एकूण वेतन ÷ १२).

०३. कार्यकारी संपादक,व सह.कार्यकारी संपादक " साईलिला " (मराठी,इंग्रजी व हिंदी),यांना दि.०१/१०/२०१० ते दि.३०/०९/२०११ या कालावधीत दिलेले मानधन ÷ १२.

०४. संस्थान आस्थापनेवर दि.०१/१०/२०१० नंतर मासिक वेतनावर/ मानधनावर नेमणूक झालेल्या सेवकांना दि. ३०/०९/२०११ अखेरच्या कालावधीत दिलेल्या एकूण वेतनाच्या/मानधनाच्या एक बारांश.

०५. दि.३०/०९/२०११ पूर्वी संस्थान सेवेतून निवृत्त झालेले,राजीनामा देवून नोकरी सोडून गेलेल्या सेवकांना दि.०१/१०/२०१० अगर त्यानंतर प्रत्यक्ष नोकरीत असलेल्या तारखेपासून ते कामावर असलेल्या कालावधीत दिलेल्या वेतनाच्या एक बारांश (एकूण वेतन ÷ १२ या प्रमाणात येणारी रक्कम)

०६. प्रतिनियुक्तीने तात्पुरत्या कालावधीसाठी संस्थानकडे नेमणूका झालेले शासनाकडील अधिकारी यांना उपरोक्त कालावधीत देण्यात आलेल्या एकूण वेतनाच्या एक बारांश रक्कम.

०७. दि.०१/१०/२०१० ते दि.३०/०९/२०११ या कालावधी मध्ये कंत्राटी पध्दतीने मासिक एकत्रित मानधनावर सेवेत असलेले कनिष्ठ-अभियंते-०७, मदतनीस-०१, ग्रंथालय सहाय्यक -०१ यांना उपरोक्त कालावधीत देण्यात आलेल्या एकूण फिक्स-पे/मानधनाच्या एक बारांश (एकूण फिक्स-पे/मानधन ÷ १२ )

०८. दि.०१/१०/२०१० ते दि.३०/०९/२०११ या कालावधीत ज्या कर्मचाऱ्यांस गैरवर्तणाचा ठपका ठेवून अथवा ज्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करुन सेवेतून कमी केलेले आहे.अशा कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देय होणार नाही.

अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना,शिरडी यांनी त्यांचे दि.१३/०९/२०११ रोजीचे पत्राने संस्थान कर्मचाऱ्यांना दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत विनंती केली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



आता, दि.२७/०२/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.१३७ व दि.२६/०३/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.२११ नुसार कंत्राटदारामार्फत घेण्यात येणारे अकुशल, कुशल कंत्राटी कामगार तसेच कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणारे माजी सैनिक सुरक्षा रक्षक कर्मचारी यांचेसह इतर सर्व सुरक्षा कामगार या सर्वांना माहे ऑक्टोबर ते सप्टेंबर या एक वर्ष कालावधीत मिळणाऱ्या वेतनाच्या रक्कमेवर ८.३३% याप्रमाणे सानुग्रह अनुदान दिपावली सनाचे अगोदर आदा करणेकामी रक्कम देण्यात यावी असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयानुसार सन २०१०-२०११ या वर्षी कंत्राटी पध्दतीने कामास असलेले सर्व्हेअर, विशेष कार्य अधिकारी, सल्लागार इत्यादीसह सर्व कंत्राटी कामगार यां सर्वांना सानुग्रह अनुदान द्यावे लागेल.

वर नमूद केलेप्रमाणे माहे ऑक्टोबर २०१० ते सप्टेंबर २०११ या कालावधीसाठी संस्थान कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यासाठी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षीत आहे.

| | |
|---|---|
| अ) (०१) संस्थान आस्थापनेवर मासिक वेतनावर नेमणूक झालेल्या शैक्षणिक विभाग, दोनही (श्री साईनाथ व श्री साईबाबा) रुग्णालयासह सर्व विभागांकडील मासिक वेतनावरील/नियत वेतनावरील /मानधना वरील सेवकांना दि.०१/१०/२०१० ते दि.३०/०९/२०११ या कालावधीत दिलेल्या १२ महिण्याचे एकूण वेतनाचे (मूळवेतन +ग्रेडवेतन + महागाई भत्ता) / नियतवेतनाचे/मानधनाच्या एक बारांश (एकूण वेतन ÷ १२) रु.३,३६,९१,५२४/-<br>(०२) सहाव्या वेतनआयोगानुसार माहे जाने-२००६ ते माहे मे २००९ या कालावधीची सुधारित पे बॅड नुसार वेतनाच्या (मूळवेतन +ग्रेडवेतन + महागाई भत्ता) फरकाची सन-२०१०-२०११ या अर्थिक वर्षात आदा केलेली एकूण रक्कम ÷ १२ रु. ७५,६६,११९/- | रु.३,३६,९१,५२४/-<br>रु. ७५,६६,११९/- |
| ब) सन-२०१०-११ या वर्षात सर्व कंत्राटी कर्मचा-यांना दिलेले वेतन ÷१२. | रु. ८८,००,०००/- |
| क) सानुग्रह अनुदान वाटपाची अंदाजे एकूण रक्कम | रु. ५,००,५७,६४३/- |

तरी संस्थान कर्मचाऱ्यांना उपरोक्तप्रमाणे सानुग्रह अनुदान आदा करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान आस्थापनेवरील सर्व विभागांकडे मासिक वेतन/ नियतवेतन/ मानधनावर सेवेत असलेले अधिकारी/कर्मचारी, प्रतिनियुक्तीने तात्पूरत्या कालावधीसाठी संस्थानकडे नेमणूका झालेले शासकीय अधिकारी तसेच संस्थानकडून मासिक एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने नेमणूका देण्यात आलेले विशेष कार्य अधिकारी, कनिष्ठ अभियंते, सल्लागार, मोजणीदार, ग्रंथालय सहाय्यक,कार्यालय प्रमुख,कार्यालय सहाय्यक, वाहनचालक, मदतनीस या सर्व सेवकांना दि. ०१.१०.२०१० ते ३०.०९.२०११ या कालावधीसाठी एक महीन्याचे पगाराइतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात यावे यावी असे ठरले.**

**दिनांक ०१.१०.२०१० ते दि. ३०.०९.२०११ या कालावधीत नव्याने नोकरीत रुजू झालेले तसेच संस्थान सेवेतून निवृत्त झालेले अथवा राजीनामा देऊन नोकरी सोडून गेलेले कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात यावे.**

**दिनांक ०१.१०.२०१० ते दिनांक ३०.०९.२०११ या कालावधीत ज्या कर्मचाऱ्यावर गैरवर्तनाचा ठपका ठेवून अथवा ज्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करुन सेवेतून कमी केलेले आहे अशा कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येऊ नये.**

**तसेच संस्थानला कंत्राटी पध्दतीने कामगार पुरवणेसाठी नेमलेल्या लेबर व सुरक्षा कंत्राटदारामार्फत दिनांक ०१.१०.२०१० ते दिनांक ३०.०९.२०११ या कालावधीत कामास असलेल्या व सध्याही कामास असलेल्या सर्व कंत्राटी कुशल, अकुशल तसेच माजी सैनिक सुरक्षा रक्षकासह इतर सुरक्षा कर्मचारी यांना दिलेल्या एकूण वेतनाचे ८.३३ टक्के एवढी रक्कम कंत्राटदार यांचेमार्फत दिपावलीपूर्वी सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/कामगार अधिकारी )

---

**विषय नं.६९** **श्री साईबाबा हॉस्पिटलकडील पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करणे बाबत**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/०८/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६६२ नुसार श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये आवश्यक असणारे खालील पॅरामेडीकलचे पदांवर संबंधीत कर्मचाऱ्यांच्या वेतनबॅन्ड देऊन एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी तात्पुरत्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं | नाव व हुद्दा | वेतनबॅन्ड | हजर तारीख | एक वर्ष पूर्ण होत असलेची तारीख | तात्पुरते नेमणूकीचे कालावधीत | परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात येत | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | घेतलेल्या रजा | असलेची तारीख | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | **श्री दिलीप धोंडीबा शिंदे** बायोकेमिस्ट | पे बॅन्ड ९३००-३४८००, बेसीक पे १०९००+ग्रेड पे ४४०० | ०१/०९/२०१० | ३१/०८/२०११ | १५ | १५/०९/२०११ | सदर एक वर्षाचे कालावधीत त्यांचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकुमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावीतही नाहीत. त्यांची संस्थान सेवा पुढे चालू ठेवणेस हरकत नाही. |
| २ | **श्रीमती कल्पना दिनेश पुलाटे** (श्रीमती ललगे कमल जनार्दन) हिस्टोपॅथ तंत्रज्ञ | पे बॅन्ड ९३००-३४८००, बेसीक पे ९३००+ग्रेड पे ४२०० | २०/०८/२०१० | १९/०८/२०११ | २२ | १०/०९/२०११ | सदर एक वर्षाचे कालावधीत त्यांचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच त्या हुकुमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावीतही नाहीत. त्यांची संस्थान सेवा पुढे चालू ठेवणेस हरकत नाही. |
| ३ | **थेटे रविंद्र पांडुरंग** वरिष्ठ कॅथलॅब टेक्निशियन | पे बॅन्ड ९३००-३४८००, बेसीक पे ९३००+ग्रेड पे ४२०० | २३/०८/२०१० | २२/०८/२०११ | २५ | १६/०९/२०११ | सदर एक वर्षाचे कालावधीत त्यांचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकुमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावीतही नाहीत. त्यांची संस्थान सेवा पुढे चालू ठेवणेस हरकत नाही. |
| ४ | **कु. जयश्री साहेबराव ससे** समाजसेवक / सोशल वर्कर | पे बॅन्ड ९३००-३४८००, बेसीक पे ९३००+ग्रेड पे ४२०० | २४/०८/२०१० | २३/०८/२०११ | २७ | १९/०९/२०११ | सदर एक वर्षाचे कालावधीत त्यांचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच त्या हुकुमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावीतही नाहीत. त्यांची संस्थान सेवा पुढे चालू ठेवणेस हरकत नाही. |
| ५ | **कु. सोनल भिमराज नागपूरे,** समाजसेवक / सोशल वर्कर | पे बॅन्ड ९३००-३४८००, बेसीक पे ९३००+ग्रेड पे ४२०० | २६/०८/२०१० | २५/०८/२०११ | ११ | ०५/०९/२०११ | सदर एक वर्षाचे कालावधीत त्यांचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच त्या हुकुमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावीतही नाहीत. त्यांची संस्थान सेवा पुढे चालू ठेवणेस हरकत नाही. |
| ६ | **श्री. महेश रावसाहेब कसार** एस टी /एच | पे बॅन्ड ९३००-३४८००, बेसीक पे | ३०/०८/२०१० | २९/०८/२०११ | १३ | ११/०९/२०११ | सदर एक वर्षाचे कालावधीत त्यांचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकुमाप्रमाणे |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ए फॉर बायोमेडीकल वेस्ट मॅनेजमेंट | ९३००+ग्रेड पे ४२०० | | | | | व योग्य रितीने काम करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावीतही नाहीत. त्यांची संस्थान सेवा पुढे चालू ठेवणेस हरकत नाही. |

उपरोक्त कर्मचाऱ्यांचा एक वर्ष परिविक्षाधीन कालावधी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या स्तंभ क्र. ७ मधील दिनांकास पूर्ण होत आहे. सदर कर्मचाऱ्यांची सेवा पुढे चालू ठेवणेबाबत वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी स्तंभ क्र. ८ नुसार अभिप्राय दिलेला आहे.

तरी, उपरोक्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या स्तंभ क्र. ७ चे लगतचे तारखेपासून संस्थान सेवेत कायम करणेबाबतचे निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.७४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलकडील पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत अभ्यास करुन फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे मान्यतेसाठी सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/वैद्यकीय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ साईआश्रम प्रकल्पातील खोल्या/ हॉलसाठी एम.एस. (सीआरसीए) बेडस् तयार करणेकामी वापरावयाचे स्ट्रक्चरल स्टिल टयुब्जबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयांन्वये, साई आश्रम प्रकल्पातील खोल्या / हॉलमधून भक्तांसाठी उपलब्ध करुन द्यावयाचे एम.एस. (सीआरसीए) फ्रेम स्ट्रक्चरसह प्लायवुडचे ५५६८ नग सिंगल बेडस् (कॉटस्) साठी विहित पध्दतीने वृत्तपत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागविणेत आल्या होत्या. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ जुलै, २०११ रोजीचे सभेत, याकामी प्राप्त झालेल्या ०४ निविदा उघडून, इच्छुक निविदासादरकर्त्या संस्थेच्या प्रतिनिधींशी चर्चा-वाटाघाटी करुन, मे. स्पेसवुड फर्निशर्स प्रा.लि., नागपूर यांची रुपये ४,०००/- मात्र (अक्षरी रुपये चार हजार मात्र) प्रती नग (कॉट) या निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत आली. त्यानुसार, मे. स्पेसवुड फर्निशर्स प्रा.लि., नागपूर यांना दिनांक ०९ ऑगष्ट, २०११ रोजी कार्यादेश देणेत आला असून, निविदा अटी शर्तीनुसार दिनांक २२ ऑगष्ट, २०११ याकामी करारनामाही करणेत आलेला असून, संबंधित संस्थेने प्राथमिक कामास सुरुवात केलेली आहे.

**(ब)** उपरोक्त सीआरसीए बेडस् बनविणेकामी वापरावयाच्या साहित्याबाबत, निविदेत List of Approved Makes मध्ये, बेडस्चे सीआरसीए फ्रेमसाठी TATA व SAIL या कंपन्यांचे स्ट्रक्चरल स्टिल वापरणेबाबत नमुद करणेत आलेले आहे. त्यानुसार पुरवठादार मे. स्पेसवुड, नागपूर यांनी संबंधित कंपन्यांकडे स्ट्रक्चरल स्टिल टयुब्जचे उपलब्धतेबाबत चौकशी केली असतां, सदर दोन्ही कंपन्या सीआरसीए स्ट्रक्चरल स्टिल टयुब्ज उत्पादीत करीत नसल्याचे लक्षात आले.

त्यामुळे पुरवठादार मे. स्पेसवुड, नागपूर यांनी दिनांक ०३ सप्टेंबर, २०११ रोजी मे. मित्तल प्रेसिजन स्टिल टयुब्ज् प्रा. लि., चाकण (पुणे) या ISO प्राप्त कंपनीचा सीआरसीए स्ट्रक्चरल टयुब्जचा नमुना व त्यासोबत कंपनीचा दिनांक ३१ ऑगष्ट, २०११ रोजीचा गुणवत्ता चाचणी अहवाल पाठविला व त्यानुसार विषयांकित बेडस्चे फ्रेमसाठी मित्तल प्रेसिजन कंपनीचे स्ट्रक्चरल टयुब्ज वापरणेत यावे किंवा कसे याबाबत विचारणा केली आहे.

तसेच पुरवठादार मे.स्पेसवुड, नागपुर यांनी त्यांचेकडील ई-मेल दिनांक २९ ऑगष्ट, २०११ व दिनांक १० सप्टेंबर, २०११ रोजीचे पत्रासोबत, निविदेत नमुद केलेल्या TATA ही कंपनी सीआरसीए स्ट्रक्चरल स्टिल टयुब्ज उत्पादीत करीत नसलेबाबत TATA कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. एच.राजेश ॲण्ड कंपनी, मुंबई / पुणे यांचे पत्र जोडले आहे.

पुरवठादार मे. स्पेसवुड यांनी कळविलेल्या उपरोक्त बाबीबाबत, संस्थानमार्फत TATA व SAIL या कंपन्यांकडे थेट चौकशी केली असतां, TATA कंपनीचे श्री.पुनीत रॉय, मॅनेजर, सेल्स यांनी दिनांक १६ सप्टेंबर, २०११ रोजीचे ई-मेल पत्राव्दारे, ते फक्त Hot Rolled Coils उत्पादीत करतात, असे कळविले आहे, तर SAIL या कंपनीचे श्री. एस.एस.बाजीराव, मॅनेजर, मार्केटिंग यांनी दिनांक १९ सप्टेंबर, २०११ रोजीचे ई-मेल पत्राव्दारे, ते फक्त ERW पाईप (८ इंच ते १८ इंच) व SW पाईप (१८ इंच ते ६४ इंच) या प्रकारचे मोठया आकारातील पाईप्स उत्पादीत करतात, असे कळविले.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**(क)** उपरोक्त **परिच्छेद ब** मध्ये नमुद केलेनुसार, विषयांकित बेडस्‌चे स्ट्रक्चरल फ्रेमसाठी वापरावयाचे CRCA स्ट्रक्चरल स्टिल टयुब्जचे उत्पादन निविदेत नमुद केलेल्या TATA व SAIL या कंपन्या करीत नसल्याने, पुरवठादार मे. स्पेसवुड, नागपूर यांनी सुचविलेल्या MITTAL या कंपनीबाबत संकेतस्थळावरुन माहिती घेतली असतां, MITTAL ही कंपनी ISO प्रमाणित कंपनी असून, सदर कंपनीमार्फत उत्पादीत करण्यात येणारे स्टील हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे असून ते स्वतः चाकण, पुणे येथे स्टील साहित्याचे उत्पादन करतात.

तसेच, साईआश्रम प्रकल्पाचे स्ट्रक्चरल कन्सल्टंट श्री. आर. आर. कुलकर्णी, पुणे यांचेकडेस विषयांकित बेडस्‌चे स्ट्रक्चरल फ्रेमसाठी पुरवठादार मे. स्पेसवुड, नागपुर यांनी सुचविलेल्या MITTAL या कंपनीचे CRCA स्ट्रक्चरल स्टिल टयुब्ज वापरणे उचित राहिल किंवा कसे याबाबत विचारणा करणेत आली होती. त्यास अनुसरुन, दिनांक २२ सप्टेंबर, २०११ रोजीचे ई-मेल व्दारे, श्री.कुलकर्णी यांनी विषयांकित बेडस्‌चे स्ट्रक्चरल फ्रेमसाठी MITTAL या कंपनीचे CRCA स्ट्रक्चरल स्टिल टयुब्ज TATA व SAIL या कंपनीचे समकक्ष असून, त्या वापरणेस हरकत नाही असे कळविले आहे.

या सर्व बाबींचा विचार करुन, पुरवठादार मे. स्पेसवुड, नागपुर यांनी सादर केलेला मे. मित्तल प्रेसिजन स्टिल टयुब्ज प्रा.लि., पुणे (MITTAL) या नमुना हा गुणवत्तेनुसार उचित असल्याने, विषयांकित बेडस्‌चे स्ट्रक्चरल फ्रेमसाठी MITTAL या कंपनीचे CRCA स्ट्रक्चरल स्टिल टयुब्ज वापरणेबाबत पुरवठादार मे. स्पेसवुड फर्निशर्स प्रा. लि., नागपुर यांना परवानगी देणेकामी मान्यतेस्तव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम प्रकल्पातील खोल्या/ हॉलसाठी एम.एस. (सीआरसीए) बेडस् तयार करणेकामी वापरावयाचे स्ट्रक्चरल स्टिल टयुब्जबाबत पुरवठादार मे. स्पेसवुड, नागपुर यांनी सादर केलेला मे. मित्तल प्रेसिजन स्टिल टयुब्ज प्रा.लि., पुणे (MITTAL) याचा नमुना हा TATA व SAIL यांचे समकक्ष असल्याने व गुणवत्तेनुसार उचित असल्याने, विषयांकित बेडस्‌चे स्ट्रक्चरल फ्रेमसाठी MITTAL या कंपनीचे CRCA स्ट्रक्चरल स्टिल टयुब्ज वापरणेबाबत पुरवठादार मे. स्पेसवुड फर्निशर्स प्रा. लि., नागपुर यांना परवानगी देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **श्री साई मंडळी ट्रस्ट, मल्लेश्वरम्, बंगलोर यांनी संस्थानचे माहितीकेंद्र सुरु करणेसाठी देऊ केलेली जागा भाडेपट्टयाने स्वीकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. विश्वस्त, श्री साई मंडळी ट्रस्ट, मल्लेश्वरम, बंगलोर यांनी त्यांचेकडील दिनांक १३ एप्रिल, २००९ रोजीचे विनंती पत्रानुसार, त्यांचे ट्रस्टकडे संस्थान उपक्रमांची माहिती देणेकामी, सुरु करावयाचे संस्थान माहिती केंद्र कार्यालयासाठी पुरेशी जागा उपलब्ध आहे. ट्रस्टव्दारे सदरहू जागा संस्थानला कार्यालय सुरु करणेसाठी विनामुल्य उपलब्ध करुन देणेस तयार आहोत. तरी कृपया समक्ष भेट देऊन, सदरहू ठिकाणी संस्थानचे उपक्रम उपलब्ध करुन देणेसाठी नियोजन करावे, असे कळविले होते.

सदरहू प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २१ जून, २००९ रोजीचे सभेत चर्चा होऊन, निर्णय क्रमांक ५३३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला होता :

.. .. श्री साई मंडळी ट्रस्ट, मल्लेश्वरम, बंगलोर यांनी देऊ केलेल्या जागेची पहाणी करुन ती योग्य असल्यास घेण्यात यावी. याबाबत कायदेशिर कररनाम्याचा मसुदा संस्थानचे वकीलाकडून करुन घेण्यात यावा. त्याप्रमाणे करारनामा व त्याअनुषंगाने येणारा खर्च करणेस मान्यता देण्यात आली.

**(ब)** तद्‌नंतर, सदरहू जागा उपलब्ध करुन देणेबाबत श्री साई मंडळी ट्रस्ट यांचेकडून दिनांक १५ जुलै, २०११ रोजी करारनाम्याचा जो मसुदा प्राप्त झाला, त्यामध्ये त्यांनी देऊ केलेली बांधीव जागा ही भाडेपट्टयाने उपलब्ध करुन देणेत येईल असे नमूद केलेले होते. सदर बाबीबाबत व तसेच करारनाम्यात असलेल्या त्रुटींबाबत इकडील विभागामार्फत दिनांक १८ जुलै, २०११ रोजी टिपणी सादर करणेत येऊन, श्री साई मंडळी ट्रस्ट, मल्लेश्वरम्, बंगलोर यांना त्यांनी सादर केलेल्या करारनाम्यातील त्रुटींसह जागेच्या भाडेपट्टयाबाबत त्यांचे ट्रस्टचे विश्वस्त मंडळाची मान्यता घेऊन उचित कार्यवाही करणेस कळविणेत आले होते.

त्यानुसार, मा. अध्यक्ष, श्री साई मंडळी ट्रस्ट, बंगलोर यांनी दिनांक १० सप्टेंबर, २०११ रोजीचे सुधारीत प्रस्तावाने, करारनाम्याचे मसुद्याबरोबर जोडलेल्या नकाशानुसार, त्यांचे ट्रस्टचे मालकीचे इमारतीतील, तळमजल्यावरील हॉलमध्ये ॲल्युमिनियम पार्टिशन करुन अंदाजे ४०० चौरस फुट जागा दरमहा रुपये १०१/- मात्र भाडेपट्टा आकारुन, १० वर्षे मुदतीसाठी संस्थानचे प्रस्तावित माहिती केंद्रास

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



जागा उपलब्ध करुन देणेस तयार आहोत. तसेच संस्थानचे मा.अध्यक्ष व मा. विश्वस्तांचे सुचनेनुसार, माहिती केंद्राचे इंटेरिअर पार्टिशनचे काम सुरु केले असून, ते दिनांक १५ सप्टेंबर, २०११ पर्यन्त पूर्ण होईल आणि जागेचा भाडेपट्टा नोंदविणेकामी ट्रस्टचे अध्यक्ष मंगला रामचंद्रा यांना प्राधिकृत करणेत आलेले आहे, असे कळविले आहे.

यापुर्वी संस्थानमार्फत सिकंदराबाद व चेन्नई येथील माहिती केंद्रासाठी घेण्यात आलेल्या जागा या भाडेपट्टा तत्वावर मर्यादित मुदतीचे कालावधी घेणेत आलेल्या आहेत, त्याच धर्तीवर विषयांकित जागा माहिती केंद्रासाठी उपलब्ध करुन घेणे उचित आहे.

**(क)** तरी उपरोक्त विवेचनास अनुसरुन, श्री साई मंडळी ट्रस्ट, मल्लेश्वरम्, बंगलोर यांनी संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेसाठी देऊ केलेली बांधीव जागा रुपये १०१/- मात्र प्रति महिना भाडेपट्टयाने १० वर्षे मुदतीसाठी स्वीकारणेस, त्याकामी यथोचित भाडेपट्टा करारनामा करणेस आणि माहिती केंद्र सुरु करणेसाठी आवश्यक ते फर्निचर, मशिनरी आदि अनुषंगिक साहित्य खरेदी करणेकामी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७४४ यावर सविस्तर चर्चा होऊन श्री साई मंडळी ट्रस्ट, मल्लेश्वरम्, बंगलोर यांनी संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेसाठी देऊ केलेली बांधीव जागा रुपये १०१/- मात्र प्रति महिना भाडेपट्टयाने १० वर्षे मुदतीसाठी स्वीकारणेस, त्याकामी यथोचित भाडेपट्टा करारनामा करणेस आणि माहिती केंद्र सुरु करणेसाठी आवश्यक ते फर्निचर, मशिनरी आदि अनुषंगिक साहित्य खरेदी करणेकामी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ संस्थानकरीता पाणी पुरवठा योजनेचे सर्वेक्षण सुरु करणेकामी आवश्यक निधी मिळणेविषयी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३-०२-२०११ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.४ अन्वये संस्थानला वाढीव पाणी पुरवठा होणेसाठी लोकवर्गणीच्या १० % रक्कम भरुन या योजनेसाठी अनुदान मंजुर करुन घेणेसाठी मा.मंत्री महोदय यांची तारीख घेवून, त्यांचे समवेत मा.विश्वस्तांच्या समितीने बैठक लावून चर्चा करावी व अनुदान मंजुर करुन घेणेसाठी प्रयत्न करावे. तसेच यापुर्वी संस्थानकरीता थेट दारणा व निळवंडे धरणातून पाणी आणणेकामी सर्व्हे करण्यात आलेला आहे. त्याचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीस सादर करावा असे ठरले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार सन्मा.नामदार प्रा.लक्ष्मणराव ढोबळे, मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांना मा.अध्यक्ष यांनी दि.०१-०३-२०११ चे पत्राव्दारे विनंती वजा प्रस्ताव सादर केला आहे. तद्नंतर दिनांक १२-०६-२०११ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३४१ अन्वये संस्थानसह कनकुरी, पिंपळवाडी, निमगांव-को-हाळे या गावांसह वाढीव पाणी पुरवठा योजना लवकरात लवकर कार्यान्वित करणे संदर्भात महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा व त्याची प्रत मा.जिल्हाधिकारी यांना माहितीसाठी देण्यात यावी असे ठरले.

वरीलप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२-०६-२०११ रोजीचे सभेतील निर्णयानुसार मा.कार्यकारी अधिकारी यांनी मा.अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अहमदनगर यांना दि.२९-०८-२०११ रोजीचे पत्राव्दारे उपरोक्त पाणी पुरवठा योजनेसाठी शासनाचे अनुदान मंजुर व्हावे व योजना लवकरात लवकर कार्यान्वित करणे संदर्भात नियोजन होणेबाबत विनंती केली आहे.

मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, संगमनेर यांनी जा.क्रं./तांशा/१७५०/ २०११, दिनांक १७-०९-२०११ चे पत्रान्वये कळविले आहे की, अहमदनगर जिल्हयातील शिर्डी व राहाता मतदार संघातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत सुरु असलेल्या विविध पाणी पुरवठा योजनांची आढावा बैठक मा.मंत्री, कृषी व पणन यांचे अध्यक्षतेखाली दि.८/८/२०११ रोजी मंत्रालयात संपन्न झाली. बैठकीच्या प्राप्त झालेल्या इतिवृत्तानुसार निळवंडे धरण उद्भव घेवून नविन शिर्डी देवस्थान पाणी पुरवठा योजना तयार करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदर योजनेचे सर्वेक्षण व त्यानुसार सविस्तर अंदाजपत्रक व आराखडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत तयार करावयाचे असल्याने त्याकामी २ % Preparation Charges च्या against महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सुरुवातीस कमीत कमी रु.१५.० लक्ष इतका निधी त्वरीत वर्ग करणेत यावा म्हणजे पुढील कार्यवाही करणे शक्य होईल असे कळविले आहे.

यापुर्वी L&T कंपनीमार्फत धरणातून थेट पाणी आणणेसाठी निळवंडे, मुळा व दारणा या धरणांचा तुलनात्मक अभ्यास व सर्वेक्षण करण्यात आले होते. त्यांनी सादर केलेल्या दि.१९-०९-२००६ चे अहवालानुसार निळवंडे धरणातून पाणी आणणेचा मार्ग अवघड व खर्चिक आहे. तसेच त्याचा

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उद्‌भव शाश्वत नाही. त्यामुळे थेट पाईपलाईनव्दारे पाणी आणणेसाठी दारणा धरण योग्य असल्याचे मत त्यांनी दिलेले आहे. दि.२८-०७-२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेत याबाबत निर्णय क्रं.५५६ संमत करण्यात आलेला आहे.

संस्थानचे नविन वाढीव पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणेसाठी आजपावतो झालेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | आराखडे तयार करणा-या संस्थेचे नांव | आर्थिक वर्ष | खर्चाची रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ०१ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण. | २००७-२००८ | ६,५३,१२२.०० |
| ०२ | किर्लोस्कर कन्सल्टंटस् प्रा.लि.पुणे. | २००९-२०१० | ५,००,०००.०० |
| ०३ | इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग प्रा.लि.पुणे. | २०१०-२०११ व २०११-२०१२ | २१,९६,७८९.०० |
| | | **एकुण-** | **३३,४९,९११.००** |

अशा प्रकारे संस्थानचे नविन वाढीव पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणेसाठी आजपावतो वरीलप्रमाणे एकुण रु. ३३,४९,९११/- मात्र इतका खर्च झालेला आहे.

तरी आता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत निळवंडे धरण उद्‌भव घेवून पुन्हा नव्याने सर्वेक्षण, अंदाजपत्रक व आराखडे तयार करणेसाठी त्यांना एकुण अंदाजपत्रकीय रकमेच्या २ % इतके Preparation Charges भरावे लागतील. सर्वेक्षण पुर्ण झाल्यानंतर सविस्तर अंदाजपत्रक व आराखडे त्यांना तयार करता येतील. तथापी निळवंडे धरणापासून पाईपलाईनचे खर्चासह योजनेचा एकुण खर्च रु. १०० कोटीपेक्षा जास्त होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पासाठी शासनाचे अनुदान उपलब्ध झाल्यास त्यामध्ये उपरोक्त Preparation Charges चा समावेश करुन संस्थानतर्फे भरावयाच्या १० % लोकवर्गणीतून सदर खर्च कपात करुन घेता येईल.

तरी सर्वेक्षणाचे खर्चासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना त्यांचे मागणीपैकी सध्या रु. १० लाख मात्र इतकी रक्कम अदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे संस्थानकरीता पाणी पुरवठा योजनेचे सर्वेक्षण सुरु करणेकामी आवश्यक निधी मिळणेविषयी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मागणीनुसार सर्वेक्षण करणेसाठी तूर्त सध्या रु. १० लाख मात्र इतकी रक्कम अदा करण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/ पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **जैव वैद्यकिय घनकचरा व्यवस्थापन व हाताळणीबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलला स्वतंत्रपणे सन २००९-२०१० या वर्षाकरिता जैव वैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन व हाताळणीकरिता ऑथरायझेशन दिलेले आहे. सदरच्या ऑथरायझेशन पत्रात दिलेल्या नियम व अटीतील अट क्र.०६ नुसार-

दोन्ही हॉस्पिटलमध्ये निघणारा जैव वैद्यकीय घनकचरा पुढील कार्यवाहीकरीता सार्वजनिकरीत्या जैव वैद्यकीय घनकचरा विल्हेवाट लावणाऱ्या व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने मान्यता दिलेल्या संस्थेस देणे बंधनकारक आहे.

तसेच प्रदुषण नियंत्रण मंडळाने त्यांचे पत्र क्र. MPCB/SRO/ANR/१६६४, Dt. ०५/०८/२०११ अन्वये असे कळविले आहे की, अहमदनगर जिल्हया करीता मे. बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर हे सार्वजनिकरीत्या जैव वैद्यकीय घनकचरा विल्हेवाट लावणारी अधिकृत संस्था असुन जैव वैद्यकीय घनकचरा पुढील विल्हेवाट लावणेकामी सदर संस्थेस देण्यात यावा. प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षाकरीता ऑथरायझेशन नुतनीकरण करणेकरीता दोन्ही हॉस्पिटलसाठी स्वतंत्रपणे अर्ज सादर करणेत आले आहेत.

श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये निघणारा जैव वैद्यकीय घनकचरा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे आदेशानुसार पुढील विल्हेवाट लावणेकामी मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर यांना सन २०१०-२०११ या कालावधीकरीता देणेबाबत मा. व्य. समितीच्या दि. १०/१०/२०१० चे सभेतील निर्णय क्र. ७८० अन्वये कार्यादेश देण्यात आला होता. सदर कार्यादेशानुसार मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर हे दोन्ही हॉस्पिटलमधील जैव वैद्यकिय घनकचरा पुढील विल्हेवाट लावणेकामी घेउन जात असुन त्याकरीता कंपनीस प्रतीमाह रु. ३५,०००/- इतकी रक्कम अदा करणेत येत आहे.

वरील कार्यादेशाचा कालावधी दि. ३१/०८/२०११ रोजी संपल्यामुळे मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर यांनी पुढील कालावधीत जैव वैद्यकिय घनकचरा पुढील कार्यवाहीकरीता घेउन जाणेकरीता त्यांचे पत्र क्र. AMD/८३३ दि. १५/०९/२०११ अन्वये प्रतिमहीना एकुण रु. ४२,०००/- (अक्षरी रु. बेचाळीस हजार मात्र) इतके रक्कमेचे कोटेशन पाठविले आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नियमानुसार मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर यांना पुढील तीन वर्षाचे कालावधीकरीता श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये निघणारा जैव वैद्यकीय घनकचरा पुढील कार्यवाहीकरीता घेउन जाणेसाठी कार्यादेश देणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नियमानुसार मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर यांना पुढील तीन वर्षाचे कालावधीकरीता श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये निघणारा जैव वैद्यकीय घनकचरा पुढील कार्यवाहीकरीता घेउन जाणेसाठी याकामी येणारे प्रतिमहिना रुपये ४०,०००/- मात्रचे खर्चास तसेच त्यांना कार्यादेश देणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५ श्री उपासनी कन्या कुमारी आश्रमातील कन्या कुमारींस श्री साईबाबा संस्थानच्या हॉस्पिटल्समध्ये मोफत वैद्यकिय सेवा सुविधा मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री उपासनी कन्या कुमारी आश्रम, साकुरी, ता.राहता, जि.अहमदनगर, यांनी दि.९.९.२०११ रोजीच्या मा.अध्यक्ष, श्री ससाणे साो., यांच्या नावे पत्राव्दारे श्री उपासनी कन्या कुमारी आश्रमातील कन्या कुमारींस श्री साईबाबा संस्थानच्या हॉस्पिटल्स्मध्ये मोफत वैद्यकीय सेवा सुविधा मिळणेबाबत श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन मंडळास विनंती केली आहे, पत्रातील मजकुर पुढील प्रमाणे :-

सदगुरु श्री साईबाबांचे प.पू.शिष्य सदगुरु श्री उपासनी महाराजांनी मौजे साकुरी, ता.राहता (तत्कालिन ता.कोपरगाव) येथे सदगुरु श्री साईबाबांच्या प्रेरणार्शिवादाने सन १९१६ मध्ये श्री उपासनी कन्या कुमारी स्थानाची स्थापना केलेली आहे.

सदर आश्रमाच्या स्थापनेपासुन म्हणजे मागील ९५ वर्षांपासुन आजतागायत, बाल ब्रम्हचारी कन्यांना दिक्षा देवुन, आश्रम सेवेत दाखल करून घेतले जाते, अशा कन्यांना (महिलांना शिक्षण घेण्याची सामाजिक परिस्थिती नसताना किंवा परिस्थिती अतिशय प्रतिकुल असतानाच्या काळापासुन) वेदाभ्यास व सर्व प्रकारचे यज्ञयागादी विद्यांचे शिक्षण दिले जाते, महिलांना वेद विद्येचे शिक्षण देवुन, त्यांचेकडुन सर्व धार्मिक विधी करवुन घेणारा, श्री उपासनी कन्या कुमारी आश्रम, हे संपुर्ण भारतातील एकमेव स्थान आहे.

प.पू.सदगुरु श्री उपासनी महाराजांच्या प्रथम शिष्या, प.पू.सती गोदावरी माताजींनी आपल्या गुरुपरंपरंचे कार्य पुढे चालु ठेवुन, संपूर्ण भारतभर यज्ञयागादी विधी केलेले आहेत, एवढेच नव्हे तर परदेशातही आपल्या भारत देशाची यज्ञयागादी विधींची पताका फडकावली.

प.पू.सदगुरु श्री साईबाबा, प.पू.सदगुरु श्री उपासनी महाराज व प.पू.सदगुरु श्री सती गोदावरी माताजी अशी ही सदगरूंची परंपरा या स्थानाला लाभली आहे, तसेच प.पू.सदगुरु श्री साईबाबांचे हयात काळापासून, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, व श्री उपासनी कन्या कुमारी स्थानाचा संबंध अत्यंत जवळचा आहे, इतकेच नव्हे तर, श्री साईबाबांचे सन १९१८ मध्ये महानिर्वाण झाल्यानंतर, सदगुरु श्री उपासनी महाराजांनी, श्री साईबाबांचे तिर्थ क्षेत्र काशी येथे जावुन, पिंडदानादी सर्व धार्मिक केले असून, श्री साईबाबांच्या समाधि स्थानाचे पौराहित्य देखील केलेले, श्री साई चरित्रामध्ये हया सर्व बाबींचा स्पष्ट उल्लेख आहे.

श्री उपासनी महाराज आश्रमांत सध्या एकूण जवळपास ४० ब्रम्हचारिणी कन्या आहेत, शरीर धर्मानुसार त्यांचेही आरोग्य बिघडते, त्यामुळे श्री साईबाबा संस्थान तर्फे श्री साईनाथ हॉस्पिटल (जनरल) व श्री साईबाबा हॉस्पिटल (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) ही हॉस्पिटल्स् कार्यान्वित असुन, आपणांस नम्र विनंती करण्यात येते की, श्री उपासनी महाराज आश्रम, साकुरी, या स्थानातील सर्व ब्रम्हचारिणी कन्यांस, आवश्यकतेनुसार, उपलब्ध सर्व प्रकारच्या (तपासण्या, उपचार व शस्त्रक्रिया इ.) वैद्यकीय सेवा सुविधा मोफत पुरविण्यात याव्यात, तसेच, सदर आश्रमवासी कन्या, आयुष्यभर अत्यंत कडकडीत सोहळे पाळत असल्याने, त्यांस, उपचारार्थ हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करणे गरजेचे असल्यास, अशा कन्या रूग्णांस, स्पेशल/ डिलक्स वॉडमध्ये ॲडमिट करून, मोफत वैद्यकीय सेवा सुविधा मोफत पुरविण्यात याव्यात, या बाबत, श्री उपासनी कन्या कुमारी स्थानातर्फे श्री साईबाबा संस्थानच्या नावे त्या त्या वेळेस लेखी विनंती पत्र देण्यात येईल.

तरी कृपया या संबंधी आपण स्वत: जातीने लक्ष देवून, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन मंडळास, योग्य ती शिफारस करण्यात यावी ही विनंती.

सदर पत्रावर, श्री उपासनी कन्या कुमारी आश्रमाचे व्यवस्थापक, माधवी गुरू गोदावरी व राधा गुरू गोदावरी यांच्या स्वाक्षऱ्या असुन, मा.अध्यक्ष, श्री ससाणे साो., यांनी सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



समितीसभेपुढे मान्यतेस्तव सादर करण्यविषयी मा.कार्यकारी/ उप-अधिकारी सो.यांच्या नावे तसे निर्देशीत केले असल्याने, सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री उपासनी महाराज आश्रम, साकुरी, या स्थानातील सर्व ब्रम्हचारिणी कन्यांस, आवश्यकतेनुसार, उपलब्ध सर्व प्रकारच्या (तपासण्या, उपचार व शस्त्रक्रिया इ.) वैद्यकीय सेवा सुविधा मोफत पुरविण्यात याव्यात, सदर आश्रमवासी कन्या, आयुष्यभर अत्यंत कडकडीत सोहळे पाळत असल्याने, त्याना उपचारार्थ संस्थान हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करणे गरजेचे असल्यास, अशा वेळी त्यांना स्पेशल/ डिलक्स वॉडमध्ये ॲडमिट करून, मोफत वैद्यकीय सेवा सुविधा मोफत पुरविण्यात याव्यात यासाठी त्या-त्या वेळी श्री उपासनी कन्या कुमारी संस्थानतर्फे लेखी पत्र घेण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कृत्रीम सांधारोपन शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयास अनुसरुन मा. अध्यक्ष महोदय, यांनी वैद्यकीय संचालक, यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये भव्य सांधारोपण शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करणेबाबत तोंडी आदेश दिले आहेत.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दोन फुलटाईम ऑर्थोपेडीक सर्जन उपलब्ध असुन त्यांनी अशा प्रकारच्या ३५० हुन अधिक शस्त्रक्रिया यशस्वीरित्या केलेल्या आहेत. अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया सध्या फक्त मोठ्या शहरांमध्येच केल्या जातात, परंतु अशा शस्त्रक्रिया करणे जनसामान्यांच्या आवाक्या बाहेरच्या आहेत, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक यंत्र सामुग्री उपलब्ध असुन येथे तज्ञ डॉक्टर्सही आहेत, तसेच येथे अत्यंत अल्प दरामध्ये विविध आजारांवर शस्त्रक्रिया केल्या जातात, त्यामुळे दिवसेंदिवस हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढतच आहे.

शिबीराचे आयोजनाबाबत येथील ऑर्थोपेडीक सर्जन डॉ. जपे यांचेशी चर्चा केली असता त्यांनी सदरचे शिबीर आयोजित करणे झाल्यास खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित असल्याचे कळविले आहे.

**Estimate of Expenses (Per Patient)-**

| Sr. No | Particular | Charges |
|---|---|---|
| 1. | O.T. Charges | Rs. 7,498/- |
| 2. | Surgeon`s Charges | Rs. 6,480/- |
| 3. | Anesthetist Charges | Rs. 1,872/- |
| 4. | Medicines & Disposables etc. | Rs. 9,150/- |
| 5. | Incidental expenses | Rs. 5,000/- |
| | Total | Rs. 30,000/- |

**Joint Charges (Approximately)**

| Sr. No | Particular | Charges |
|---|---|---|
| 1. | Indian Hip Joint | Rs. 25,000/- |
| 2. | Imported Hip Joint | Rs. 75,000/- |
| 3. | Indian Knee Joint | Rs. 45,000/- |
| 4. | Imported Knee Joint | Rs.80,000/- |

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कृत्रीम सांधा रोपण शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करणे झाल्यास साधारणतः ५० रुग्णांच्या सांध्याकरिता अंदाजे रक्कम रुपये ३० ते ५० लाख मात्रचा खर्च कळविला आहे, तसेच अशा प्रकारच्या साधारणतः ५० रुग्णांवर शस्त्रक्रिया करणे झाल्यास अंदाजे रक्कम रुपये ६० लाख खर्च अपेक्षित असलेबाबतही कळविले आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अत्यल्प दर व विविध सेवा- सुविधा व जीवनदायी सारख्या शासकीय योजना असल्याने येथे दिवसेंदिवस रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ होत आहे. सदरचे शिबीर आयोजित करणे झाल्यास हॉस्पिटलमध्ये जागेचा अभाव असल्याने तपासणी अंती निवड झालेल्या रुग्णांची साधारणतः २ महिन्यांमध्ये टप्प्या- टप्प्यामध्ये शस्त्रक्रिया करता येतील. रुग्णांच्या नांव नोंदणी करिता सोमवारी व बुधवारी डॉ. जपे यांच्या बाह्य रुग्ण तपासणी कक्षामध्ये तपासणी करुन आवश्यक त्या चाचण्या मोफत कराव्या लागतील. अशा प्रकारच्या शस्त्रक्रियाकामी प्रति रुग्णांवर अंदाजे रक्कम रुपये १ ते १.२५ लाख मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच रुग्णाच्या शस्त्रक्रियेपुर्वी व नंतरच्या औषधोपचार खर्चही संस्थानमार्फत मोफत करावा लागणार आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कृत्रीम सांधारोपण शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन तथा शिबरामध्ये सहभागी रुग्णांच्या तपासण्या मोफत करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



रक्कम रुपये ६०,००,०००/- (अक्षरी रुपये साठ लाख) मात्रचे खर्चास चर्चा होऊन निर्णय होणेस्तव, सविनय सादर.

**निर्णय क्र.७४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कृत्रीम सांधारोपण शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन तथा शिबरामध्ये सहभागी रुग्णांच्या तपासण्या मोफत करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये ६०,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. सदरचे खर्चासाठी देणगीदार मिळविण्यात यावेत असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०७** **श्री साई प्रसादालयाकरीता स्टेनलेस स्टील वेल्डींग कामाकरीता ऑरगॉन, कार्बन वेल्डींग सेट व गॅस कटींग सेट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयात प्रसाद भोजन बनविणे, प्रसाद भोजन वाढणे व लाडू सुकविणे याकरीता स्टेनलेस स्टील धातुची भांडी, फुड सर्व्हिस ट्रॉलीज, वॉटर सर्व्हिस ट्रॉलीज, लाडू ट्रे, डायनिंग टेबल, स्टीम कुकर्स व मशिनरीज वापरण्यात येतात. श्री साई प्रसादालय ८ जानेवारी, २००९ पासून नव्याने सुरु केलेनंतर स्टेनलेस स्टीलचे सर्व फर्निचर व इक्युपमेंट नविन खरेदी करण्यात आलेले आहे. सदर स्टेनलेस स्टील धातूचे फर्निचर, मशिनरी व उपकरणे सततच्या वापराने तुटतात. फूड व पाणी सर्व्हिस ट्रॉली लिकेज होणे, व्हिल सपोर्ट ब्रॅकेट तुटणे इ.नादुरुस्तीचे कामे करणेसाठी ऑरगान वेल्डींगची आवश्यकता असते. संस्थानमध्ये स्टेनलेस स्टील वेल्डींग करीता आवश्यक ऑरगॉन व कार्बन वेल्डींगची सुविधा नाही. सदरचे काम श्री साई प्रसादालयाने यापुर्वी मे.स्वराज इंडस्ट्रीज, कोपरगांव यांचेकडून करुन घेतलेले आहे. मे.स्वराज इंडस्ट्रीज, कोपरगांव यांना प्रती ट्रॉली दुरुस्तीकरता रुपये १,५००/- + टॅक्स रक्कम आदा केलेली आहे. परंतू मे.स्वराज इंडस्ट्रीज कंपनी पुणे येथे स्थलांतरीत झालेली असल्यामुळे दुरुस्तीकरीता परिसरामध्ये स्टेनलेस स्टील दुरुस्तीचे काम करणोर वर्कशॉप नसल्याने कामाची गैरसोय होत आहे.

स्टेनलेस स्टील वेल्डींग करीता आवश्यक असणा-या ऑरगान व कार्बन वेल्डींग सेट खरेदी केलेस वेळेवर वेल्डींगचे काम करता येतील व प्रसाद भोजन बनविण्याच्या कामात होणारा विलंब टाळता येईल. आतापर्यंत सदर इक्युपमेंट नविन असल्याने कमी प्रमाणात दुरुस्तीची कामे निघत असत. परंतू यापुढे नेहमीच्या वापराने दुरुस्तीच्या कामात वाढ होणार आहे. प्रसाद भोजन बनविण्याच्या प्रक्रियेमध्ये अडचण येऊ नये याकरीता ऑरगॉन कार्बन वेल्डींग सेट व गॅस कटर सेट खरेदी करणे अत्यावश्यक आहे.

ऑरगॉन कार्बन वेल्डींग सेट व गॅस कटर सेट खरेदी करणेकामी कोटेशन मागवून खरेदी करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ३,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

सदरचे ऑरगॉन कार्बन वेल्डींग सेट व गॅस कटर सेट कोटेशन मागवून खरेदी करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७४९** **श्री साई प्रसादालयाकरीता स्टेनलेस स्टील वेल्डींग कामाकरीता ऑरगॉन, कार्बन वेल्डींग सेट व गॅस कटींग सेट कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ३,००,०००/- खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक,प्रसादालय विभागप्रमुख/ विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **साईआश्रम भाग- ०१ व भाग- ०२ या प्रकल्पाकडील विद्युत विभागामार्फत चालू असलेल्या कामांना मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून लवकरच पूर्ण होणार आहे. याठिकाणी विद्युत विभागामार्फत (०१). मे. जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., जळगांव यांचे सोलर वॉटर हिटींग सिस्टिम यंत्रणा बसविणेचे (०२). मे.जॉनसन लिफ्टस् प्रा.लि., पुणे. यांचे लिफ्ट इन्स्टॉलेशनचे तसेच (०३). मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांचे जनरेटरसेट व सबस्टेशन इरेक्शनचे काम चालू आहे.

०१) साईआश्रमकडे भक्तांना गरम पाणी उपलब्ध व्हावे म्हणून मे. जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., जळगांव यांचेमार्फत सोलर वॉटर हिटींग सिस्टिम यंत्रणा बसविण्यात येत असून सदरच्या कामाची रक्कम रुपये ५,११,००,०००/- इतकी आहे. साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ कडील एकुण २० इमारतींपैकी १३ इमारतींवर सोलर वॉटर हिटींग सिस्टिम यंत्रणा उभारणीचे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरीत ०७ इमारतींचे टेरेसचे काम अपूर्ण असल्याने याठिकाणी यंत्रणा उभारता आलेली नाही. याठिकाणचे टेरेसचे काम पूर्ण झाल्यानंतरच सोलर वॉटर हिटींग सिस्टिम यंत्रणा उभारता येणार

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



असल्याने मे. जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., जळगांव यांचे दिलेल्या मुदतीत सदरचे काम पूर्ण होत नसल्याने मे. जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., जळगांव यांना दिनांक ३०-११-२०११ पर्यंत कामाची मुदतवाढ मिळणेची विनंती आहे.

०२) साईआश्रमकडे मे.जॉनसन लिफ्टस् प्रा.लि., पुणे. यांना लिफ्ट इन्स्टॉलेशनचे रुपये २,६०,००,०००/- इतक्या रकमेचे काम देण्यात आलेले आहे. साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ कडील एकुण २० इमारतींपैकी ०७ इमारतींमध्ये लिफ्ट इन्स्टॉलेशनचे काम पूर्ण झालेले असून ११ इमारतींमध्ये लिफ्ट इन्स्टॉलेशनचे काम सुरु आहे. उर्वरीत ०२ इमारतींमध्ये लिफ्ट डक्टचे सिव्हिलचे काम अपुर्ण असल्याने लिफ्ट इन्स्टॉलेशनचे काम सुरु करता आलेले नाही. सिव्हीलचे काम पुर्ण झाल्यानंतरच लिफ्ट बसविण्याचे काम करता येणार आहे. त्यामुळे सदरचे काम दिलेल्या मुदतीत पूर्ण होत नसल्याने मे.जॉनसन लिफ्टस् प्रा.लि., पुणे. यांना दिनांक ३०-११-२०११ पर्यंत मुदतवाढ मिळण्याची विनंती आहे.

०३) साईआश्रमकडील जनरेटरसेट व सबस्टेशनचे काम मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांना रुपये २,२६,०४,१३९/- इतक्या रकमेस तसेच एच.टी.अंडरग्राऊंड केबलींगचे काम रुपये ३६,९५४८६/- इतक्या रकमेस देण्यात आलेले असून काम पूर्णत्वाकडे आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांचे मीटर टेस्टींग तसेच जनसेट इन्स्पेक्शनचे (नो-ऑबजेक्शन सर्टीफिकेट फॉर कमिशनिंग) काम बाकी आहे. तसेच एच.टी.लाईन शिफ्टींगचे काम महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या लोड शिर्डींगनुसार तसेच लाईन बंद राहण्याच्या काळात करावयाचे असल्याने मे.आदिती इलेक्ट्रीकल, नाशिक यांना दिनांक ३०-११-२०११ पर्यंत मुदतवाढ मिळण्याची विनंती आहे.

उपरोक्तप्रमाणे साईआश्रमकडे काम करणारे (०१). मे. जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., जळगांव (०२). मे.जॉनसन लिफ्टस् प्रा.लि., पुणे. (०३). मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांना मुदतवाढ मिळणेकामी प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग- ०१ व भाग- ०२ या प्रकल्पाकडे मे. जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., जळगांव, मे.जॉनसन लिफ्टस् प्रा.लि., पुणे, मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांचेमार्फत चालू असलेली कामे पुर्ण करण्यास त्यांना दिनांक ३०-११-२०११ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९** **श्री साई प्रसादालयातील सोलर स्टीम यंत्रणेकरीता कार्बन क्रेडीटसाठी एजन्सीची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयात साईभक्तांचे भोजन तयार करण्यासाठी सोलर स्टीम सिस्टिम यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. ही यंत्रणा १.३३ कोटीची असून यात ५८.४० लाख सबसिडी केंद्र सरकारकडून मिळाली आहे.

या यंत्रणेत १६ स्क्वेअर मीटर क्षेत्रफळाच्या एकुण ७३ डिश बसविण्यात आलेल्या आहे. या यंत्रणेव्दारे दर दिवशी २६३ किलो एल.पी.जी.गॅसची बचत होत असून वर्षाला साधारणतः २९.६६ लाख इतकी बचत होत आहे.

ही यंत्रणा चालू झाल्यानंतर कार्बन क्रेडीटसाठी ही यंत्रणा बसविणारे मे.गाढिया यांना कळविण्यात आले होते. पण त्यांनी यास प्रतिसाद दिलेला नाही

तरी सोलर स्टीम यंत्रणेसाठी कार्बन क्रेडीट मिळविणेकरीता एखादी संस्था नेमणे गरजेचे आहे. संस्थानच्या पवनचक्कीला मे.मिटकॉन, पुणे यांचेमार्फत कार्बन क्रेडीट मिळत आहे. त्यांना सोलर स्टीम यंत्रणेच्या कार्बन क्रेडीट संबंधी चर्चेसाठी मा.व्यवस्थापन समितीसमोर उपस्थित राहण्यासाठी बोलविलेले आहे.

तरी मे.मिटकॉन, पुणे यांचेशी सोलर स्टीम यंत्रणेच्या कार्बन क्रेडीटबाबत चर्चा होऊन निर्णय होणेची विनती आहे.

**निर्णय क्र.७५१** **यावेळी मे.मिटकॉन यांचे प्रतिनिधी श्री विजय पटेल हे स्वतः उपस्थित होते. त्यांनी याबाबतीत सभेत माहिती दिली व उपरोक्त सोलर स्टीम कुकींग सिस्टिमचा डाटा कलेक्ट करुन यावर अभ्यास करुन पुढील कार्यवाही करावी लागेल असे सांगितले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री साई प्रसादालयाकडील सोलर स्टीम कुकींग यंत्रणेच्या कार्बन क्रेडीट मिळविणेसाठी मे.मिटकॉन यांना सल्लागार (एजन्सी) नेमण्यात यावे व याकामी त्यांना पवनचक्कीच्या कार्बन क्रेडीटसाठी ज्या पध्दतीने फी आदा करण्यात येत असेल त्यानुसार त्यांना सोलर स्टीम कुकींग यंत्रणेसाठी फी आदा करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) दूरध्वनी यंत्रणा बॅकप्लेन कार्डसाठी आलेल्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे सर्व विभाग व इतर परिसर एकमेंकाशी अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेअंतर्गत जोडणेकामी मा.विश्वस्त मंडळाचे निर्णयानुसार, मे.सिमेन्स एन्टरप्राईजेस कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई यांचेकडून अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा माहे ऑगष्ट,२००४ मध्ये कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. या अत्याधुनिक दूरध्वनी यंत्रणेव्दारे समाधी मंदिर परिसर, रुग्णालय व धर्मशाळा परिसर, नविन भक्तनिवासस्थान व नविन प्रसादालय या चार ठिकाणी दूरध्वनी एक्सचेंज बसविण्यात आलेले असून, या चारही एक्सचेंजमधुन एकूण ८०० अंतर्गत दूरध्वनी विविध विभागांना संदेशवहनासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील दुरध्वनी दिनांक ११/०९/२०११ रोजी रात्री अचानक बंद पडलेने दि.१२/०९/२०११ रोजी सिमेंस कंपनीस दुरध्वनी बंद पडलेबाबत तक्रार देण्यात आलेली होती त्यानुसार कंपनीचे इंजिनियर श्री.निलेश परब यांनी प्रत्यक्ष शिर्डी साईटला भेट देउन मशिनरीची तपासणी केली असता मशिनरीचे बॅकप्लेन कार्ड जळाल्याने दुरध्वनी यंत्रणा बंद पडली असल्याचे त्यांनी सांगीतले. दुरध्वनी यंत्रणा तातडीने चालु करणेसाठी दि.१४/०९/२०११ रोजी कंपनीचे इंजिनियर श्री.निलेश परब यांनी मुंबई वरुन तातडीने नविन बॅकप्लेन कार्ड चलन नंबर SERV/ ५००२५८५ दि.१४/०९/२०११ नुसार आणुन भक्तनिवासस्थान येथील दुरध्वनी यंत्रणेत बसवुन तेथील दुरध्वनी दि.१५/०९/२०११ रोजी दुपारी १२ वा.पुर्ववत चालु केलेले आहेत.

तरी उपरोक्त नविन बॅकप्लेन कार्डसाठी आलेल्या रक्कम रुपये ४०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चाळीस हजार मात्र ) अधिक सर्व्हीस टॅक्सचे खर्चास व सदर बीलाची रक्कम मे. सिमेन्स एन्टरप्राईजेस कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई यांना आदा करणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.७५२ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) दूरध्वनी यंत्रणा बॅकप्लेन कार्डसाठी आलेल्या रक्कम रुपये ४०,०००/-अधिक सर्व्हीस टॅक्सचे खर्चास व सदर बीलाची रक्कम मे. सिमेन्स एन्टरप्राईजेस कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११ एल.पी. गॅसचा डिकॅन्टींग पंप दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालयात एप्रिल २०११ पासुन लाडु प्रसाद बनविणेकामी दोन कॉन्ट्रक्टरची नियुक्ती केलेली आहे. त्यामुळे जुने प्रसालयातील गॅस प्लॅटचा वापर लाडु बनविणेकामी इंधन पुरवठा यंत्रणा म्हणुन होत आहे. गॅस टॅकर मधुन टॅंकमध्ये एल. पी. गॅस अनलोड करणेकामी दोन डिकॅन्टींग पंपाचा वापर करणेत येत आहे. त्यापैकी एक पंप बॉडी व सिल मधुन गॅस लिकेज झालेमुळे बंद आहे.

सध्या स्टॅण्ड बाय पंपाद्वारे गॅस टॅंकर मधील गॅस अनलोडींग केला जातो. मात्र सध्या कार्यरत असलेला पंप बंद पडल्यास किवा लिकेज झालेस टॅंकरमधुन गॅस टॅक मध्ये घेण्यास अडचन होऊ शकते. त्यामुळे लिकेज पंप दुरुस्त असणे आवश्यक आहे. सदर पंप BE मेक (कलकत्ता) चा असुन पंपाचे स्पेअरपार्ट व दुरुस्तीकामे स्थानिक ठिकाणी होत नाही. त्यामुळे इंटरनेटद्वारे बी.ई. पंपाचे नजिकचे अधिकृत सर्व्हिस डिलर्सची यादी मध्ये मे. रुसो ॲग्रो इंजिनिअरींग प्रा. लि. पुणे या फर्मचे नाव आढळले. त्यांना दुरध्वनी व ईमेलद्वारे संपर्क केला. त्यानुसार आपलेकडील पंपाचा तांत्रिक तपशिल कळवुन प्राथमिक आवश्यक स्पेअरपार्टचे किंमतीचा तपशिल त्यांचेकडुन इमेलद्वारे मागविण्यात आलेला आहे. त्यानुसार स्पेअरपार्ट खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | स्पेअरपार्टचा तपशिल | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | शॉफ्ट (Incl Inner & Outer ring, Key & nut ) | १ | २८२०.०० | २८२०.०० |
| २. | स्टेज पॅकिंग | ४ | ४४५.०० | १७८०.०० |
| ३ | मेकॅनिकल सील | १ | २२,२२५.०० | २२,२२५.०० |
| | व्हॅट १२.५ % | | | ३,३५३.०० |
| ४. | रिपेअरींग चार्जेस | १ | १,७५०.०० | १,७५०.०० |
| | सर्व्हिस टॅक्स १०.३% | | | १८०.०० |
| | **एकुण रक्कम** | | | ३२,१०८.०० |

मात्र पंपाचे दुरुस्ती खर्चाबाबत निश्चित रक्कम समजण्यासाठी पंप पुणे येथे वर्कशॉपमध्ये पाठविणे आवश्यक आहे. वर्क शॉप मध्ये खोलुन पाहिल्यानंतर जे स्पेअरपार्ट खराब झालेचे आढळून येतील त्यानुसार निश्चित खर्च कळविण्यात येईल असे मे. रुसो ॲग्रो इंजिनिअरींग प्रा. लि. पुणे यांनी कळविलेले आहे.

तरी प्रसादालयातील एल.पी गॅस डिकॅन्टिग पंप दुरुस्तीसाठी मे. रुसो ॲग्रो इंजिनिअरींग प्रा. लि. पुणे यांचेकडे दुरुस्तीसाठी पाठविणेस व त्याकामी रु.३२,१०८/- किंवा डिकॅन्टिग पंप खोलल्यानंतर येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णय होणेस विनंती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.७५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसादालयातील एल.पी गॅस डिकॅन्टिग पंप दुरुस्तीसाठी मे. रुसो ॲग्रो इंजिनिअरींग प्रा. लि. पुणे यांचेकडे दुरुस्तीसाठी पाठविणेस व त्याकामी रु.३२,१०८/- किंवा डिकॅन्टिग पंप खोलल्यानंतर येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२ मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०७.२०११ निर्णय क्र.५५७ नुसार ५०% व त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर राहिलेल्या व दि.१५.०९.२०११ पासून कामावरुन बंद केलेल्या ६९ कंत्राटी कामगारांना पुन्हा कामावर हजर करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे यांचेकडील १५५५ कंत्राटी अकुशल, कुशल कर्मचाऱ्यांपैकी ३८ कंत्राटी कर्मचारी माहे डिसेंबर-२०१० ते माहे-मे-२०११ या कालावधीत ५०% किंवा त्यापेक्षा जास्त दिवस कामावरून गैरहजर/अनुपस्थित राहीले आहेत. त्याचप्रमाणे सर्व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेकडील ६०० कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांपैकी ३१ कंत्राटी सुरक्षा कर्मचारी माहे डिसेंबर-२०१० ते माहे मे-२०११ या कालावधीत ५०% किंवा त्यापेक्षा जास्त दिवस कामावरून गैरहजर/अनुपस्थित राहीले आहेत. म्हणून संबंधीत ६९ अकुशल/कुशल व सुरक्षा कंत्राटी कामगारांना कामावरून कायम स्वरूपी बंद (कमी) करणेस व तसे संबंधीत लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांना तोंडी कळविणेस मान्यता मिळावी याकरीता मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०७-२०११ रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करणेत आला होता.

त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०७-२०११ रोजीचे सभेमध्ये चर्चा होवून, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे माहे डिसेंबर-२०१० ते माहे मे-२०११ या कालावधीत ५०% किंवा त्यापेक्षा जास्त दिवस कामावरून गैरहजर/अनुपस्थित असलेल्या कंत्राटी कामगारांना कामावरून बंद करणेत यावे. तसे संबंधीत लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांना तोंडी कळविणेत यावे असा निर्णय क्र.५५७ पारीत झालेला आहे.

म्हणून मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०७-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५७ यास अनुसरून माहे डिसेंबर-२०१० ते माहे मे-२०११ या कालावधीत ५०% किंवा त्यापेक्षा जास्त दिवस कामावरून गैरहजर/अनुपस्थित राहिलेल्या सदर ६९ कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कामगारांना दि.१५-०९-२०११ पासून कामावरून बंद (कमी) करणेत आलेले आहे.

तथापि, कामावरुन बंद केलेल्या ६९ कंत्राटी कामगारांपैकी काही कंत्राटी कामगारांनी ते स्वत: व कुटुंबातील सदस्य आजारी असलेमुळे कामावरून गैरहजर असल्याचे सांगितले आहे. त्यांनी वर्तनात सुधारणा करणेची शेवटची संधी म्हणून पुन्हा एक वेळ कामावर हजर करून घ्यावे अशी विनंती प्रशासनाकडे केलेली आहे. त्याचप्रमाणे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०११ दि.०५-१०-२०११ पासून ते दि.०८-१०-२०११ अखेर संपन्न होत असल्याने, सदर कालावधीत साईभक्तांची गर्दी मोठया प्रमाणात होण्याची शक्यता असल्यामुळे, कर्मचारी संख्या उत्सव काळात कमी पडण्याची शक्यता आहे. म्हणून कामावरून बंद केलेल्या संबंधीत ६९ कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कामगारांना सुधारण्याची अंतिम संधी देण्याच्या दृष्टीने पुन्हा कामावर हजर/रूजू करून घेण्यात यावे अशा सुचना मा.अध्यक्ष महोदय यांनी दि.२१-०९-२०११ रोजी दिलेल्या आहेत.

सबब, माहे डिसेंबर-२०१० ते माहे-मे-२०११ या कालावधीत ५०% किंवा त्यापेक्षा जास्त दिवस कामावरून गैरहजर/अनुपस्थित राहीलेल्या व दि.१५-०९-२०११ पासून कामावरून बंद केलेल्या ६९ अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचाऱ्यांना कंत्राटदारामार्फत पुन्हा कामावर हजर/रूजू करून घेणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७५४ यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१५-०९-२०११ पासून कामावरून बंद केलेल्या ६९ अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचाऱ्यांना कंत्राटदारामार्फत पुन्हा कामावर हजर/रूजू करून घेण्यात यावे. माहे ऑक्टोबर,२०११ पासून पूढे सहा महिने कालावधीत ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे गैरहजेरीचे प्रमाण २५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर हजर करुन घेऊ नये असे ठरले.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३ डॉ.पी. रघुनाथ रेड्डी, हैद्राबाद यांची श्री साईलीला द्वैमासिक हिंदी- इंग्रजी साठी मानद संपादक पदावर नेमणूक करणेबाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे वतीने श्री साईलीला द्वैमासिक मराठी व हिंदी-इंग्रजी संयुक्त अंक प्रकाशित करण्यात येतात. प्रती वर्षी द्वैमासिक ५ अंक अधिक १ दसरा विशेषांक असे ६ अंक प्रकाशित करण्यात येतात. अकांचे माहितीचे स्वरुप खालील प्रमाणे आहे.

**श्री साईलीला मराठी अंकातील अंतरंग**

स्मरणीय
अध्यात्मीक लेख, धार्मिक लेख,
अभंग श्री साईसत्‌चरित्र क्रमाक्रमाने १ अध्याय
महाराजांचे अनुभव ( श्री साईबाबांचे समकालीन भक्तांचे अनुभव)
श्री साईबाबांचे भक्तांना आलेले अनुभव
साईच्या सानिध्यात - साईबाबांचे समकालीन भक्तांची माहिती.
शिर्डीवृत्त

**श्री साईलीला हिंदी-इंग्रजी अंकातील अंतरंग**

स्मरणीय
अध्यात्मीक लेख, धार्मिक लेख,
श्री साईबाबांचे भक्तांना आलेले अनुभव
साईच्या सानिध्यात - साईबाबांचे समकालीन भक्तांची माहिती.
शिर्डीवृत्त

सध्या साईलीला नियतकालीकांचे लेखन, लेख संकलन, आर्टवर्क तयार करणे, डीटीपी करणे एडीटींग करणे, छपाई करणे,वितरण करणे इत्यादी सर्व काम संस्थानचे मुंबई कार्यालयात केली जातात. याकामी मुंबई कार्यालयात खालीलप्रमाणे सेवक वर्ग आहे.

१) कार्यकारी संपादक - १ पद (सध्या रिक्त)
२) सहाय्यक संपादक - १ पद
३) लिपीक टंकलेखक - १ पद
४) डीटीपी ऑप्रेटर - १ पद ( कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने दरमहा रु.२५००/- चे मानधनावर )
५) शिपाई - १ पद ( मुंबई कार्यालयातील इतर ३ शिपाई याकामी मदत करतात)

साईलीला अंकासाठी आलेल्या धार्मिक/अध्यात्मीक लेखांचे संकलन करुन, एडीटींग केले जाते. त्यानंतर वार्षिक न्युनतम दराने आर्टवर्क तयार करण्याचे कामाचे टेंडर दिलेल्या धारकांकडून आर्टवर्क तयार करण्यात येऊन, वार्षिक न्युनतम दराने छपाईकामाचे टेंडर दिलेल्या टेंडर धारकांकडून मासिकांची छपाई करुन घेतली जाते. मासिके पाकिटात टाकून त्यावर पत्त्याचे स्टीकर लावून पोस्टाने पाठविणेकामी मुख्य पोस्ट ऑफिस, मुंबई येथे वितरण करणेकामी दिले जातात. अशा प्रकारे कामकाज चालते.

सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात एकुण १,११,०३३ साईलीला द्वैमासिक अंक छपाई करण्यात आलेले असून त्यासाठी झालेल्या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | झालेला खर्च |
|---|---|---|
| ०१ | पगार | १६०४०४४.०० |
| ०२ | छपाई खर्च | १४३२१७६.०० |
| ०३ | पाकिटे खर्च | १६३०९५.०० |
| ०४ | पोस्टेज खर्च | ३६९२०८.०० |
| ०५ | स्टीकर खर्च | १५७६०.०० |
| | एकूण खर्च रु. | ३५,८४,२८३.०० |
| | प्रती द्वैमासिक सरासरी खर्च रु. | ३२.२८ |
| | टपाल खर्चासह ६ अंकांसाठी वार्षिक वर्गणी | ५०.०० |
| | किरकोळ विक्री किंमत | ८.०० |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०७.२०११ चे सभेतील निर्णय क्र.५९५ (४) नुसार साईलीला संपादकीय कार्यालय शिर्डी येथे हलविण्यात येऊन या कार्यालयाची जबाबदारी श्री मोहन जगन्नाथ यादव, जनसंपर्क अधिकारी यांचेवर सोपविण्यात यावी असा निर्णय पारीत झाला आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

दि.१५.०९.२०११ रोजी डॉ.पी.रघुनाथ रेड्डी, आसोशीएट प्रोफेसर इन मॅनेजमेंट, श्री व्यंकेटश्वर विद्यपिठ, तिरुपती हे श्री साईंचे दर्शनासाठी आले असता, त्यांनी मा.अध्यक्ष महोदय यांची भेट घेतली होती. सदर भेटीत श्री रेड्डी यांनी संस्थान प्रकाशित श्री साईलीला नियतकालीक हिंदी-इंग्रजी चे मानद संपादकाचे काम करण्याची इच्छा प्रदर्शीत केली आहे. त्यानुसार मा.अध्यक्ष महोदय यांनी तसा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढ सादर करावा असे निर्देश दिले आहेत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



डॉ.पी. रघुनाथ रेड्डी हे श्री व्यंकेटश्वर विद्यपिठ, तिरुपती येथे मॅनेजमेंट अभ्यास विभागात आसोशीएट प्रोफेसर असून ते साईबाबांचे तत्त्वज्ञानाचे अभ्यासक आहेत. अध्यात्मीक व धार्मिक विषयावर अनेक प्रकारचे लेख लिहीली आहेत. डॉ.रेड्डी यांनी साईलीला हिंदी-इंग्रजी अंकाचे मानद संपादक म्हणून काम करण्याची इच्छा प्रदर्शित करुन मासिकाचे स्वरुप खालील प्रमाणे राहिल असे कळविले आहे.

१) श्री साईबाबांचे तत्वज्ञानावर वैचारिक लेख
२) साईबाबांचे भक्तांना आलेले अनुभव
३) साईबाबांचे समकालीन भक्तांचे अनुभव
४) श्री साईचरित्रातील अध्यायासंबंधी लेख
५) श्री साईबाबांचे जीवनावर कविता, गाणी
६) शिर्डी तीर्थक्षेत्रासंबंधी माहिती
७) भारतातील व भारताबाहेरील साईबाबांचे मंदिराबाबतची माहिती.
८) श्री साईबाबा संस्थान शिर्डीचे उपक्रमाबाबतची माहिती
९) राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय महत्वाच्या घडामोडी
१०) भक्तांचे विचार व सुचनाबाबत
११) फोटो

याकामी एक स्वतंत्र संपादकीय समिती मा.अध्यक्ष महोदय यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात यावी. मा.अध्यक्ष महोदय हे कार्यकारी संपादक व मा.कार्यकारी अधिकारी साहेब हे संपादक म्हणून असतील.मानद संपादक हे भक्तांकडून आलेल्या लेखांचे संकलन एडीटींग करुन आर्टवर्क तयार करुन देतील. संस्थानचा एक कर्मचारी मानद संपादक यांचेशी कायम संपर्कात राहून (Coordinate) वेळोवेळी मानद संपादकांना शिर्डी येथून माहिती देण्याचे काम करील. आवश्यकतेनुसार मानद संपादक शिर्डी येथे नियतकालीक प्रकाशनाचे पूर्वी भेट देतील. नियतकालीक प्रकाशनाबाबत माहिती संकलन, एडिटींग, छपाई, वितरणाबाबतचा कायमस्वरुपी आराखडा तयार करण्यात येईल. नियतकालीकात कोणते लेख, माहिती समाविष्ट करावी याबाबत प्रकाशनापूर्वी संपादकीय समिती निर्णय घेईल. डॉ.रेड्डी यांनी दिलेले पत्र सोबत अवलोकनार्थ सादर केलेले आहे.

सध्याचा श्री साईलीला अंकाचा सेटअप हा डॉ. रेड्डी यांनी सुचविलेप्रमाणेच आहे. साईलीला अंकाचे प्रबंध संपादक मा. अध्यक्ष महोदय व संपादक मा. कार्यकारी अधिकारी आहेत. त्याशिवाय एक सहाय्यक संपादक आहे. आर्टवर्क व डी.टी.पी. चे काम करण्यासाठी संस्थानकडे कर्मचारी वर्ग आहे.
डॉ. रेड्डी हे व्यकटेश विद्यापीठ तिरुपती येथै प्रोफेसर असल्यामुळे त्यांची श्री साईलीला हिंदी-इंग्रजी नियतकालीचे मानद संपादक म्हणून नेमणूक करावयाची असल्यास सदरचे काम पहाण्यास त्यांना व्यंकटेश्वर विद्यापीठाचे रजिस्ट्रार यांची अनुमती घ्यावी लागेल त्यासाठी त्यांना देण्याच्या पत्राचा मसूदा सोबत अवलोकनार्थ सादर केला आहे.

डॉ रेड्डी हे मानद संपादकाचे काम विनामूल्य करणार आहेत. तथापी वेळोवेळी त्यांचा होणारा प्रवास खर्च निवास, भोजन व्यवस्था खर्च यांचा उल्लेख त्यांनी पत्रात केलेला नाही. तथापी त्यांना रेल्वेने (तिरुपती ते शिरडी व शिरडी ते तिरुपती) जाणे-येणेचे प्रथम वर्गाचे होणारे भाडे संस्थान मार्फत देणे तसेच शिरडीतील त्यांची निवासाची व प्रसाद भोजनाची व्यवस्था संस्थान मार्फत संस्थान मध्ये विनामूल्य करणेबाबत विचार होणेस विनंती.

**किंवा**

प्राप्त परिस्थिती विचारात घेता परदेशी साईभक्तांसंदर्भात इंग्रजी हिन्दी साईलीला द्वैमासिकात एक खास सादर राखीव ठेवून त्याबाबतचे लेख डॉ. रेड्डी यांचे मार्फत मागविता येतील.

**निर्णय क्र.७५५. यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.पी. रघुनाथ रेड्डी, हैद्राबाद यांची श्री साईलीला द्वैमासिक हिंदी-इंग्रजी साठी मानद संपादक पदावर नेमणूक करण्यात यावी. तसेच त्यांना रेल्वेने (तिरुपती ते शिरडी व शिरडी ते तिरुपती) जाणे-येणेचे प्रथम वर्गाचे होणारे भाडे संस्थान मार्फत देणे तसेच शिरडीतील त्यांची निवासाची व प्रसाद भोजनाची व्यवस्था संस्थान मार्फत (संस्थान मध्ये) विनामूल्य करणेत यावी. श्री रेड्डी यांनी श्री साईलीला मासिकासाठी आर्ट वर्क, डी.टी.पी इत्यादी कामे करुन घेतल्यास व याकामी त्यांनी बीले सादर खर्चाची प्रतीपूर्ती संस्थानमार्फत वेळचेवेळी करण्यात यावी.**

**श्री साईलीला व्दैमासिक हिंदी-इंग्रजीचा अंक ५० पानांचा काढण्यात यावा. पहिला अंक जानेवारी-२०१२ मध्ये प्रकाशित करण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक,प्रकाशने विभाग/ अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना बेंचेस वाटप करुन मंजुर रकमेपैकी शिल्लक राहीलेल्या रकमेचे बेंचेस वाटपाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद अहमदनगर यांचे दि.२८/०६/२००६ चे मागणीस अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/१०/२००६ चे सभेतील निर्णय क्र.८६४ नुसार जिल्हा परिषद अहमदनगर यांना बेंचेससाठी रुपये १० कोटी आर्थिक मदत देण्यास मान्यता दिलेली आहे.

शासन पत्र क्र.सासंवि २००५/८०३/(१२०)-का.सोळा,मंत्रालय मुंबई, दि.३१ ऑगस्ट २००९. अन्वये, जिल्हा परिषद अ.नगर यांनी आवश्यक बेंचेसची संख्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेला कळवावी व संस्थानमार्फत रुपये १० कोटी रकमेचे बेंचेस उपलब्ध करुन जिल्हा परिषदेस देण्यास मंजुरी दिलेली आहे.

शासन मंजुरीस अनुसरुन जिल्हा परिषद अहमदनगर यांनी कळविलेल्या शाळानिहाय बेंचेसच्या संख्येप्रमाणे मे.गोदरेज ॲण्ड बॉईज मॅन्यु.कं. मुंबई यांचेकडून बेंचेस तयार करुन शाळांना पोहच करण्यात आलेले आहेत.

**वाटप केलेल्या बेंचेसची माहीती खालीलप्रमाणे:-**

| वर्ग | एका बेंचेसची किंमत रु | एकूण बेंचेस नग | एकूण बेंचेसची रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| इ.५ वी ते ७ वी | ३१३८ | ४,११४ | १,२९,०९,७३२ |
| | | ३२,५९५ | ९,२३,४३,२४१ |

१) मंजुर निधी रुपये १० कोटी, २) खर्च झालेला निधी रुपये ९,२३,४३,२४१/-
३) शिल्लक निधी रुपये ७६,५६,७५९/-

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०७/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६४. रुपये १० कोटी पैकी शिल्लक राहीलेल्या रुपये ७३,५६,७५९/- एवढया निधीमध्ये कोपरगांव,श्रीरामपूर, राहूरी व नेवासा या तालूक्यातील प्राथमिक शाळांना बेंचेस खरेदी करण्यात येऊन मा.विश्वस्तांचे सुचनेप्रमाणे संबंधित शाळांना वाटप करण्यात यावे. सदरची रक्कम सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात खर्च करण्यासाठी शासनाची मान्यता घेण्यात यावी असा झालेला आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन इकडील जा.नं.एसएसएस, वशी-३/ ३०२९/ २०११, दि.१४/०९/२०११ अन्वये प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी पाठविलेला आहे.

मे.गोदरेज ॲण्ड बॉईज मॅन्यु.कं. मुंबई यांनी मागिल दराने बेंचेस तयार करुन दिल्यास खालीलप्रमाणे बेंचेस तयार होतील.

| वर्ग | एका बेंचेसची किंमत रुपये | एकूण बेंचेस नग | एकूण बेंचेसची रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| इ.१ ली ते इ.४ थी | २७८९ | २७४५ | ७६,५५,८०५ |
| किंवा | | | |
| इ.५ वी ते ७ वी | ३१३८ | २४४० | ७६,५६,७२० |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०७/२०११ रोजीचे सभेतील निर्णयानुसार, कोपरगांव, श्रीरामपूर, राहूरी व नेवासा या ४ तालूक्यातील प्राथमिक शाळांना बेंचेस वाटप करावयाचे झाल्यास इयता १ ली ते इयत्ता ४ थीचे २७४५ बेंचेस तयार होतील. ४ तालुक्यांना समान संख्येत विभागून देणेचे असल्यास प्रत्येक तालुक्यास ६८६ बेंचेस देता येतील.

**किंवा**

इयता ५ वी ते इयत्ता ७ वीचे २४४० बेंचेस तयार होतील. ४ तालुक्यांना समान संख्येत विभागून देणेचे असल्यास प्रत्येक तालुक्यास ६१० बेंचेस देता येतील.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०७/२०११ चे सभेतील निर्णय क्र.५६४ नुसार ठरलेप्रमाणे कोपरगांव, श्रीरामपूर, राहूरी व नेवासा या चार तालूक्यातील प्राथमिक शाळांची नांवे व बेंचेस संख्या निश्चित होणेस विनंती.

**निर्णय क्र.७५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०७/२०११ चे सभेतील निर्णय क्र.५६४ नुसार ठरलेप्रमाणे कोपरगांव, श्रीरामपूर, राहूरी व नेवासा या चार तालूक्यातील प्राथमिक शाळांची नांवे व बेंचेसची संख्या मा.विश्वस्तांना विचारणा करुन निश्चित करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-प्राचार्य, आय.टी.आय/प्रशासनशाखा वशी-०३)

---

**आयत्या वेळेचा**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.१५** **श्री साई प्रसादालयाकरिता हरबरा डाळ पुरविणेकामी आलेल्या निविदा व नमूने मा.व्य. समितीपुढे सादर करुन निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रसादालयसाठी सन २०११-१२ करिता हरबरा डाळ व तुरडाळ खरेदीकामी विहित नमुन्यात निविदा मागवून, दर व नमुने यावर मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१०.०४.२०११ चे सभेतील चर्चेनुसार मे.कैलास ट्रेडिंग कंपनी, नांदेड यांचे न्युनतम दर व नमुने मान्य करण्यात येऊन त्यांना माहे एप्रिल २०११ ते मार्च २०१२ अखेर माल पुरविणेकामी पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

| अ. नं. | मालाचा तपशिल | जात/ प्रकार | मागणी | सुट दर प्रति क्विंटल | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | हरबराडाळ बिगर पॉलिश | B | ८००० क्विंटल | ३,२००/- | २,५६,००,०००/- |

मे.कैलास ट्रेडींग कं.नांदेड यांनी त्यांचेकडील दि.२४/०८/२०११ चे पत्राने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे. "ते गेल्या ३-४ वर्षापासून मालाचे टेंडर ना नफा ना तोटा या तत्वावर भरत आहेत. आजपर्यंत ते केव्हाही Black listed झालेले नाहीत. असे कळवून चालू वर्षी हरबरा डाळीमध्ये खुपच भाव वाढ झालेली आहे. दर रु.४०/- प्रति किलो प्रमाणे झालेला आहे. त्यांचा सध्याचा पुरवठा आदेशातील दर प्रति किलो रु.३२/- असा आहे. तरी मे.साहेबांनी दरवाढ मिळवून देण्याची कृपा करुन प्रति किलो रु.४०/- मात्र प्रमाणे भाव द्यावा."अशी विनंती केली आहे.

मे.कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड यांचे पुरवठा आदेशातील अट क्र. १३ मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे. "मंजूर झालेल्या दराने व नमुन्याप्रमाणे माल पुरवठा करणे संबंधीत पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाव वाढ दिली जाणार नाही/ मागता येणार नाही. आपण माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास आपली पुर्णतः/ अंशतः सुरक्षा अनामत रक्कम संस्थान जमा करणेत येईल. त्याबाबत संस्थान व्यवस्थापन निर्णय घेईल"

पुरवठा आदेशानुसार त्यांनी आजतागायत ८००० क्विंटल हरबरा डाळीपैकी २३४७ क्विटलचा पुरवठा केलेला आहे. माहे मार्च.२०१२ अखेर ५६५३ क्विंटल हरबरा डाळीचा पुरवठा करणे बाकी आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०८.२०११ रोजीचे सभेत सदरचा विषय चर्चेस ठेवला असता हरबरा डाळीचे बाजारभाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने उर्वरीत ५६५३ क्विंटल हरबरा डाळ खरेदीकामी संस्थानचे नियमित पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागवून हरबरा डाळ खरेदी करावी ,असे ठरले.

त्यानुसार ५६५३ क्विंटल हरबरादाळ खरेदीकामी अधिकृत वितरकांकडून त्यांचे लेडरहेडवर सिलबंद निविदा मागविणेकामी, निविदा सुचनेच्या जाहिरातीचा मसुदा मंजूर करुन दैनिक सकाळचे , पुणे - नाशिक आवृत्तीमध्ये दि.०८/०९/२०११ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यामध्ये निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख दि.२४/०९/२०११ अशी नमूद करण्यांत आलेली आहे.

मुदतीअंती खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या-

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | आवक नंबर |
|---|---|---|
| ०१. | मे.बाफणा बजार, नाशिक | ११३१३/१६.०९.२०११ |
| ०२. | मे.ओरीसा ऑर्डर स्पलायर्स प्रा.लि., जळगांव | ११७०६/२१.०९.२०११ |
| ०३. | मे.कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड | ११७५७/२२.०९.२०११ |
| ०४. | मे.मयूरी ट्रेडींग कंपनी, नांदेड | ११७५८/२२.०९.२०११ |
| ०५. | मे.संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड | ११७५९/२२.०९.२०११ |
| ०६. | मे.पडताणी मिल्स, संगमनेर | ११७६०/२२.०९.२०११ |
| ०७. | मे.रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नांदेड | ११७६१/२२.०९.२०११ |
| ०८. | मे.साहील ट्रेडींग कंपनी, नांदेड | ११७६२/२२.०९.२०११ |
| ०९. | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड | ११७६३/२२.०९.२०११ |
| १०. | मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड | ११८९६/२४.०९.२०११ |
| ११. | मे.पुखराज रामनिवास, जळगांव | ११८९७/२४.०९.२०११ |
| १२. | मे.आर.मुथा राईस हाऊस, औरंगाबाद | ११८९८/२४.०९.२०११ |
| १३. | मे.श्रीजी कार्पोरेशन, जळगांव | ११८९९/२४.०९.२०११ |
| १४. | मे.गुणवंत एन्टरप्रायझेस, नागपुर | ११९१६/२४.०९.२०११ |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडणेत येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविणेत आले होते.

निविदासादरकर्त्यांनी निविदेसोबत सादर केलेले हरबरा डाळीच्या बंद पिशव्यांचे नमुने सभेत निविदासादकर्त्यांसमक्ष उघडणेत येऊन चांगल्या व बिगर पॉलिश हरबरा डाळीचे नमुने उपस्थित निविदाधारकांना निवडणेबाबत सांगणेत आले. निविदाधारकांपैकी दोघांनी उत्कृष्ठ नमुने निवडून

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



समितीस सादर केले तदनंतर निवडलेल्या नमुन्यांना गोपनीय नंबर देऊन त्या निवडलेल्या डाळीच्या नमुन्यांचे दराबाबत चर्चा केली असता निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | जात/ प्रकार बिगर पॉलिश | मुळ दर प्रति क्विं. | चर्चेअंती देऊ केलेले दर प्रति क्विं. |
|---|---|---|---|---|
| ०१. | मे.बाफणा बजार, नाशिक | कोरी बोल्ड | ५१००/- | अनुपस्थित |
| ०२. | मे.ओरीसा ऑर्डर सप्लायर्स प्रा.लि., जळगांव | --- | ५९९४/- | ५३१०/- |
| ०३. | मे.कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड | बिगर पॉलिश | ४८००/- | ४८००/- |
| ०४. | मे.मयूरी ट्रेडींग कंपनी, नांदेड | बिगर पॉलिश | ५२००/- | अनुपस्थित |
| ०५. | मे.संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड | बिगर पॉलिश | ४९००/- | ५०००/- |
| ०६. | मे.पडताणी मिल्स, संगमनेर | --- | ५४००/- | अनुपस्थित |
| ०७. | मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नांदेड | A<br>B | ५३११/-<br>५१०१/- | अनुपस्थित |
| ०८. | मे.साहील ट्रेडींग कंपनी, नांदेड | बिगर पॉलिश | ५०००/- | ५२००/- |
| ०९. | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड | A<br>B<br>C<br>D | ५६५१/-<br>५५५१/-<br>५५२१/-<br>५४८१/- | ४७७५/-<br>---<br>---<br>--- |
| १०. | मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड | Extra क्वॉलिटी | ५६०५/- | अनुपस्थित |
| ११. | मे.पुखराज रामनिवास, जळगांव | बेस्ट A<br>बेस्ट B<br>बेस्ट C | ५४५१/-<br>५५५१/-<br>५५८१/- | ---<br>---<br>५४११/- |
| १२. | मे.आर.मुथा राईस हाऊस, औरंगाबाद | A<br>B | ५३०१/-<br>५०४०/- | अनुपस्थित |
| १३. | मे.श्रीजी कार्पोरेशन, जळगांव | अ क्वॉलिटी<br>सुपर मेडिअम बोल्ड | ६१२०/-<br>५८५०/- | ५८००/-<br>५४००/- |
| १४. | मे.गुणवंत एन्टरप्रायझेस, नागपुर | सॅम्पल- नं.०१<br>सॅम्पल- नं.०२ | ५२९१/-<br>५५२१/- | ५२७१/-<br>--- |

**निर्णय क्र.७५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड यांची A या प्रकारातील बिगर पॉलिश हरबरा डाळ प्रति क्विंटल रु.४,७७५/- मात्र हा निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६ साईआश्रम १-२, साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती निवासस्थानांसाठी रबराईज्ड क्वायर मॅट्रेस व पिलो खरेदीकामी आलेले नमुने निवडून केलेल्या शिफारशीबाबतचा अहवाल**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान निवासस्थाने, साई आश्रम १ व २, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), द्वारावती निवासस्थान या विभागातील इमारतींसाठी रबराईजड क्वायर मॅट्रेस, टु फोल्ड मॅट्रेस व पिलो खरेदीकामी वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. आलेल्या निविदा दि.२८/०८/२०११ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीच्या सभेत उघडण्यात येऊन दिलेल्या दराबाबत उपस्थित निविदाधारकाशी समक्ष चर्चा/वाटाघाटी करण्यात आल्या. निविदाधारकांनी निविदेत दिलेले दर व चर्चा/वाटाघाटीनंतर निश्चित केलेले दर याचा तपशील खालील प्रमाणेआहे.

निविदाधारकांनी दिलेले नमुने निवडणेकामी दि.०१/०९/२०११ रोजी व्यवस्थापन समितीचे स्थानिक सदस्यांना उपस्थित राहाणेकामी दुरध्वनीद्वारे कळविण्यात आले होते. त्यापैकी मा.श्री.सुरेशराव वाबळे साो, मा.श्री.पाडुरंगजी अभंग साो. मा.सौ.अलकाताई शेजवळ यांनी वैयक्तिक कराणास्तव उपस्थित राहु शकत नसलेबद्दल कळविले.

यावेळी नमुना निवडणेकामी व्यवस्थापन समितीचे खालील स्थानिक सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री शैलेशजी कुटे साो.

२) मा.डॉ.एकनाथराव गोंदकर साो.

३) मा.श्री अशोकराव खांबेकर साो.

मा.विश्वस्त यांनी निविदाधारकांनी दिलेले नमुन्यांची पहाणी करुन दि.२८/०८/२०११ चे व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा/वाटाघाटीनंतर निश्चित केलेले दर, कागदपत्रांची पाहणी करुन, अटी/ शर्तींची व कागदपत्रांची पुर्तता करणाऱ्या पात्र निविदाधारकांतून खालीलप्रमाणे न्युनतम दराची शिफारस केली.

| |
|---|
| **साईआश्रम नं १ /२ साठी रबराईज्ड क्वायर मॅट्रेस संख्या ५,५७० नग**<br>1829 mm X 762 mm, (72” X 30”) |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील दर | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|
| ०१. | मे.केरला स्टेट रबर कॉ.ऑप.लि.कन्नूर, केरला | ४,६६८/- उशी सह | ४३४१/- उशी सह |
| ०२ | मे.गोदरेज ॲण्ड बॉईज मॅन्यु.कं.लि., पुणे | २,८४४/- | २,५६०/- |
| ०३ | मे.कॉन्टक कमफोर्ट प्रा.लि., पारनेर | ३,२७७/- | २,९४९/- |
| ०४. | मे.व्यंकटेश्वर कॉयर प्रॉडक्टस प्रा.लि. सिकंदराबाद | २,४८७/- | गैरहजर |
| ०५. | मे.सेंच्युरी फायबर प्लेटस प्रा.लि., सिकंदराबाद | २,६६९/- | २,५३५/- |
| ०६. | मे.फायबर फोम (मुंबई) प्रा.लि, सिन्नर | २,६१८/- | २,५९२/- |
| ०७. | मे.ॲग्रीकों फायबर फोम प्रा.लि., कन्नुर | २,८२३/- | २,८००/- |
| ०८. | मे.युनायटेड इंडिया इंडस्ट्रीज टेक.सिन्नर | २,४००/- | २,३२८/- |
| ०९. | मे.एरिओकॉम कुशन्स प्रा.लि., नागपुर | २,७१९/- | २,७१९/- |

| **साईआश्रम १ व २ रबराईज्ड क्वायर मॅट्रेस टु फोल्ड संख्या ८,३५१ नग**<br>Size 75” X 30” X 2” (1905 mm X 762 mm X 51 mm) | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **निविदाधारकाचे नांव** | **निविदेतील दर** | **वाटाघाटीनंतरचे दर** |
| ०१. | मे.केरला स्टेट रबर कॉ.ऑप.लि.कन्नूर केरला | २,७६१/- | २,५९५/- |
| ०२ | मे.गोदरेज ॲण्ड बॉईज मॅन्यु.कं.लि., पुणे | १,७९६/- | १,६१७/- |
| ०३ | मे.कॉन्टक कमफोर्ट प्रा.लि., पारनेर | २,०१५/- | १,८१४/- |
| ०४. | मे.सेंच्युरी फायबर प्लेटस प्रा.लि., सिकंदराबाद | २,०४८/- | १,९४६/- |
| ०५. | मे.फायबर फोम (मुंबई) प्रा.लि, सिन्नर | १,७९०/- | १,७७२/- |
| ०६. | मे.ॲग्रीकों फायबर फोम प्रा.लि., कन्नुर | १,७२६/- | १,७२६/- |
| ०७. | मे.युनायटेड इंडिया इंडस्ट्रीज टेक.सिन्नर | १,८७५/- | १,८१९/- |

| **रबराईज्ड क्वायर मॅट्रेस फॉर सा.भ.नि.(५०० रुम) संख्या २००० नग**<br>1829 mm X 915 mm (72” X 36”) | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **निविदाधारकाचे नांव** | **निविदेतील दर** | **वाटाघाटीनंतरचे दर** |
| ०१. | मे.लिब्रा इंटरनॅशनल लि., नोयडा | ३,९९०/- | ३,७९०/- |
| ०२. | मे.केरला स्टेट रबर कॉ.ऑप.लि. केरला | ५,०८२/- उशी सह | ४,८२७/-उशी सह |
| ०३ | मे.गोदरेज ॲण्ड बॉईज मॅन्यु.कं.लि., पुणे | ३,३५०/- | ३,०१५/- |
| ०४. | मे.क्षितीजा इंटरप्रायझेस, पुणे | ३,६९०/- | ३,५००/- |
| ०५ | मे.कॉन्टक कमफोर्ट प्रा.लि., पारनेर | ३,८९७/- | ३,५०७/- |
| ०६. | मे.व्यंकटेश्वर कॉयर प्रॉडक्टस प्रा.लि., सिकंदराबाद | ३,००८/- | गैरहजर |
| ०७. | मे.सेंच्युरी फायबर प्लेटस प्रा.लि., सिकंदराबाद | ३,१५४/- | २,९९६/- |
| ०८. | मे.फायबर फोम (मुंबई) प्रा.लि, सिन्नर | ३,०५६/- | ३,०२५/- |
| ०९. | मे.ॲग्रीकों फायबर फोम प्रा.लि., कन्नुर | ३,१२९/- | २,८७५/- |
| १०. | मे.युनायटेड इंडिया इंडस्ट्रीज टेक.सिन्नर | २,८८०/- | २,७९४/- |
| ११. | मे.एरिओकॉम कुशन्स प्रा.लि., नागपुर | ३,२३१/- | ३,२३१/- |

| **रबराईज्ड क्वॉयर मॅट्रेस फॉर द्वारावती संख्या ८०** 1981 mm X 1676 mm (78”X 66”) | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **निविदाधारकाचे नांव** | **निविदेतील दर** | **वाटाघाटीनंतरचे दर** |
| ०१. | मे.केरला स्टेट रबर कॉ.ऑप.लि. कन्नूर केरला | १०,३२४/- | ९,८०७/- |
| ०२ | मे.गोदरेज ॲण्ड बॉईज मॅन्यु.कं.लि., पुणे | ७,२३६/- | ६,५१३/- |
| ०३ | मे.कॉन्टक कमफोर्ट प्रा.लि., पारनेर | ७,५६६/- | ६,८०९/- |
| ०४. | मे.व्यंकटेश्वर कॉयर प्रॉडक्टस प्रा.लि., सिकंदराबाद | ५,६६०/- | गैरहजर |
| ०५. | मे.सेंच्युरी फायबर प्लेटस प्रा.लि., सिकंदराबाद | ६,३०६/- | ५,९९१/- |
| ०६. | मे.फायबर फोम (मुंबई) प्रा.लि, सिन्नर | ६,०३६/- | ५,९७६/- |
| ०७. | मे.ॲग्रीकों फायबर फोम प्रा.लि., कन्नुर | ६,२३८/- | ६,०४८/- |
| ०८. | मे.युनायटेड इंडिया इंडस्ट्रीज टेक.सिन्नर | ५,७२०/- | ५,५४९/- |
| ०९. | मे.एरिओकॉम कुशन्स प्रा.लि., नागपुर | ६,०९८/- | ६,०९८/- |

| **रबराईज्ड क्वॉयर मॅट्रेस फॉर द्वारावती संख्या ८०**<br>1981 mm X 915 mm (78”X 36”) | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **निविदाधारकाचे नांव** | **निविदेतील दर** | **वाटाघाटीनंतरचे दर** |
| ०१. | मे.केरला स्टेट रबर कॉ.ऑप.लि. कन्नुर,केरला | ५,४२६/- | ५,१५४/- |
| ०२ | मे.गोदरेज ॲण्ड बॉईज मॅन्यु.कं.लि., पुणे | ३,६९६/- | ३,३२७/- |
| ०३ | मे.कॉन्टक कमफोर्ट प्रा.लि., पारनेर | ४,२३४/- | ३,८११/- |
| ०४. | मे.व्यंकटेश्वर कॉयर प्रॉडक्टस प्रा.लि.सिकंदराबाद | ३,१८०/- | गैरहजर |
| ०५. | मे.सेंच्युरी फायबर प्लेटस प्रा.लि., सिकंदराबाद | ३,३९१/- | ३,३२१/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| ०६. | मे.फायबर फोम (मुंबई) प्रा.लि, सिन्नर | ३,३०८/- | ३,२७५/- |
| ०७. | मे.ॲग्रीको फायबर फोम प्रा.लि., कन्नुर | ३,५००/- | ३,३९३/- |
| ०८. | मे.युनायटेड इंडिया इंडस्ट्रीज टेक.सिन्नर | ३,१२०/- | ३,०२७/- |
| ०९. | मे.एरिओकॉम कुशन्स प्रा.लि., नागपुर | ३,४६२/- | ३,४६२/- |

वरील निविदाधारकापैकी मे.फायबर फोम (मुंबई) प्रा.लि, सिन्नर यांनी संस्थानचे मागणीप्रमाणे आयएसओ सर्टिफिकेट सादर केलेले नाही तसेच मे.युनायटेड इंडिया इंडस्ट्रीज टेक.सिन्नर यांनी संस्थानचे मागणीप्रमाणे आयएसओ सर्टिफिकेट सादर केलेले नसून त्यांची वार्षिक उलाढाल निविदेतील मागणीपेक्षा (३ कोटी ) कमी आहे. तसेच मे.गोदरेज ॲण्ड बॉईज मॅन्यु.कं.लि., पुणे हे स्वत: गाद्यांचे उत्पादक नाहीत त्यामुळे वरिल तीनही निविदाधारक यांचे निविदेचा विचार करण्यात आलेला नाही.

उर्वरीत निविदांपैकी न्युनतम दराच्या निविदाची शिफारस करण्यात आली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | तपशील | निविदाधारकाचे नांव | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटी नंतरचा दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईआश्रम नं १ /२ साठी रबराईज्ड क्वायर मॅट्रेस 1829 mm X 762 mm, (72”X 30”) संख्या ५,५७० नग | मे.व्यंकटेश्वर कॉयर प्रॉडक्टस, लि., सिकंदराबाद | **२,४८७/-** | गैरहजर असल्यामुळे निविदेतील दर मान्य करण्यात आले. |
| ०२ | साईआश्रम १ व २ रबर क्वायर मॅट्रेस टु फोल्ड, 75” X 30” X 2” (1905 mm X 762 mm X 51 mm) संख्या ८,३५१ नग | मे.ॲग्रीको फायबर फोम प्रा.लि., कन्नुर | १,७२६/- | **१,७२६/-** |
| ०३ | क्वायर मॅट्रेस फॉर सा.भ.नि. (५०० रुम) 1829 mm X 915 mm (72” X 36”) संख्या २,००० नग | मे.ॲग्रीको फायबर फोम प्रा.लि., कन्नुर | ३,१२९/- | **२,८७५/-** |
| ०४ | क्वॉयर मॅट्रेस फॉर द्वारावती 1981 mm X 1676 mm (78”X 66”) , संख्या ८० नग | मे.व्यंकटेश्वर कॉयर प्रॉडक्टस, लि., सिकंदराबाद | **५,६६०/-** | गैरहजर असल्यामुळे निविदेतील दर मान्य करण्यात आले. |
| ०५ | क्वॉयर मॅट्रेस फॉर द्वारावती 1981 mm X 915 mm (78”X 36”) संख्या ८० नग | मे.व्यंकटेश्वर कॉयर प्रॉडक्टस, लि., सिकंदराबाद | **३,१८०/-** | गैरहजर असल्यामुळे निविदेतील दर मान्य करण्यात आले. |
| ०६ | पिलो - (साईआश्रम१,२, द्वारावती, सा.भ.नि.विभाग) 410 mm X 610 mm (24” X 16”) (+/-5mm), संख्या ७,८१० नग | मे.कॉन्टक कमफोर्ट प्रा.लि., पारनेर, जि.अहमदनगर | १५२/- | **१३७/-** |

पिलोसाठी आलेल्या निविदांपैकी मे.क्षितीजा एंटरप्रायझेस, पुणे यांचे दर न्युनतम आहेत. मात्र त्यांनी फक्त साईबाबा भक्तनिवासस्थानसाठी आवश्यक २००० नग पिलो पुरविणेसाठीच निविदा भरली असल्याने सर्व इमारतीसाठी लागणा-या एकाच साईजच्या पिलो ते पुरवू शकणार नसलेबाबत त्यांनी दूरध्वनीवरुन कळविले आहे. त्यामुळे द्वितीय क्रमांकाचे न्युनतम दराचे पिलोचे निविदाधारक मे.कॉन्टक कमफोर्ट प्रा.लि., पारनेर, जि.अहमदनगर यांचे दर मान्य करण्यात येऊन सर्व इमारतीत आवश्यक पिलो खरेदीबाबत शिफारस करण्यात आली. तसेच गाद्या व उशांसाठी वापरलेला कपडा आपले मागणीप्रमाणे असल्याची खात्री करणेकामी तो सर्व निविदाधारकांकडून मागवून घ्यावा व त्याची लॅब तपासणी करावी असे सुचविण्यात आले, निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.७५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मागील बैठकीचे वेळी निविदेद्वारे व वाटाघाटीने सादर केलेल्या दरातील न्यूनतम दर ज्यांनी देऊ केले आहेत त्यांना प्रस्तावित केलेप्रमाणे मान्यता देण्यात आली. तसेच मंजूर पिलो संख्या ७८१०+ जमिनवर टू फोल्ड मॅट्रेससाठी खरेदी करावयाच्या ८३४९ ह्याही पिलो याच मंजूर दराने म्हणजे ६१५९ नग पिलो मे.कॉन्टक कमफोर्ट प्रा.लि. पारनेर यांचेकडून मंजूर दराने (रुपये १३७/- प्रति नग) खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

-------------------------------------------------------------------------------------------

## दिनांक २४.०९.२०११ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाची कामापूरती नक्कल-

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १७** **राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांनी त्यांची मौजे रुई, तालुका राहाता येथील गट नंबर २८८अ, २८८ब, २८८ व २९४ मधील जमिनी संस्थानने खरेदी घ्यावी म्हणून दिलेल्या प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव** **(अ)** मा. विश्वस्त, राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांनी मा. अध्यक्षसो. यांना अग्रेषित केलेल्या त्यांचेकडील पत्र क्रमांक आरकेडीसीटी/४७/१०-११, दिनांक ०३ सप्टेंबर, २०१०

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



रोजीचे विनंती पत्रानुसार, मौजे रुई येथील गट नंबर २८८अ, २८८ब, २८८ क व सर्व्हे नंबर २९४ मधील एकूण क्षेत्र २६ एकर ०९ गुंठे ही जमीन रुपये ५० लाख मात्र प्रति एकर या दराने विकत घ्यावी, म्हणून पुन:श्च प्रस्ताव दिलेला आहे.

सदर पत्रामध्ये असे ही नमुद केले आहे की, त्यांनी सदर गट नंबरचे जमीनमालकांशी सन १९८७-८९ मध्ये जमीन खरेदीचा करार केलेला आहे. तथापि, काही अडचणीमुळे, न्यायालयीन वादामुळे सदर जमिनींचे खरेदीखत नोंदविण्यास विलंब झालेला आहे. आता न्यायालयीन वाद मिटलेला असून, न्यायालयाच्या निकालानुसार सदर जमीन त्यांचा ट्रस्ट खरेदी करणार आहे.

कामगार तलाठी, मौजे रुई यांचेकडून दिनांक ०९ सप्टेंबर, २०१० रोजी उपरोक्त गट नंबरचे ७/१२ उतारे प्राप्त करुन घेण्यात आलेले आहेत. उपरोक्त गट नंबरचे ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असतां, खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे :

**तक्ता क्रमांक ०१**

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र हे-आर-चौमी | कब्जेदार सदरी नांव | इतर हक्कातील नोंदी |
|---|---|---|---|---|
| ०१ | २८८ अ | ०२-९२-००<br>००-०२-०० पोख<br>**०२-९४-००** | लखीचंद कचरदास भंडारी | १. रुई वि.का.स.से.सो. इ.प.क.घे.<br>२. साई नागरी सह.पतसंस्था,शिर्डी न.ग.क.घे.<br>३. संग्राम माधवराव देशमुख पेन्डेन्सी करुन घेणार.<br>४. विहीर |
| ०२ | २८८ ब | **००-४२-००** | पुष्पाताई लखीचंद भंडारी | १. रुई वि.का.स.से.सो. इ.प.क.घे.<br>२. शिर्डी नागरी सह. पतसंस्था, शिर्डी न.ग.क.घे. (दोन वेळेस)<br>३. संग्राम माधवराव देशमुख पेन्डेन्सी करुन घेणार. |
| ०३ | २८८ क | **००-९७-००** | पुष्पाताई लखीचंद भंडारी | १. कोहकी सोसा.इ.प.क.घे.<br>२. रुई वि.का.स.से.सो. इ.प.क.घे.<br>३. शिर्डी नागरी सह. पतसंस्था, शिर्डी न.ग.क.घे. (दोन वेळेस)<br>४. संग्राम माधवराव देशमुख पेन्डेन्सी करुन घेणार. |
| ०४ | २९४ | ०२-९४-००<br>००-०१-५० पोख<br>**०२-९५-५०**<br>०२-९३-००<br>००-०१-५० पोख<br>**०२-९४-५०** | राजेंद्र चांदमल भनसाळी<br><br>सुभाष चांदमल भनसाळी | १. रुई वि.का.स.से.सो. इ.प.क.घे.<br>२. संग्राम माधवराव देशमुख पेन्डेन्सी करुन घेणार (राजेंद्र व सुभाषचा हिस्सा)<br>३. विहीर |
| | **एकूण** | **१०-२३-००** | | |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन केले असता, मा. विश्वस्त, राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांनी उपरोक्त **तक्ता क्रमांक ०१** मध्ये नमुद केलेल्या जमिनी खरेदी केल्यानंतर, त्यांचे ट्रस्टचे नांव जमिनीचे अभिलेखास लागलेनंतर, त्यांनी जमीन संस्थानला विक्री करणेकामी मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. त्यानंतरच संस्थानला या जमिनी कायदेशीर बाबींची पडताळणी व पूर्तता करुन खरेदी करता येतील.

**(ब)** दर्यानानी ट्रस्ट, मुंबई यांच्या उपरोक्त जमिनींपैकी गट नंबर २९४ ही जमीन ट्रस्टने संस्थानला दिनांक ०१ डिसेंबर, २००९ रोजी बक्षीसपत्राने दिलेल्या गट नंबर २९३ चे लगत आहे. मौजे रुई च्या गाव नकाशात, गट नंबर २८८ अ,ब व क या जमिनी गट नंबर २९३ च्या पुर्वेस असून, गट नंबर २९३ व गट नंबर २८८ मध्ये गट नंबर २९१ आहे. तसेच सदर जमिनी या हरीत पट्टयांत असल्याने, त्याठिकाणी बांधकाम अनुज्ञेय नाही.

त्यामुळे संस्थानने जमिनी खरेदी केल्यानंतर, सदर जमिनी निवासी (रहिवासी) क्षेत्रात समाविष्ट करणेबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करावा लागेल. परंतु या जमिनी संस्थानला त्यांचेच ट्रस्टकडून देणगी मिळालेल्या गट नंबर २९३ च्या लगत असल्याने, भविष्यात या ठिकाणी उभारणेत येणाऱ्या विविध विकास प्रकल्पासाठी अनुषंगिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने या जमिनी उपयोगी ठरतील.

**(क)** राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचे विषयांकित जमिनींचे खरेदी विषयी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ सप्टेंबर, २००८ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ७४६ अन्वये, उपरोक्त जमिनी रुपये २३ लाख मात्र प्रति एकर दराने सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करुन खरेदी करणेबाबत

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



निर्णय झालेला होता. सदर निर्णयानुसार, जमीन खरेदीची कार्यवाही ही सुरु करण्यात आली होती परंतु त्यामध्ये काही कायदेशीर त्रुटी आढळल्याने जमिनींची खरेदी प्रलंबित ठेवण्यात आलेली होती.

आता, मा. विश्वस्त, राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांनी त्यांचे दिनांक ०३ सप्टेंबर, २०१० रोजीचे पत्राने पुन:श्च विषयांकित जमिनीच्या कायदेशीर बाबी संपुष्टात आल्या असून, सदर जमिनी संस्थानने रुपये ५० लाख मात्र प्रति एकर या दराने खरेदी घ्याव्यात, म्हणून प्रस्ताव दिला आहे.

**(ड)** राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचा उपरोक्त दिनांक ०३ सप्टेंबर, २०१० रोजीच्या प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १० ऑक्टोबर, २०१० रोजीचे सभेत सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्रमांक ८३१ नुसार, विषयांकित जमीन राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांनी खरेदी केल्यानंतर व त्यांचे नाव जमिनींचे अभिलेखास कब्जेदार सदरी लागलेनंतर, ट्रस्टमार्फत आवश्यक त्या सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता झाले नंतर, संस्थानमार्फत सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी करुन, त्याबाबत कायदेशीर अभिप्राय घेऊन सदर जमीन रुपये ४५ लाख मात्र प्रति या दराने करणेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने, दर्यानानी ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री. प्रेम दर्यानानी व त्यांचे प्रतिनिधींनी दिनांक १० सप्टेंबर, २०११ रोजी मा. अध्यक्षसाो. यांचेशी समक्ष भेट घेतली, त्यावेळेस मा. कार्यकारी अधिकारी यांचेसह इतर अधिकारी हजर होते. सदर भेटीचे चर्चेत त्यांनी असे सांगितले की, सदर जमिनींबाबत अन्य हितसंबंधीत व्यक्तींनी न्यायालयात दावे केले असून, ते प्रलंबित आहेत. त्यामुळे जमीनमालक, ट्रस्ट व हितसंबंधीत व्यक्तींमध्ये न्यायालयातील समेट होऊन दावे मागे घेऊन जमीन विषयांकित जमिनी प्रथम दर्यानानी ट्रस्टने खरेदी करुन, त्या संस्थानला विक्री करणेस मोठा अवधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे जमिनींचे संबंधित सर्वांनी एकत्र बसून समेटाबाबत चर्चा केली असून, त्याबाबत कार्यवाही सुरु केलेली आहे. तथापि, जमीनमालक यांनी संस्थानने देऊ केलेली किंमत मान्य नसलेचे नमूद करुन, संस्थान जर रुपये ५५ लाख मात्र (अक्षरी रुपये पंचावन्न लाख मात्र ) प्रति एकर किंमत देणेस तयार असल्यास आम्ही संस्थानला सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करुन जमीन थेट खरेदी देणेस तयार आहोत. याबाबत संस्थानने निर्णय घेतल्यास विषयांकित जमिनीबाबत करावयाची न्यायालयीन कार्यवाही पूर्ण करणेस आम्ही तयार आहोत.

**(इ)** उपरोक्त **परिच्छेद ड** मध्ये नमुद केलेप्रमाणे, दर्यानानी ट्रस्ट, मुंबईच्या प्रतिनिधींनी, मा. अध्यक्षसाो. यांचेकडेस समक्ष भेटीत प्रस्तावित केलेनुसार, विषयांकित जमिनीबाबत दर्यानानी ट्रस्टसह जमीनमालक व जमिनींशी हितसंबंधीत व्यक्तींनी सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करुन, जमीन निर्धोक करुन संस्थानला उपलब्ध करुन दिल्यास, वरील जमीन रुपये ५५ लाख मात्र प्रति एकर या दराने थेट जमीनमालकांनी प्रस्ताव सादर केल्यास खरेदी करणेत यावी किंवा कसे याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मा. कार्यकारी अधिकारी यांनी विचारार्थ केला.

**निर्णय क्र.७५९** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, यापूर्वी मा. व्यवस्थापन मंडळाने दिनांक १० ऑक्टोबर, २०१० रोजीचे सभेत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन, दर्यानानी ट्रस्ट यांची वर नमूद केलेली जमीन सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी व पूर्तता करुन रुपये ५५ लाख प्रति एकर या दराने खरेदी करणेत यावी. याकामी विहीत पध्दतीने संस्थान वकिलांमार्फत जमिनीचा सर्च रिपोर्टसह अभिप्राय घेणेत यावा. तसेच वकिलांमार्फत विषयांकित जमिनीबाबत कोणत्याही व्यक्तिची / संस्थेची हरकत नाही याबाबत वृत्तपत्रात जाहिर नोटीस प्रसिध्द करुन, जमिनी खरेदीस कोणाची ही हरकत नाही याबाबत पडताळणी करणेत यावी. दर्यानानी ट्रस्ट, संबंधित जमीनमालक व इतर हितसंबंधित व्यक्ति / संस्था यांचेत असणारे सर्व न्यायालयीन दावे निपटल्यानंतर, जमीनमालकांनी संस्थानकडे जमीन विक्रीचा स्वतंत्ररित्या प्रस्ताव सादर करावा. त्यानुसार जमिनीचे खरेदीखत नोंदणीचे वेळेस जमिनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम आदा करणेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीस संस्थानचे नांव लागलेनंतर संस्थानमार्फत रितसर शासकीय मोजणी करुन, ताब्यात मिळणारे जमिनीच्या प्रमाणात रक्कम जमिनमालकांना आदा करणेस तसेच जमीन खरेदीकामी मुद्रांक व नोंदणी शुल्क, सरकारी मोजणी शुल्क, वकिल फी आदि अनुषंगिक योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **विश्वस्तांच्या सुचनेबाबत.**

**निर्णय क्र.७६०** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**(०१)** शिर्डी शहरातील रस्त्यावर वाहने उभी राहत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. याकरिता शिर्डी पोलिस स्टेशन शिर्डी यांना क्रेन देण्यात आलेली आहे. बेकायदेशीर पार्किंग केलेल्या

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



वाहनास दंड आकारण्यात यावा. दंडाची वसुली करणेकामी पोलिस स्टेशन शिर्डी यांना बील बुक देण्यात यावे. (कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख/वाहन विभाग प्रमुख)

**(०२)** इश्वर चॅनेल यांनी संस्थानची कोणतीही पूर्व परवानगी न घेता परस्पर साईबाबा मंदीरातील लाईव्ह दर्शन व जाहिरात दाखविण्यात आली याबाबत संस्थानचे कायदेशीर सल्लागार यांचा सल्ला घेऊन, त्यांचे साधना या सहकारी चॅनेलला कायदेशीर नोटीस देण्यात यावी. (कार्यवाही-आय.टी.प्रमुख)

**(०३)** मुंबई ते शिर्डी पदयात्रींकरिता जागोजागी पालखी थांबे उभारण्यात आलेले आहेत. सदरहू थांबे शैक्षणिक कार्यक्रमांसाठी विनामुल्य देण्यात यावेत. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**(०४)** डॉ.महादेव रामचंद्र घोरपडे, वैद्यकीय अधिक्षक यांची सेवेची संस्थानला आवश्यकता नसल्याने त्यांना एक महिन्याचा नोटीस पे देऊन, सेवामुक्त करण्यात यावे. तसेच डॉ.ऊंडे, नेत्ररोग तज्ञ यांना त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत नोटीस काढण्यात येऊन त्यांना व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे बोलविण्यात यावे. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/कामगार अधिकारी)

**(०५)** संस्थान आस्थापनेवर नेमणूक देण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामावर रुजु करुन घेणेअगोदर त्यांनी पूर्वी काम केलेल्या संस्थेचा त्यांचे पूर्व इतिहासाबाबत अभिप्राय घेण्यात यावा.
(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/ व्यवस्थापक मनुष्यबळ)

**(०६)** संस्थानमार्फत सध्या श्री साईबाबांचे पॉकेट साईज थ्री डी फोटो विक्रीसाठी ठेवण्यात आलेले आहे. या प्रकारचे ब्लॅक व्हाईट फोटो (Baba seating on Stone) तयार करुन भक्तांनी देणगी दिल्यानंतर त्यांना भेट म्हणून देण्यात यावे. (कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग)

**(०७)** कनिष्ठ महाविद्यालयासाठी अर्धवेळ शिक्षण सेवक तसेच प्रयोगशाळा सहाय्यक ही पदे भरण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन अर्ज मागविणेत आलेले आहेत. मागणी करण्यात आलेल्या अर्जांची छाननी करुन पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणेकामी, मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष, यांचेशी चर्चा करुन मुलाखतींची तारीख व वेळ निश्‍चित करुन त्यानुसार मुलाखती घेण्यात याव्यात.
(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/प्राचार्य, कन्या विद्या मंदिर)

**(०८)** संस्थानचे सर्व्हे नं.१४८ मध्ये श्री साईनाथ रुग्णालय परिसराचे पश्चिमेकडे बांधकाम करुन संरक्षक भिंत बांधण्यात आलेली आहे. सदर सर्व्हे नंबरचे पश्चिमेस व लगतचे राहणारे रहिवाशांना हॉस्पिटल व शाळेकडे जाणेसाठी दूर अंतरावरुन यावे लागते. याकरिता श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेस असलेल्या भिंतीस एक व्यक्ती जाईल असे गेट करुन दिल्यास रुग्ण व विद्यार्थी यांची सोय होईल, अशी विनंती या परिसरात राहणाऱ्या रहिवाशांनी केली असल्याने सदर भिंतीस एक विकेट गेट करण्यात यावे. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

**(०९)** श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांना मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने लेटर्स पेटन्ट अपील क्र.५९/ २०१० मध्ये दि.०८.०८.२०११ रोजी केलेल्या अंतरीम आदेशानुसार, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०८.२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६७ नुसार दि.०५.०९.२०११ पासून जनसंपर्क अधिकारी या पदावर पूर्ववत हजर करुन घेण्यात आले आहे.

श्री.ताराचंद म्हस्के यांचे न्यायप्रविष्ठ कोर्ट केसमध्ये तडजोड करावयाची झाल्यास त्यांना किती रक्कम देणे योग्य होईल. याबाबत संस्थान ॲडव्होकेट श्री.आर.एन. धोर्डे यांचे लेखी मत घेण्यात यावे व त्याबाबतचा सविस्तर तपशील मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा, असे दि.२८.०८.२०११ रोजीचे सभेत ठरले होते. तथापि, श्री.म्हस्के हे आजचे सभेपुढे समक्ष हजर झाले व यापुढील त्यांची उर्वरित संस्थान सेवा सोडून देऊन, न्यायप्रविष्ठ असलेल्या कोर्टकेसेस ते विनाअट मागे घेणार असल्याचे त्यांनी सभेस सांगीतले. व त्याबदल्यात त्यांना मोबदला म्हणून रु.२५,००,०००/- द्यावेत अशी मागणी करुन तडजोड करण्याची विनंती त्यांनी केली. यावर सदर न्यायालयीन प्रकरणी संस्थान कायदे सल्लागाराचे मत घेण्यात यावे, असे प्रशासनामार्फत सांगण्यात आले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.औरंगाबाद खंडपीठाने लेटर्स पेटन्ट अपील क्र.५९/२०१० मध्ये दि.०८.०८.२०११ रोजी केलेला आदेश हा अंतरीम आदेश आहे. श्री.म्हस्के यांचे संबंधीत मूळ रिट पिटीशन न्यायप्रविष्ठच असून, ते दि.२०.०४.१९९४ पासून त्यांना जनसंपर्क अधिकारी पदावर सलग सेवा धरुन त्यानुसार त्यांना त्या पदाचे सर्व आर्थिक लाभ मिळावेत या कारणासाठीचे आहे. हे विचारात घेऊन, श्री.म्हस्के यांनी त्यांची पुढील उर्वरित संस्थान सेवा सोडून द्यावी व चालू असलेल्या कोर्ट केसेस विनाअट मागे घ्याव्यात या अटीवर तडजोडीने त्यांना रु.१७,५०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख पन्नास हजार) मात्र देण्यात यावेत. मात्र कोर्ट केस काढून घेतल्यानंतर व उर्वरीत संस्थान सेवा सोडण्याबाबतचा तडजोडनामा मंजूर झाल्यानंतर त्यांना रक्कम आदा करावी, असे ठरले.
(कार्यवाही- कामगार अधिकारी/ अधिक्षक, आस्थापना)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



वरील निर्णय क्र ६७४ ते ७६० सर्वानुमते घेण्यात आले आहेत.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(डॉ.यशवंत माने )
उप कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)